सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, २९ मे २०२६ । वर्ष ४ थे अंक ८१ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघ ज्या वेळेला सेवेचा विचार करतो त्या वेळी विनामूल्य, विना मोबदला आणि मोबदला असलाच तर तो in coins नाही तर in kind म्हणजे केवळ समाधान हाच त्याचा मोबदला असतो.

**- स्व. प्रल्हादपंत अभ्यंकर**
रा. स्व. संघाचे माजी महाराष्ट्र प्रांत संघचालक

## महत्त्वाचे

### सीयूईटी-यूजीचे सुधारित वेळापत्रक जारी

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात् एनटीएने पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या संयुक्त विद्यापीठ प्रवेश परीक्षा-२०२६ च्या (सीयूईटी) सुधारित परीक्षा तारखा आणि प्रवेशपत्रे जाहीर केली आहेत. ईद-उल-अझहामुळे या परीक्षांचे वेळापत्रक २८ मे पासून पुढे ढकलण्यात आले होते. आता या परीक्षा ३१ मे, ६ आणि ७ जून रोजी होणार आहे, अशी माहिती एनटीएने दिली. ३१ मे रोजी परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांची प्रवेशपत्रे जारी करण्यात आली असून, ती अधिकृत संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. प्रवेशपत्रे लवकरच जारी केली जातील, असे एजन्सीने सांगितले. ■

# सिद्धरामय्या यांचा राजीनामा

- शुद्ध अंतःकरणाने पद सोडल्याचा दावा
- राज्यसभेची उमेदवारी नाकारली

◆ **बंगळुरू, २८ मे**

कर्नाटकातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते सिद्धरामय्या यांनी गुरुवारी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. यासह या पदासाठी उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासोबत सुरू असलेला तीव्र स्वरूपाचा राजकीय संघर्ष संपुष्टात आला. ते राजीनामा देतील असा अंदाज मागील काही महिन्यांपासून वर्तविला जात होता.

काँग्रेस नेतृत्वाने राज्यसभेच्या उमेदवारीचा प्रस्ताव दिला होता. मात्र, कर्नाटकातील राजकारणात सक्रिय राहण्यासाठी तसेच शेवटच्या श्वासापर्यंत जातीय शक्तींसोबत लढण्यासाठी त्यास नकार दिला, असे सिद्धरामय्या यांनी सांगितले. मी शुद्ध अंतःकरणाने पद सोडत आहे. दोन वेळा लोकांची सेवा करण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी पक्षश्रेष्ठींचे आभार मानतो, असे सिद्धरामय्या यांनी येथे झालेल्या पत्रपरिषदेत राजीनाम्याची घोषणा करताना सांगितले. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत शहरात नसल्याने त्यांचे विशेष सचिव प्रभू शंकर यांच्याकडे राजीनामा सोपवला, असे ते म्हणाले. मुख्यमंत्रिपदाचा मी राजीनामा दिला आहे. घटनात्मक तरतुदींनुसार राज्यपाल तो स्वीकारतील, असा मला विश्वास आहे. मला दोन वेळा संधी मिळाली. त्यासाठी मी सोनिया गांधी, राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खडगे यांचे आभार मानतो, असे ते म्हणाले. राजीनाम्यासाठी तुमच्यावर पक्षश्रेष्ठींचा दबाव होता का, या प्रश्नाला उत्तर देताना सिद्धरामय्या म्हणाले, कोणता दबाव? मला विचारल्यानंतर मी स्वेच्छेने लगेच राजीनामा दिला. मी शुद्ध अंतःकरणाने पद सोडत आहे, असे ते म्हणाले. मी मूल्यांशी आणि विचारसरणीसोबत कधीच तडजोड केलेली नाही किंवा सत्ता किंवा पैशाच्या पाठीमागे पळत सुटलो नाही. माझी ५० वर्षांची राजकीय कारकीर्द एका खुल्या पुस्तकाप्रमाणे आहे, असे सिद्धरामय्या यांनी ठामपणे सांगितले. ◂*(तभा वृत्तसेवा)*



पत्रकार परिषदेत सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांनी हातात हात घेऊन काँग्रेसमध्ये आलबेल असल्याचे संकेत दिले

### राष्ट्रीय राजकारणात जाण्यास इच्छुक नाही

**राज्यसभेत जाण्याबाबत पक्षश्रेष्ठिंनी मला विचारलो पण, राष्ट्रीय राजकारणात जाण्याची माझी इच्छा नाही. मी राज्यातील राजकारणातच राहील. लोकांनी मला पाच वर्षांसाठी निवडून दिले होते आणि अद्याप दोन वर्षे शिल्लक आहेत. मी कर्नाटक आणि माझ्या मतदारसंघातील लोकांसाठी काम करीत राहील, असे सिद्धरामय्या यांनी सांगितले.** ■

# पश्चिम आशियात पुन्हा भडकले युद्ध

## इराण-अमेरिकेचे परस्परावर हल्ले

- शांतता करारात विघ्न
- होर्मुझ जलमार्गात अडथळा कायम

◆ **दुबई, २८ मे**

अमेरिकेच्या वायुदलाने होर्मुझ किनाऱ्याजवळील इराणच्या अब्बास बंदरालगतच्या लष्करी तळांवर आणि नौकांवर केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्लामिक रिव्हाल्यूशनरी गार्ड कार्प्सने गुरुवारी होर्मुझजवळील अमेरिकेचे वायू तळ आणि कुवेतमधील लष्करी तळावर क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा केला. त्यानंतर अमेरिकेच्या सैन्यानेही इराणी लष्कराच्या तळावर हल्ले चढविल्याने मध्यपूर्वेत पुन्हा युद्धाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

अमेरिका-इराणमध्ये शांतता करारासाठी वाटाघाटी सुरू असताना दोन्ही देशांनी परस्परावर हल्ले सुरू केल्याने होर्मुझ जलमार्गातील वाहतूक पूर्वपदावर येण्याची आशा मावळली आहे. आयआरजीसीने निवेदनात म्हटले की, अमेरिकेने संघर्षविरामाचे उल्लंघन केल्याने गुरुवारी त्यांच्या लष्करी आणि वायू तळाला लक्ष्य करून क्षेपणास्त्र, ड्रोनचा मारा करण्यात आला. अब्बास बंदराजवळ झालेल्या अमेरिकेच्या हल्ल्याचा सूड घेण्यात आला. यापुढे हल्ला झाल्यास इराणकडून यापेक्षाही भीषण आणि निर्णायक प्रत्युत्तर दिले जाईल. गंभीर परिणामांची जबाबदारी अमेरिकेची असेल. दुसरीकडे अमेरिकेच्या संरक्षण मंत्रालयाने सैन्याच्या सुरक्षेसाठी इराणचे लष्करी तळ आणि नौकांवर हल्ला केल्याचे सांगितले. दोन्ही बाजूने नुकसानीची माहिती देण्यात आली नाही. कुवेतच्या संरक्षणमंत्र्यांनी इराणचे ड्रोन, क्षेपणास्त्र थोपवण्यात यश आल्याचे सांगितले. ◂*(वृत्तसंस्था)*



### कराराची घाई नाही



**राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प माध्यमांशी बोलताना म्हणाले, शांतता करारासाठी सुरू असलेल्या वाटाघाटीतून अजून काहीही निष्पन्न झालेले नाही. आम्हाला कराराची कोणतीही घाई नाही. इराणचा समृद्ध युरेनियम साठा रशिया किंवा चीनला देणे मान्य नाही. ओमानला इशारा देताना ते म्हणाले, होर्मुझची सामुद्रधुनी उघडण्याच्या प्रक्रियेत त्यांनी हस्तक्षेप करू नये.** ■

### शत्रूचे सैनिक जिवंत जाणार नाहीत



**इराणी नागरिकांनी शरणागती पत्करावी अशी अमेरिकेची इच्छा आहे. युद्धाच्या मैदानात पराभव झाल्यानंतर देशात अराजकता पसरविण्याचा कट रचला जात आहे. लष्करी प्रतिष्ठाणांवर हल्ले केल्यास शत्रूचे सैनिक जिवंत परत जाणार नाही असा इशारा, इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई यांनी दूरचित्रवाणीवरून प्रसारित लेखी संदेशातून दिला.** ■

### त्विशाची सासू गिरीबालाला अटक

**भोपाळ** : भोपाळमधील गाजलेल्या त्विशा शर्मा मृत्यू प्रकरणात, सीबीआयने तिची सासू आणि निवृत्त न्यायाधीश गिरीबाला सिंह यांना अटक केली आहे. गुरुवारी सकाळी सीबीआयचे अधिकारी त्यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते. चौकशीनंतर गिरीबाला यांना सायंकाळी ५:१० वाजता अटक करण्यात आली. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने बुधवारी गिरीबाला सिंह यांचा अटकपूर्व जामीन रद्द केला. ■

# दोषींना सोडणार नाही : धर्मेंद्र प्रधान

### ‘ओएसएम’ वादावर स्पष्टोक्ती

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

सीबीएसईच्या नवीन ऑन-स्क्रीन मार्किंग (ओएसएम) मधील त्रूटीची नैतिक जबाबदारी मी स्वीकारतो. याप्रकरणी दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई केली जाईल. सीबीएसईने पहिल्यांदाच हा प्रयोग केला. त्यामध्ये काही विसंगती समोर येत आहेत, ज्याची जबाबदारी मी घेतो. ही चूक सुधारली जाईल आणि यावर योग्य तो तोडगा काढला जाईल. एकाही विद्यार्थ्याची शंका अनुत्तरीत ठेवणार नाही, असे स्पष्टीकरण केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिले.

सीबीएसई अधिकाऱ्यांची बैठक घेतल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना प्रधान म्हणाले, सीबीएसई इयत्ता १२ वी परीक्षेबाबत जे काही मुद्दे समोर आले आहेत, त्यांचे पुनर्मूल्यांकन केले जाईल. एकूण १७ लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी प्रत्येकाची मिळून ९८ लाख उत्तरपत्रिका सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. उत्तरपत्रिकांच्या जवळपास ४० कोटी पानांचे स्कॅनिंग करण्यात आले. सीबीएसईने पहिल्यांदाच स्कॅनिंग प्रणाली लागू केली. भारतातील आणि जगातील अनेक नामांकित संस्था ओएसएम तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी पुढे येत आहेत. यातील त्रूटी मी मान्य करतो आणि त्यात सुधारणा केली जाईल. ◂*(वृत्तसंस्था)*



# अब्राहम कराराला पाठिंबा भोवणार

## दहशतवाद्यांची शाहबाज, मुनीरला धमकी ● पाकिस्तान सरकारविरुद्ध गृहयुद्धाचा इशारा





◆ **इस्लामाबाद, २८ मे**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानसह अनेक मुस्लिम देशांना इस्रायलला मान्यता देणाऱ्या अब्राहम करारावर स्वाक्षरी करण्यासाठी दबाव वाढवला आहे. तुर्तास पाकिस्तानने करारावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला असला तरी, अमेरिकेच्या दबावामुळे त्यांना कराराला पाठिंबा द्यावा लागू शकतो. अशातच पाकिस्तानातील दहशतवादी संघटनांच्या प्रमुखांनी या कराराला विरोध करत लष्करप्रमुख असीम मुनीर आणि पंतप्रधान शाहबाज शरीफ यांना खुली धमकी दिली.

पाकिस्तान सरकारने अब्राहन कराराला पाठिंबा दिल्यास देशात गृहयुद्ध भडकवण्याची धमकी लश्कर-ए-तोएबाचा उपप्रमुख सैफुल्ला कसुरी याने जाहीर भाषणातून दिली आहे. अमेरिकेच्या दबावाला बळी पडून या कराराला पाठिंबा देण्याची किंमत सत्ताधारी आणि लष्कर प्रमुखाला चुकवावी लागेल असेही त्याने म्हटले आहे. पाकिस्तानी सरकारने इस्रायलला मान्यता दिल्यास देशातील वातावरण बिघडू शकते. इस्रायलशी संबंध प्रस्थापित करणाऱ्या कोणत्याही शासकाला संपवले जाईल. अब्राहम करार स्वीकारणे देशद्रोही कृती असून, जो कोणी हे करेल, मग तो शासक असो, राजा असो किंवा कोणीही असो, त्याला ठार मारले जाईल, नष्ट केले जाईल आणि उद्ध्वस्त केले जाईल अशी जाहीर धमकी शाहबाज आणि मुनीर यांना कसुरीने दिली आहे. (वृत्तसंस्था)

### इस्रायलला मान्यता देणाऱ्यांचा मृत्यू अटळ

मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने, सौदी अरेबिया, पाकिस्तान, कतार, तुर्की, इजिप्त आणि जॉर्डन यांसारख्या प्रमुख मुस्लिम देशांनी अब्राहम करारात सामील होऊन इस्रायलला अधिकृतपणे मान्यता द्यावी, असा प्रस्ताव ट्रम्प यांनी अलीकडेच मांडला आहे. करार स्वीकारण्यासाठी पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांची कोंडी झाली असून, दहशतवादी संघटनांनी देशातील सरकारला उघड धमकी देणे सुरू केले आहे. इस्रायलला मान्यता देणाऱ्यांचा मृत्यू अटळ असल्याचा इशारा लष्करच्या नेत्याने दिला.

### कोणतीही महाशक्ती टिकाव धरणार नाही

सैफुल्ला कसुरीने पुढे म्हटले की, कोणत्याही आंतरराष्ट्रीय महाशक्तीमध्ये इस्लामिक देशांना इस्रायलला एक राष्ट्र म्हणून मान्यता देण्यास भाग पाडण्याची ताकद नाही. पाकिस्तान आणि सौदी अरब यांच्यातील मजबूत होत असलेल्या संरक्षण कराराचा हवाला देत, त्याने दावा केला की पाकिस्तानच्या लष्करी क्षमतांची सामरिक पोहोच आता इतकी वाढली आहे की ती इस्रायलच्या प्रभावाचा सामना करू शकते.

# कुंपणासाठी १४२ एकर जमीन बीएसएफला सोपविली

### शुभेन्दू अधिकारी यांची माहिती



◆ **कोलकाता, २८ मे**

भारत-बांगलादेश सीमेवर काटेरी कुंपण आणि सीमा चौक्या उभारण्यासाठी पश्चिम बंगाल सरकारने १४२.७९ एकर जमीन बीएसएफला सोपविली, अशी माहिती मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी दिली.

सीमेवर कुंपण उभारण्यासाठी तसेच पायाभूत प्रकल्पांसाठी ६०० एकर जमीन बीएसएफला देण्याबाबत पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचा हा एक भाग आहे. बंगाल सरकारने बीएसएफच्या चौक्या आणि काटेरी कुंपणाचे बांधकाम सुलभ करून सीमा सुरक्षा बळकट करण्यासाठी तीव्र उपाययोजना हाती घेतल्या आहेत. यामुळे सीमावर्ती भागांमधील सुरक्षा आणखी वाढली आहे. आणखी काही जमीन आता बीएसएफकडे सोपवण्यात आली असून, यामुळे एकूण क्षेत्र १४२.७९ एकरांवर पोहोचले आहे, असे शुभेन्दू अधिकारी यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले.

नऊ जिल्ह्यांमध्ये बीएसएफकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या जमिनीचा तपशील दर्शवणारा जिल्हावार तक्ताही त्यांनी सामायिक केला.

या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्याचा भाग म्हणून, पाच जिल्ह्यांमध्ये संपादित केलेली ४३ एकर जमीन आणि ३१.एकर निहित जमिनीचे मंजुरी आदेश २० मे रोजी बीएसएफकडे सुपूर्द करण्यात आली. गेल्या आठवड्यात अधिकाऱ्यांनी केलेल्या एका मोठ्या धोरणात्मक घोषणेनंतर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यात कुंपण घालण्याच्या कामाला गती देणे आणि अवैध स्थलांतराविरुद्ध कठोर प्रशासकीय उपाययोजना करणे या दुहेरी रणनीतीची रूपरेषा मांडण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### बांगलादेशसोबत २,२१७ किमीची सीमा

पश्चिम बंगालची बांगलादेशाशी २,२१७ किमी लांबीची सीमा जोडलेली आहे. भारतीय राज्यांमध्ये ही सर्वांत लांब सीमा आहे. राज्यातील या सीमेपैकी १,६०० किमी भागावर यापूर्वीच कुंपण उभारण्यात आले आहे, तर जवळपास ६०० किमी भागावर कोणतेही कुंपण नाही.

| स्थान | जमीन (एकरमध्ये) |
|---|---|
| कूचबिहार | २२.९२ |
| जलपाईगुडी | ३५.१६ |
| दार्जिलिंग | ८.८१ |
| उत्तर दिनाजपूर | २.८४ |
| दक्षिण दिनाजपूर | २०.१७ |
| मालदा | १०.९ |
| मुर्शिदाबाद | ३८.८ |
| नाडिया | ०.५५ |
| उत्तर २४ परगणा | २.६ |

# ‘एलएसी’वर रचनात्मक चर्चा

## संबंध सामान्य करण्यासाठी सीमेवरील शांतता गरजेची

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

भारत आणि चीनने पूर्व लडाखमधील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थितीबाबत रचनात्मक चर्चा केली. सीमेवर शांतता व सुव्यवस्था राखल्यामुळेच एकूण संबंध पूर्ववत करण्याच्या प्रक्रियेत प्रगती साधणे शक्य झाल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. बीजिंगमध्ये बुधवारी झालेल्या सल्लामसलत आणि समन्वयासाठीच्या कार्यपद्धतीच्या बैठकीदरम्यान, दोन्ही बाजूंनी सीमा परिस्थितीच्या विविध पैलूंवर चर्चा केली. या चर्चा विधायक आणि भविष्यवेधी होत्या, असे परराष्ट्र मंत्रालयाने चर्चेनंतर सांगितले.

२०२० मधील गलवान खोऱ्यातील प्राणघातक संघर्ष आणि त्यानंतर चार वर्षांपेक्षा अधिक काळ चाललेल्या लष्करी संघर्षानंतर जो तीव्र ताण निर्माण झाला होता, तो भरून काढण्यासाठी भारत आणि चीनने मागील वर्षभरात अनेक उपाययोजना केल्या आहेत. दोन्ही बाजूंनी भारत-चीन सीमावर्ती भागांमधील परिस्थितीचा आढावा घेतला.

सीमावर्ती भागांमध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दिशेने झालेल्या प्रगतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यामुळे द्विपक्षीय संबंध हळुहळू पूर्ववत करण्याच्या दिशेने वाटचाल करणे शक्य झाले आहे, असे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### भारत-चीनदरम्यान विविध मुद्द्यांवरही चर्चा

दोन्ही बाजूंनी सीमांकन, सीमा व्यवस्थापन, यंत्रणा उभारणी आणि सीमापार सहकार्याशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा केली, असे परराष्ट्र मंत्रालयाने डब्ल्यूएमसीसी बैठकीबाबत सांगितले. भारतीय बाजूने सीमापार नद्यांबाबत पुढील तज्ज्ञ-स्तरीय यंत्रणेची बैठक लवकरात लवकर घेण्यावर भर दिला.



## ‘केसीपी’च्या कमांडरला दिल्लीत अटक

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

मणिपुरातील प्रतिबंधित बंडखोर संघटना कांग्लेईपाक कम्युनिस्ट पार्टीचा (केसीपी) महत्त्वपूर्ण कमांडर हाओबिजम दिलीप सिंह याला सुरक्षा दलाने संयुक्त कारवाई करीत राजधानी दिल्लीत अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. ही कारवाई दिल्ली पोलिसांची विशेष शाखा, मणिपूर पोलिस आणि केंद्रीय यंत्रणांनी केली. त्याच्या चौकशीच्या आधारे सुरक्षा दलांनी मणिपूरच्या काकचिंग जिल्ह्यात एक शोधमोहीम राबवली. यात मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारुगोळा आणि स्फोटके जप्त करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बंदी घातलेल्या संघटनेचा प्रमुख सदस्य मानला जाणारा हाओबिजम हा, बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत दाखल असलेल्या १२ पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये फरार होता, असे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# ईडी पथकावर हल्ला करणारे आठ अटकेत

## विजयन् यांच्या घरावरील कारवाईला केला होता विरोध

◆ **तिरुवनंतपुरम, २८ मे**

केरळमध्ये अंमलबारी संचालनालयाच्या (ईडी) अधिकाऱ्यांवरील हल्लाप्रकरणी पोलिसांनी गुरुवारी आठ जणांना अटक केली. माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या निवासस्थानावरील छाप्यानंतर झालेल्या हिंसाचारात ही कारवाई करण्यात आली.

विजयन यांच्या निवासस्थानावर ईडीच्या पथकाने छापा टाकला असता कार्यकर्त्यांनी विरोध करत ईडी पथकाच्या ताफ्यावर हल्ला केला. यात वाहनांची तोडफोड करण्यात आली. राज्याचे पोलिस महासंचालक रावडा ए. चंद्रशेखर यांनी गुरुवारी सांगितले की, आतापर्यंत याप्रकरणी आठ आरोपींना अटक केली असून, इतरांची ओळख पटवणे सुरू आहे. ईडीच्या कारवाईबद्दल पोलिसांना कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती. छापा सुरू झाल्यानंतर आणि ईडी पथकावर हल्ला झाल्यावर पोलिसांना माहिती मिळाली, त्यानंतर सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली.

**३०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

या प्रकरणात ३०० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे, ज्यात बेकायदेशीर जमाव, दंगल, सार्वजनिक कार्यक्रमात अडथळा, हल्ला आणि हत्येचा प्रयत्न यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करण्याशी संबंधित गुन्हे दाखल केले. जमावाने ईडी अधिकाऱ्यांच्या पथकावर काठ्या आणि दगडांनी हल्ला केला. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ‘राजा शिवाजी’ चित्रपटाची विक्रमी कमाई

**मुंबई** : रितेश देशमुख अभिनीत आणि दिग्दर्शित ‘राजा शिवाजी’ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर उत्तम कामगिरी करत आहे. महाराष्ट्राचे आराध्य



दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे रितेश देशमुख व्यतिरिक्त या चित्रपटात इतर बॉलिवूड कलाकारांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. यामुळेही हा चित्रपट प्रेक्षकांनी पाहिला. चित्रपटाने २७ व्या दिवशी ४० लाख रुपयांचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले. या चित्रपटाने विदेशात ४.२२ कोटींचे बॉक्स ऑफिस कलेक्शन केले. माहितीनुसार, जागतिक स्तरावर या चित्रपटाने आतापर्यंत ११४.४९ कोटींचे विक्रमी कलेक्शन केले.

### सलमानच्या चित्रपटाचे गाणे प्रदर्शित

**मुंबई** : सलमान खानच्या ‘मातृभूमी’ या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली. मात्र ‘मातृभूमी’ या चित्रपटातील ‘मैं हूं हे’ गाणे प्रदर्शित झाले. सलमानने समाज माध्यमावर या गाण्याचा व्हिडीओ शेअर केला. या गाण्याला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या व्हिडीओमध्ये सलमान खानसोबत चित्रांगदा सिंह दिसते आहे. हे गाणे अत्यंत दु:खद आणि भावनिक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या गाण्यात काही बदल केले जात आहेत. सलमान खानने या चित्रपटातील गाण्याचा टीझर प्रदर्शित केला आहे. हे गाणे श्रेया घोषाल आणि अयानलाल यांनी गायले आहे. हे गाणे शूर सैनिकांनी केलेल्या त्यागाचे चित्रण करते.



### कबीर खान करणार काश्मिरात चित्रीकरण



**मुंबई** : अभिनेता कबीर खान कौटुंबिक भावना आणि मुलांशी संबंधित चित्रपट घेऊन येत आहे. चित्रपटात कार्तिक आर्यन मुख्य भूमिकेत आहे आणि कथा एका मुलाच्या आणि एका प्रौढ पात्राच्या नात्याभोवती फिरते. चित्रपटाचे पहिले मोठे शेड्यूल मुंबईतील मड आयलंड येथे पूर्ण झाले. तिथे सुमारे १५ दिवस काश्मीरसारखा सेट तयार करण्यात आला होता. मुंबई शेड्यूल पूर्ण झाल्यानंतर आता चित्रपटाची युनिट काश्मीरमध्ये चित्रीकरण करत आहे. यात चित्रपटाचे भावनिक प्रसंग आणि स्थानिक ठिकाणांवरील दृश्ये चित्रित करण्यात आले. कथेत काश्मीरचा बॅकड्रॉप खूप महत्त्वाची भूमिका बजावतो, त्यामुळे निर्मात्यांनी वास्तविक लोकेशन्सवरही चित्रीकरणाला प्राधान्य दिले आहे.

# मोदींचे यजमानपद भूषवणे हा सन्मान : अँथनी अल्बानीज

### द्विपक्षीय संबंध बळकट करण्याला प्राधान्य

◆ **मेलबर्न, २८ मे**

पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी संसदेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आगामी ऑस्ट्रेलिया दौऱ्याची घोषणा केली. भारत-ऑस्ट्रेलिया संबंध, व्यापार, संरक्षण आणि इंडो-पॅसिफिक सहकार्य मजबूत करण्यावर भर असल्याचा तसेच, मोदींचे यजमानपद भूषवणे ही सन्मानाची बाब असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



कॅनबेरा येथील संसदेला संबोधित करताना अल्बानीज म्हणाले, भारत दशकातील तिसरी सर्वात मोठी जागतिक आर्थिक शक्ती बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारत ऑस्ट्रेलियासाठी अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे. भारताची आर्थिक वाढ ही केवळ एका देशाची उपलब्धी नसून, संपूर्ण इंडो-पॅसिफिक क्षेत्रासाठी एक मोठी संधी आहे. ऑस्ट्रेलिया केवळ एक पॅसिफिक राष्ट्र नसून हिंद महासागर क्षेत्राचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होत आहेत. २०२२ मध्ये स्वाक्षरी झालेल्या आर्थिक सहकार्य आणि व्यापार कराराचा संदर्भ देत ते म्हणाले की, या करारामुळे दोन्ही देशांमधील व्यापारी संबंध अधिक मजबूत झाले आहेत. ऑस्ट्रेलियातील भारतीय उच्चायुक्त फिलिप ग्रीन यांनी एक्सवरील पोस्टमधून अल्बानीज यांच्या भाषणाची चित्रफीत प्रसारित केली. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान भारताबद्दल इतक्या ताकदीने आणि उत्साहाने बोलतात, तेव्हा भारताचे उच्चायुक्त म्हणून काम करणे हा मोठा सन्मान असल्याचे त्यांनी पोस्टमध्ये नमूद केले. (वृत्तसंस्था)

### भारत भेटीचा सांगितला अनुभव

भारतातील भेटीचा अनुभव सांगताना अल्बानीज म्हणाले, भारताला खऱ्या अर्थाने समजून घेण्यासाठी बस किंवा ट्रेनने प्रवास करणे हा सर्वोत्तम अनुभव आहे, कारण त्यामुळे देशाची विविधता आणि आपुलकी जवळून अनुभवता येते. मला लवकरच पंतप्रधान मोदींचे यजमानपद भूषवण्याची संधी मिळेल आणि हा माझ्यासाठी मोठा सन्मान असेल. दहा लाख भारतीय वंशाचे लोक केवळ देशाची अर्थव्यवस्थाच मजबूत करत नाहीत, तर लहान व्यवसाय आणि समाजातही महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.



उन्हाळी सुट्ट्या आणि ईदच्या सणामुळे रेल्वे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे. प्रवाशी जास्त आणि रेल्वे गाड्या कमी, अशी स्थिती असल्याने प्रवासासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पाटणा रेल्वे स्थानकावर झालेली गर्दी

# निवासी शाळेला आग; १७ विद्यार्थिनी ठार

◆ **नैरोबी, २८ मे**

केनियातील गिलगिल येथील निवासी मुलींची शाळा उटुमिषी गर्ल्स स्कूलला बुधवारी रात्री भीषण आग लागली. यात १७ विद्यार्थिनींचा होरपळून मृत्यू झाला, तर ७९ जखमी आहेत. सरकारने घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

शिक्षण मंत्री ज्युलियस ओंगामा यांनी सांगितले की, गिलगिल येथील उटुमिषी गर्ल्स स्कूलच्या वसतिगृहात अचानक आग लागली. घटनेच्यावेळी बहुतांश विद्यार्थिनी त्यांच्या खोल्यांमध्ये झोपलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना वेळेवर बाहेर पडता आले नाही. बचाव आणि मदत पथके तत्काळ घटनास्थळी दाखल झाली आणि आगीवर नियंत्रण मिळवले. वसतिगृहात अडकलेल्या विद्यार्थिनींना बाहेर काढून रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी १७ विद्यार्थिनींना मृत घोषित केले, तर ७९ मुलींवर उपचार सुरू आहे. बचाव पथकाने ६५० पेक्षा अधिक मुलींना सुरक्षित बाहेर काढले. आग कशामुळे लागली याचा तपास सुरू आहे.

ही घटना शॉर्ट सर्किटमुळे घडली की इतर कोणत्या कारणामुळे, हे निश्चित करण्यासाठी चौकशीचे आदेश दिले आहेत. (वृत्तसंस्था)

# भारतीयांच्या दैनंदिन आहारात गडबड

## करतात गरजेपेक्षा जास्त पोळी आणि भाताचे सेवन ● भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या सूचना जारी

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

भारतीय स्वयंपाकघरात पोळी, भात आणि पराठे हे केवळ अन्न नसून ते आपल्या परंपरेचा आणि दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. पोळी, भात आणि पराठ्याशिवाय भारतीय थाळी अपूर्ण मानली जाते आणि लहानपणापासूनच आपल्याला शिकवले जाते की पोटभर जेवण हेच उत्तम जेवण असते.

सकाळच्या नाश्त्यापासून ते रात्रीच्या जेवणापर्यंत बहुतेक घरांतील ताटांमध्ये हेच असते. पण आता एका नवीन सरकारी अभ्यासामुळे आपण खरोखरच संतुलित आहार घेत आहोत का, असा प्रश्न पडला आहे. आजही भारतातील बहुतेक लोक गरजेपेक्षा जास्त धान्य खात आहेत तर प्रथिने, कडधान्ये, हिरव्या भाज्या, फळे आणि दूध यांसारखी आवश्यक पोषक तत्त्वे अत्यंत कमी प्रमाणात घेत असल्याचे भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित या अभ्यासात दिसून आले आहे. हा अभ्यास २०२२-२३ च्या घरगुती उपभोग सर्वेक्षणातील माहितीवर आधारित आहे.



अहवालानुसार, देशभरातील अनेक राज्यांमध्ये लोक निर्धारित मासिक मर्यादेपेक्षा खूप जास्त धान्य खात आहेत. विशेषतः ग्रामीण भागात तांदूळ आणि गव्हाचा वापर जास्त होता. दुसरीकडे भाजीपाला आणि कडधान्यांचा वापर अत्यंत कमी होता. एका व्यक्तीला दरमहा अंदाजे ७.५ किलो धान्याची गरज असते, परंतु अनेक राज्यांमध्ये हा आकडा १० ते ११ किलोपर्यंत पोहोचला. पश्चिम बंगाल, ओडिशा, बिहार आणि त्रिपुरा यांसारख्या राज्यांमध्ये ग्रामीण भागात सर्वाधिक धान्य वापराची नोंद झाली. आजच्या धावपळीच्या जीवनात, लोक अधिकाधिक झटपट आणि पोटभर जेवणाला पसंती देत आहेत. ऑफिसला जाण्याची घाई असो किंवा मुलांना शाळेत सोडायचे असो, पोळी आणि भात हा सर्वात सोपा पर्याय झाला आहे.

याचबरोबर प्रक्रिया केलेले अन्न, फास्ट फूड आणि रेस्टॉरंटमधील जेवण खाण्याचा ट्रेंडही झपाट्याने वाढत आहे. यामुळे शरीराला आवश्यक पोषक तत्त्वांची कमतरता भासते आणि लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या गंभीर आजारांचा धोका हळूहळू सर्व वयोगटातील लोकांवर परिणाम करीत आहे. अलिकडच्या वर्षांत आजारांमध्ये झालेल्या वाढीचे हे देखील एक कारण मानले जाते. (वृत्तसंस्था)

### ताटातून होताहेत प्रथिने नाहीशी

आश्चर्यकारक बाब म्हणजे, ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये भाज्यांचा वापर अत्यंत कमी आहे. आयसीएमआर दरमहा प्रति व्यक्ती १२ किलो भाज्या खाण्याची शिफारस करत असताना, सर्वाधिक भाज्यांचा वापर करणाऱ्या छत्तीसगड राज्यातही ग्रामीण भागात हे प्रमाण केवळ ६.७ किलो आणि शहरी भागात ८.३ किलो इतकेच नोंदविले गेले.

### दरमहा केवळ एक किलो डाळीचे सेवन

आयसीएमआरनुसार, शाकाहारींनी दरमहा अंदाजे २.६ किलो डाळींचे सेवन करावे आणि मांसाहारींनी १.७ किलो डाळींचे सेवन करावे. तथापि, देशभरातील २८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील आकडेवारीवरून लोक दरमहा एक किलोपेक्षा कमी डाळींचे सेवन करत असल्याचे दिसून आले.

### कॅनडात भारतीय विद्यार्थिनीची हत्या

◆ **ओटावा, २८ मे**

कॅनडामध्ये एका भारतीय विद्यार्थिनीची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. विधी कल्पेशभाई मेघानी, असे हत्या झालेल्या मुलीचे नाव आहे. ती मूळची गुजरातच्या आणंद जिल्ह्यातील बोरसद येथील रहिवासी आहे.

विधी कॅनडातील नियाग्रा भागात राहत होती आणि तिथे शिक्षण आणि नोकरी करीत होती. विधी नियाग्रातल्या तिच्या घरातून बाहेर पडली. त्यावेळी तिच्यावर अज्ञात व्यक्तीने चाकू हल्ला केला. ती रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी तिला रुग्णालयात पोहोचविले. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या प्रकरणी कॅनडा पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे. हत्येचे कारण अद्याप समोर आलेले नाही. दरम्यान कॅनडामध्ये भारतीय विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवर हल्ले आणि त्यांची हत्या होणे हे प्रकार नित्याचे झाले आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मान्सूनपूर्व पाऊस २९ मे ते ५ जून दरम्यान येणार?

**नवी दिल्ली** : भारताच्या ८० ते ९० टक्के भागात २९ मे ते ५ जून दरम्यान मान्सूनपूर्व पाऊस पडू शकतो. हा मान्सून अजून केरळमध्ये पोहोचलेला नाही. हवामान विभागाने २६ मे रोजीचा अंदाज वर्तविला होता. मान्सून येण्यासाठी केरळमधील १४ निश्चित स्थानकांवर सलग दोन दिवस २.५ मिमी पाऊस पडणे आवश्यक आहे. दक्षिण-मध्य अरबी समुद्रातील चक्रीवादळामुळे ढग कमकुवत झाले आहेत. पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून पुढे सरकू शकतो. उपग्रह, सागरी आणि वातावरणीय माहितीच्या आधारे हवामानाचा नकाशा तयार करते. त्याच्या चित्रामध्ये पुढील आठ दिवसांत दक्षिण भारत, पूर्व भारत, ईशान्य आणि बंगालच्या उपसागराला लागून असलेल्या भागांमध्ये जास्त पावसाचे संकेत दिसत आहेत. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सूर्याची किरणे भारताच्या मोठ्या भागावर जवळजवळ सरळ पडतात. यामुळे जमीन वेगाने गरम होते आणि तापमान वाढते. नवतपाच्या तीव्र उष्णतेपासून आणि उष्माघातापासून वाचण्यासाठी बाहेर पडताना आवश्यक वस्तू सोबत ठेवा; जेणेकरून शरीर हायड्रेटेड राहील.

# नक्षल्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

## गडचिरोली पोलिसांची मोठी कारवाई

◆ **गडचिरोली, २८ मे**

गडचिरोली पोलिस आणि नारायणपूर पोलिसांच्या संयुक्त आंतरराज्यीय अभियानात माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला असून, मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले. आत्मसमर्पित माओवाद्यांकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

ऑपरेशन 'अंतिम प्रहार' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत १ इन्सास रायफल, २ सिंगल शॉट रायफल, २ बारा बोअर रायफल आणि १८ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. तसेच २५ किलो आयईडी स्फोटक, २ क्लेमोर, ११० डेटोनेटर, कॉर्टेक्स वायर, ५०० पेक्षा अधिक बीजीएल सेल, ७ बीजीएल लॉन्चर, ३ ट्यूब लॉन्चर आणि शस्त्रनिर्मितीसाठी वापरली जाणारी लेथ मशीन, मोटार, ग्राईंडर मशीन, इन्व्हर्टर, बॅटरी, सोलर प्लेट आदी साहित्यही हस्तगत करण्यात आले.



जप्त करण्यात आलेले शस्त्रनिर्मिती साहित्य

गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळ जवळपास संपुष्टात आली असली तरी सीमावर्ती दुर्गम जंगल परिसराचा वापर करून माओवादी शस्त्र व स्फोटक साहित्य लपवून ठेवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. सुरक्षा दलांवर घातपात करण्याच्या उद्देशाने हे साहित्य वापरले जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनात २६ मे रोजी विशेष अभियान पथक प्राणहिता, डीआरजी नारायणपूर आणि बीडीडीएस प्राणहिता यांच्या संयुक्त पथकाने महाराष्ट्र-छत्तीसगड सीमावर्ती जंगल परिसरात शोधमोहीम राबविली. २७ मे रोजी ही कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक एम. रमेश, अपर पोलिस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., अपर पोलिस अधीक्षक अहेरी हर्षवर्धन बी. जे., पोलिस उपअधीक्षक विशाल नागरगोजे आणि नारायणपूरचे पोलिस उपअधीक्षक मनोज मंडावी यांच्या मार्गदर्शनात पार पडली.

◂(तभा वृत्तसेवा)



# मुख्यमंत्री फडणवीस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाच्या विविध प्रकल्पांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली.

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट ही नेहमीच अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जा देणारी असते, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीनंतर व्यक्त केली. मुख्यमंत्री फडणवीस कालपासून दिल्ली दौऱ्यावर असून केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांच्या समवेत काल ऊस आणि कांदा उत्पादकांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच सिंचन प्रकल्प,जलजीवन मिशन आदींबाबत महत्त्वपूर्ण बैठका झाल्या होत्या.

◂(तभा वृत्तसेवा)

### राज्याचे विषय सोडवण्यासाठी दिल्लीत आलो: एकनाथ शिंदे



महाराष्ट्राचे विषय केंद्रात प्रलंबित होते, त्यामुळे ते सोडवण्यासाठी आम्ही दिल्लीत आलो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. उध्दव ठाकरे यांच्या सरकारला केंद्र सरकारशी बोलणे अडचणीचे वाटत होते, आम्ही मात्र सर्व प्रश्नावर केंद्र सरकारशी बोलतो आणि राज्याचे प्रश्न सोडवून घेतो. राज्यासाठी जे आवश्यक आहे, ते मागण्यात गैर काय आहे? तो आमचा अधिकार आहे, असे ते म्हणाले. विधानपरिषदेच्या निवडणुकीतील जागावाटप सन्मानाने होईल, या मुद्यावरुन महायुतीत कोणतेच मतभेद नाहीत, असे स्पष्ट करत शिंदे म्हणाले की, महायुतीत काय चालले, ते तुम्हाला उद्या कळेल. जागावाटपाचे सूत्र मुख्यंत्र्यांनी बुधवारीच सांगितले आहे. महाविकास आघाडी १७ जागा लढत असली तरी एकही जागा त्यांना मिळणार नाही, असे ते म्हणाले.

# भाजपाने चार प्रदेश अध्यक्ष बदलले

## केंद्रीय मंत्री हर्ष मल्होत्रा दिल्ली भाजपाचे अध्यक्ष

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

भारतीय जनता पार्टीने संघटनात्मक बदल करताना दिल्ली, पंजाब, हरयाणा आणि त्रिपुरा या चार राज्यांत नवे अध्यक्ष नियुक्त केले आहेत. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या अनुमतीने भाजपाचे राष्ट्रीय महासचिव अरुणसिंह यांनी गुरुवारी या नियुक्त्यांची घोषणा केली.

केंद्रीय रस्ते वाहतूक राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांना दिल्ली भाजपाचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. वीरेंद्र सचदेवा आतापर्यंत दिल्ली प्रदेश भाजपाचे अध्यक्ष होते. हर्ष मल्होत्रा पूर्व दिल्लीचे खासदार आहेत. २०१२ मध्ये नगरसेवक म्हणून त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीला प्रारंभ केला, २०१५ मध्ये पूर्व दिल्ली महानगरपालिकेचे ते महापौर झाले. २०२४ मध्ये पहिल्यांदा ते लोकसभेवर निवडून आले आणि त्यांचा केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश झाला.

माजी आमदार केवलसिंह ढिल्लो यांना पंजाब प्रदेश भाजपाचे अध्यक्ष बनवण्यात आले आहे. आतापर्यंत ढिल्लो पंजाब भाजपाचे उपाध्यक्ष होते. सुनील जाखड सध्या पंजाब भाजपाचे अध्यक्ष आहेत. जाखड यांचा अध्यक्षपदाचा तीन वर्षांचा कार्यकाळ जुलै महिन्यात संपत आहे. ढिल्लो पंजाबचे माजी मुख्यमंत्री कॅप्टन अमरिंदरसिंग यांचे निकटवर्ती आहेत. २०२२ मध्ये त्यांनी काँग्रेसमधून भाजपात प्रवेश केला. पंजाब विधानसभेची निवडणूक २०२७ मध्ये होणार आहे. त्यामुळे ढिल्लो यांच्या नियुक्तीला महत्व आले.

◂(तभा वृत्तसेवा)



हर्ष मल्होत्रा



केवलसिंग ढिल्लो



अभिषेक देबरॉय



अर्चना गुप्ता

### अर्चना गुप्ता दुसऱ्या महिला अध्यक्ष

**हरयाणा प्रदेश भाजपाची जबाबदारी डॉ. अर्चना गुप्ता यांच्याकडे सोपवण्यात आली. मोहनलाल बडोली यांच्या जागेवर डॉ. गुप्ता यांची नियुक्ती करण्यात आली. गुप्ता प्रदेश भाजपाच्या आतापर्यंत महासचिव होत्या. अर्चना गुप्ता या हरयाणा भाजपाच्या दुसऱ्या महिला अध्यक्ष आहेत. याआधी डॉ. कमला वर्मा १९८० ते १९८३ या काळात हरयाणा भाजपाच्या अध्यक्ष होत्या. अभिषेक देबरॉय त्रिपुरा भाजपाचे अध्यक्ष म्हणून काम पाहणार आहेत.**

### सुरतच्या शेतकऱ्याने केले केळीचे विक्रमी उत्पादन

**सुरत** : सुरतमधील एका तरुण शेतकऱ्याचे वडील, अनेक वर्षे रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर केल्यामुळे कर्करोगाला बळी पडले. या घटनेचा त्याच्यावर खोलवर परिणाम झाला आणि त्याने नैसर्गिक शेती करण्याचा निर्णय घेतला. कल्पेश पटेलने केवळ रासायनिक खतांवर होणारा खर्चच वाचवला, तसेच केळीच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली. मागील वर्षी, त्याच्या शेतातील केळीच्या एका घडचे वजन ७३ किलो भरले, तर या तुलनेत सरासरी वजन २० किलो असते. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कल्पेशशी संवाद साधून त्याच्या यशाची गाथा समाज माध्यमावर सामायिक केल्यानंतर, त्याच्या नैसर्गिक केळी शेतीला राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळाली.

# २१ प्रादेशिक पक्षांचा उत्पन्नापेक्षा जास्त खर्च

## २०२४-२५ मध्ये ५१ टक्क्यांनी घसरले उत्पन्न

◆ **नवी दिल्ली, २८ मे**

मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये ३६ प्रादेशिक राजकीय पक्षांचे एकत्रित उत्पन्न ५१ टक्क्यांपेक्षा जास्त घटले. यापैकी २१ पक्षांनी त्यांच्या घोषित उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला, असे असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्सने (एडीआर) एका अहवालात म्हटले आहे.

हा अहवाल २७ मे रोजी जारी करण्यात आला. यात ५७ मान्यताप्राप्त प्रादेशिक पक्षांपैकी अशा ३६ पक्षांच्या लेखापरीक्षित खात्यांचे विश्लेषण करण्यात आले, ज्यांचे आर्थिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक लेखापरीक्षण अहवाल निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उलब्ध होते.

लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची ३१ ऑक्टोबर २०२५ ही मुदत उलटल्यावर २०७ दिवस झाल्यावरही ६७ पैकी ३६ प्रादेशिक पक्षांनी हे लेखापरीक्षण सादर केलेले नाही, असे या अहवालात म्हटले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रादेशिक पक्षांचे एकूण उत्पन्न १,१९२.९४ कोटी रुपये इतके राहिले. हे उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील २,४६३.१७ कोटी रुपयांच्या तुलनेत १,२७०.२३ कोटी रुपयांनी म्हणजेच ५१.५७ टक्क्यांनी कमी झाले.

तथापि, या पक्षांनी जाहीर केलेला एकूण खर्च १,४३३.०७ कोटी रुपयांवर पोहोचला. हा त्यांच्या एकत्रित उत्पन्नापेक्षा २४०.१२ कोटी रुपयांनी म्हणजे सुमारे २० टक्क्यांनी जास्त होता, असे एडीआरने अहवालात म्हटले आहे.

विश्लेषण करण्यात आलेल्या पक्षांपैकी, पहिल्या पाच पक्षांचा एकूण उत्पन्नापेक्षा जवळपास ६९ टक्के आणि एकूण खर्चामध्ये ७७ टक्क्यांपेक्षा जास्त वाटा होता. या प्रादेशिक पक्षांमध्ये तेलुगू देसम पार्टीने सर्वाधिक २२८.३१ कोटी रुपयांचे उत्पन्न जाहीर केले. हे उत्पन्न त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या १९.१४ टक्के इतके आहे. यानंतर अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस २१९.३५ कोटी रुपयांसह आणि वायएसआर काँग्रेस १४०.३९ कोटी रुपयांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

खर्चाच्या आघाडीवर वायएसआर काँग्रेसने सर्वाधिक ३४०.२० कोटी रुपये खर्च केले, त्यानंतर बिजू जनता दलाने २८८.४४ कोटी रुपये आणि एआयटीसीने २२७.५९ कोटी रुपये खर्च केले. ३६ पैकी २१ पक्षांनी वर्षादरम्यान जमा केलेल्या उत्पन्नापेक्षा अधिक खर्च केला. वायएसआर काँग्रेसने सर्वाधिक अतिरिक्त खर्चाची नोंद केली असून, त्यांनी आपल्या उत्पन्नापेक्षा ११९.८२ कोटी रुपये अधिक खर्च केले. ही रक्कम त्यांच्या कमाईच्या १४२.३३ टक्के इतकी आहे. एआयटीसी, बीआरएस, जदयू आणि समाजवादी पक्षांनीही आपल्या उत्पन्नापेक्षान जास्त खर्च झाल्याचे नमूद केले आहे.

◂(वृत्तसंस्था)



# स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

◆ **मुंबई, २८ मे**

प्रखर राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. येथील लोकभवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राज्यपालांनी स्वातंत्र्यवीरांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. या अभिवादनपर कार्यक्रमाला राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती आणि परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मंत्रालयात त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्वातंत्र्यवीरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले. या कृतज्ञता सोहळ्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे कक्ष अधिकारी निलेश हरड यांच्यासह मंत्रालयातील अनेक अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◂(तभा वृत्तसेवा)

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून आदरांजली

नवी दिल्लीः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यानंतर कोपरनिकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर विमला यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विशेष आयुक्त श्वेता सिंघल, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल आदी उपस्थित होते.

# हवालाचे १.२२ कोटी घेऊन जाणाऱ्याला अटक

◆ **हैदराबाद, २८ मे**

मुंबईहून हैदराबादला हवालाचे पैसे घेऊन जाणाऱ्या एका व्यक्तीच्या ताब्यातून १.२२ कोटी रुपये रोख जप्त करण्यात आली असून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती सरकारी रेल्वे पोलिसांनी बुधवारी दिली.

मंगळवारी सरकारी रेल्वे पोलीस सिकंदराबादने आरपीएफ कर्मचाऱ्यांसोबत केलेल्या संयुक्त तपासणीदरम्यान, देवगिरी एक्सप्रेसने हवालाचे पैसे घेऊन जाणाऱ्याला अटक करण्यात आली, असे एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. बोलाराम आणि मलकाजगिरी रेल्वे स्थानकांदरम्यान एक बॅग घेऊन फिरणाऱ्या या व्यक्तीबद्दल अधिकाऱ्यांना संशय आला. चौकशीत हा व्यक्ती महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील असल्याचे उघड झाले.

२५ मे रोजी त्याला मुंबईतील एका दागिन्यांच्या दुकानदाराकडून एक कोटी २२ लाख ७० हजार रुपये मिळाले होते. सराफाच्या सूचनेनुसार, तो देवगिरी एक्सप्रेसने सिकंदराबादला रोख रक्कम घेऊन जात होता. ती सिकंदराबादच्या मोंडा मार्केटमध्ये कथितपणे दागिन्यांचे दुकान चालवणाऱ्या एका व्यक्तीला सुपूर्द करायची होती. रोख रक्कम वाहून नेण्यासाठी त्याला पाच हजार रुपयांचे आमिष दाखवण्यात आले होते.

◂(वृत्तसंस्था)

# उष्माघाताने जीव गेल्यास सरकार जबाबदार : जरांगे

## ३० मेपासून करणार बेमुदत उपोषण

◆ **आंतरवाली, २८ मे**

आंतरवालीमध्ये ३० मे रोजी रखरखत्या उन्हात बाजेवर बसत आमरण उपोषण करणार आहे. ना पाणी घेणार, ना काही. जे होईल ते होईल. आता उष्माघाताने माझा बळी गेला तर त्याला सरकार जबाबदार असेल, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

आता होणारे उपोषण खूप कडक होणार आहे. सरकारला पाहिजे त्यापेक्षा जास्त वेळ दिला आहे. २९ मे रोजी १० महिने पूर्ण होत आहेत. गोरगरीब मराठ्यांच्याच लेकरांवर अन्याय केला जातो. मला काही प्रसाद लाड यांना दोष द्यायचा नाही. मी मराठा आहे. मी उगाच कोणाला बोलत नाही. त्यांनी आमच्या माता-भगिणींना मारले म्हणून आम्ही त्यांना बोलतो, असे जरांगे म्हणाले.



अनेकांचे फोन आले पण मी फोनवर चर्चा करणार नाही. माझ्या समाजासाठी मी काम करत आहे. इतके क्रुर सरकार कधी आले नसेल. पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाज सधन आहे म्हणून त्यांना आरक्षण देता येणार नाही, असे सरकार सांगते.

◂(वृत्तसंस्था)

# गाडीला आग लागल्याने चार जण जिवंत जळाले

◆ **राजस्थान, २८ मे**

राजस्थानमधील अजमेर जिल्ह्यातील बोराडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील श्रीरामपुरा गावात गुरुवारी सकाळी अपघात घडला. गाडीला अचानक आग लागल्याने चार जण जिवंत जळले. हा अपघात घातपात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

माजी सरपंच, त्यांची पत्नी आणि त्यांची भाची यांच्यासह तिघांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात गंभीररित्या भाजलेल्या एका जिल्हा परिषद सदस्याचाही उपचारादरम्यान मृत्यू झाला. श्रीरामपुरा गावचे रहिवासी असलेले माजी सरपंच राम सिंह चौधरी हे छातीत दुखत असल्याची तक्रार करणाऱ्या त्यांच्या आई आणि जिल्हा परिषद सदस्य पूसी देवी यांना रुग्णालयात घेऊन जात होते. ते पहाटे ५:३० च्या सुमारास त्यांच्या गाडीतून निघाले. राम सिंह चौधरी यांच्यासोबत त्यांची पत्नी (माजी सरपंच) सुरग्यन देवी आणि त्यांची भाची महिमा यादेखील गाडीत होत्या. गावापासून थोड्याच अंतरावर असलेल्या श्रीरामपुरा जवळ एका धावत्या गाडीला अचानक आग लागली. गाडीचे दरवाजे उघडत नसल्याने राम सिंग चौधरी, त्यांची पत्नी सुरग्यन देवी आणि भाची महिमा हे तिघेही गाडीत अडकले. तिघांचाही जागीच जळून मृत्यू झाला.



राम सिंग यांची आई, पूसी देवी, ज्या गाडीत प्रवासी म्हणून होत्या, त्यांना कसेबसे बाहेर काढण्यात आले, पण तोपर्यंत त्या ६० टक्क्यांहून अधिक भाजल्या होत्या आणि उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला.

◂(वृत्तसंस्था)

# शायर बशीर बद्र यांचे निधन

◆ **भोपाळ, २८ मे**

प्रख्यात शायर डॉ. बशीर बद्र यांचे गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भोपाळ येथे निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. बद्र हे बऱ्याच काळापासून डिमेंशिया (स्मृतिभ्रंश) या आजाराने ग्रस्त होते. त्यांची स्मरणशक्ती पूर्णपणे लयाला गेली होती आणि त्यांना लोकांना ओळखणेही अशक्य झाले होते. मागील काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती सातत्याने खालावत होती. जेव्हा कधी त्यांना एखाद्या मुशायऱ्याची आठवण करून दिली जाई, तेव्हा ते ''इर्शाद! इर्शाद!'', असे म्हणायचे. बद्र यांनी उर्दू गझलला एक नवा सूर दिला. क्लिष्ट शब्दरचनेऐवजी साध्या आणि सोप्या शब्दांचा वापर करून त्यांनी आपली शायरी केली. त्यांच्या अंत्यसंस्काराची वेळ अद्याप निश्चित झालेली नाही. तथापि, कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी संध्याकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाण्याची शक्यता आहे. बशीर बद्र यांच्या शायरीमध्ये प्रेम, वेदना आणि जीवनातील अनुभवांची झलक मिळते.



१९६९ मध्ये बशीर बद्र यांनी एएमयू मधून पदव्युत्तर पदवी देखील घेतली होती. शायर बशीर बद्र यांनी १२ ऑगस्ट १९७४ रोजी मेरठ कॉलेजच्या उर्दू विभागात व्याख्याता म्हणून रुजू झाले होते. ते येथे १९९० पर्यंत राहिले. १९७४-१९९० चा काळ बशीर बद्र यांच्यासाठी खूप महत्त्वाचा ठरला. तेव्हा ते शायरीच्या शिखरावर पोहोचले होते.

◂(वृत्तसंस्था)

# फार्मासिस्टना पाच लाखांचे अपघाती विमा कवच

## 'एमआरपीए'च्या लढ्याला मोठे यश

◆ **मुंबई, २८ मे**

राज्यातील नोंदणीकृत फार्मासिस्टसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी आहे. महाराष्ट्र स्टेट फार्मसी कौन्सिलने फार्मासिस्टसाठी पाच लाख रुपयांची अपघाती विमा योजना अधिकृतपणे लागू केली आहे. महाराष्ट्र रजिस्टर्ड फार्मासिस्ट असोसिएशनच्या (एमआरपीए) सततच्या पाठपुराव्यामुळे आणि आग्रही मागणीमुळे कौन्सिलने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून फार्मासिस्टच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर होता. या अनुषंगाने एमआरपीएचे अध्यक्ष कैलास तांदळे यांनी अपघाती विम्याची मागणी लावून धरली होती. त्यांच्या या लढ्याला अखेर यश आले असून, कौन्सिलने या मागणीची दखल घेत विमा योजना जाहीर केली आहे.

फार्मासिस्टच्या हितासाठी आणि त्यांना सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यासाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे,अशी प्रतिक्रिया कैलास तांदळे यांनी या निर्णयानंतर व्यक्त केली. या योजनेमुळे राज्यातील ५ लाखांपेक्षा अधिक नोंदणीकृत फार्मासिस्टना मोठे सुरक्षा कवच प्राप्त झाले आहे.

अपघाती मृत्यू किंवा अपंगत्वः दुर्दैवाने कोणताही मोठा अपघात होऊन मृत्यू ओढवल्यास किंवा अपंगत्व आल्यास, संबंधित फार्मासिस्टला किंवा त्यांच्या कुटुंबाला विम्याची रक्कम दिली जाईल.

आर्थिक आधारः नोकरी किंवा व्यवसाय करत असताना अचानक येणाऱ्या संकटांना तोंड देण्यासाठी हा विमा फार्मासिस्टच्या कुटुंबासाठी एक मोठा आर्थिक आधार ठरणार आहे.

◂(वृत्तसंस्था)

### योजनेला महादेवलाल श्रॉफ यांचे नाव देण्याची मागणी

दरम्यान, या महत्त्वपूर्ण योजनेला कोणत्याही जिवंत व्यक्तीचे नाव देऊ नये, अशी भूमिका राज्यातील फार्मासिस्टनी घेतली आहे. त्याऐवजी, भारतीय फार्मसीचे जनक महादेवलाल श्रॉफ यांच्या स्मरणार्थ या योजनेला 'महादेवलाल श्रॉफ फार्मासिस्ट सुरक्षा कवच विमा योजना 'असे नाव द्यावे, अशी आग्रही मागणी राज्यभरातील फार्मासिस्टकडून जोर धरत आहे. यामुळे खऱ्या अर्थाने या क्षेत्रातील योगदानाचा सन्मान होईल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# शुद्ध, पवित्र आणि पारदर्शक!

लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव म्हणून ज्याचे वर्णन केले जाते, त्या निवडणुकांची पालखी मतदारयाद्यांच्या खांद्यावरून पुढे जात असते. गेल्या काही वर्षांत देशात विरोधकांकडून मतदारयाद्यांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्याचे अनेक प्रयत्न झालेत. मतदारयादी, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यांच्या तांत्रिक विश्वासार्हतेवर जाहीरपणे आक्षेप घेतले गेले आणि हे वाद थेट न्यायालयांपर्यंत पोहोचले. निवडणुकांचा उत्सव ज्यांच्या अधिकाधिक सहभागातून साजरा करावयाचा असतो, त्या मतदारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्हे उमटविली जात असल्याचा आक्षेपही घेतला गेला. निवडणूक आयोगास सरकारच्या ताटाखालचे मांजर ठरवून मतदारांमध्ये आयोगाच्या स्वायत्ततेबाबत संभ्रम पसरविण्याचाही प्रयत्न झाला. या गदारोळाला आता पूर्णविराम मिळेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. निवडणूक आयोगाने बिहार आणि अन्य राज्यांत पार पाडलेली मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी मोहीम ही नि:संदिग्धपणे शुद्ध कायदेशीर प्रक्रिया आहे आणि ती रद्द केली जाऊ शकत नाही, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने, या प्रक्रियेच्या विरोधात सातत्याने गरळ ओकून लोकशाहीचा उत्सव निर्भेळपणे साजरा करण्याच्या सद्हेतूवर शंका उमटविण्याचे प्रयत्न आता थंडावतील.

गेल्या वर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काही मुद्रित माध्यमांत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीविषयी संशय व चिंता व्यक्त करणारे लेख प्रसिद्ध केले होते. त्याआधी फेब्रुवारी महिन्यात लोकसभेतही त्यांनी हाच सूर आळवला होता. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमध्ये बनावट नावे घुसविल्याचा आक्षेप घेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध जोरदार मोहीम उघडली होती. निवडणूक आयोगाने राहुल गांधींच्या आरोपांतील प्रत्येक मुद्दा सप्रमाण खोडून काढत त्याचे शब्दशः खंडन केल्यानंतरही हा वाद चिघळत ठेवण्याची मोहीम विरोधकांनी सुरू केली होती. राहुल गांधींच्या अशाच आक्षेपाच्या सुरात सूर मिसळणारी एक याचिका त्या दरम्यान सुनावणीसाठी उच्च न्यायालयासमोर होती आणि प्रकाश आंबेडकर यांनी हा सूर हिरिरीने न्यायालयातही आळविला होता. पण न्यायालयानेही हे सारे आक्षेप फेटाळून तर लावलेच, पण अशी याचिका केवळ संभ्रम पसरविण्याच्या व न्यायालयाचा वेळ वाया घालविण्याच्या उद्देशाने केली गेल्याचा ठपका ठेवत याचिकाकर्त्यांचे कानही उपटले होते. खरे म्हणजे, निवडणुका, मतदारयाद्यांची स्पष्टता व निवडणूक आयोगाची भूमिका याबाबत चालविल्या गेलेल्या मोहिमेतून पसरणाऱ्या संभ्रमांचे पितळ तेव्हाच उघडे पडले होते. वस्तुतः, बिहारमधील विधानसभेच्या निवडणुकीआधी निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदारयाद्यांच्या शुद्धीकरण मोहिमेमुळे विरोधकांत अस्वस्थता माजण्याचे काहीएक कारण नव्हते. सुमारे चार दशकांत मतदारयादीमध्ये नोंदविल्या गेलेल्या मतदारांच्या नावांची काटेकोर छाननी सुरू झाल्यानंतर या याद्यांमध्ये नेपाळी, बांगलादेशी, म्यानमारच्या रोहिंग्यांची मतदार म्हणून घुसखोरी झाल्याचेही स्पष्ट झाले आणि निवडणुका जिंकण्याच्या नीतीचे किती अध:पतन झाले याची चुणूकही दिसू लागली. अशी छाननी वेळीच झाली नसती, तर बिहारच्या निवडणुकीत विजयी होऊन लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात दाखल झालेले नेते नक्की कोणाचे प्रतिनिधित्व करतात, याची उत्तरेही कधीच मिळाली नसती. त्यामुळे छाननी प्रक्रियेचे स्वागत होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र आयोगाच्या या मोहिमेवरच आक्षेप घेण्यामागची धास्ती नेमकी कशापायी याचे उत्तर लपून राहिले नव्हते.

अशी पडताळणी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार अबाधित असल्याचा निर्वाळा देऊन सर्वोच्च न्यायालयाने आता या प्रक्रियेवरील सर्व आक्षेपांमधील हवा काढून घेतल्याने दोन बाबी स्पष्ट झाल्या आहेत. पहिली म्हणजे, निवडणूक आयोगाच्या अधिकारावर उमटविली गेलेली प्रश्नचिन्हे, सातत्याने घेतले जाणारे आक्षेप आता पुसले जाणार असून, या देशातील लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार केवळ या देशातील पात्र मतदार असलेल्या नागरिकांनाच असल्याने, बेकायदा घुसखोरांचे या अधिकारांवरील अतिक्रमण हटणार आहे. अशा घुसखोरीमुळे आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये किती गढूळपणा मिसळला असेल, याचा अंदाज करणे काहीसे अवघड आहे, पण सर्वोच्च न्यायालयाने निःसंदिग्ध निर्वाळा देऊन या प्रक्रियेस वैधता बहाल केल्यामुळे आता शुद्धीकरणाची ही प्रक्रिया भारताच्या लोकशाहीस सुदृढ करण्यास साह्यभूत ठरेल यात शंका नाही. मतदारयाद्यांची सखोल पडताळणी ही कायदेशीर प्रक्रिया आहे आणि ही प्रक्रिया हाती घेण्याचा निवडणूक आयोगास घटनात्मक अधिकारदेखील आहे असे स्पष्ट करून न्यायालयाने या प्रक्रियेची वैधता पूर्णपणे ग्राह्य धरली आहेच, शिवाय मुक्त, निष्पक्ष आणि न्याय्य निवडणुकांना चालना देण्यासाठी ही प्रक्रिया अनिवार्य असल्याने रद्द केली जाऊ शकत नाही, असेही स्पष्ट केले आहे. मतदारयादीत नाव नसलेली व्यक्ती नागरिक नाही असे नव्हे, पण मतदारयादीत नाव असलेली प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक आहे किंवा नाही याची प्राथमिक चौकशी करण्याचा अधिकार मात्र निवडणूक आयोगास असल्याने, मतदान करण्याचा अधिकार हा अमूल्य असला तरी तो अनिर्बंध नाही, याची जाणीवदेखील या निकालाने करून दिली आहे. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगास सातत्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून त्यांच्यावर प्रश्नचिन्हे लादण्याच्या राजकारणास आता लगाम बसायला हवा. कारण या निकालातूनच विरोधकांचे आक्षेप फेटाळले गेले असून आयोगास आणि केंद्र सरकारला फार मोठा कायदेशीर विजय मिळवून दिला आहे. देशातील १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांच्या विशेष सखोल तपासणी मोहिमेचा तिसरा टप्पा सुरू करण्याच्या गेल्या १४ तारखेस आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार महाराष्ट्रातील सुमारे नऊ कोटी ८६ लाख ६४ हजार मतदारांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता महाराष्ट्रात सुरू होणाऱ्या एसआयआर मोहिमेची वाटचाल अत्यंत संवेदनशील आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे. मतदारांची प्रारूप यादी ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येईल, तेव्हा आपल्या नावातील बदल, दुरुस्ती किंवा नवीन नाव नोंदणीचे दावे व हरकती सादर करण्याची प्रक्रिया सुरू होईल, असे आयोगाने त्या निर्देशात स्पष्ट केले आहे. त्यामुळे, मतदारयाद्या अंतिम स्वरूपात सिद्ध होतील तेव्हा त्या परिपूर्ण आणि निर्दोष राहतील याची काळजी घेण्याची जबाबदारी केवळ आयोगावरच नव्हे, तर राजकीय पक्ष आणि मतदारांवरही असणार आहे. म्हणजे, कायदेशीर लढाईत न्यायालयाने मतदारयाद्यांच्या तपासणी मोहिमेवरील विरोधकांचे आक्षेप दूर केले असल्याने आता विरोधकांना प्रत्यक्ष मैदानात उतरावे लागेल. मतदारयादीतून आपल्या मतदारांची नावे चुकीच्या पद्धतीने वगळली जाणार नाहीत, याची काळजी घेण्यासाठी राजकीय पक्षांना आपापले बुथ लेव्हल एजंट्स सक्रिय करावे लागतील. वगळण्यात आलेल्या मतदारांची यादी राजकीय पक्षांना उपलब्ध करून देण्याचे आणि छाननीसाठी मुदत देण्याचे सुरक्षा कवच जाहीर करून निवडणूक आयोगाने राजकीय वाद टाळण्याचा पारदर्शक प्रयत्न केला आहे. त्याचा काटेकोर वापर करत या शुद्धीकरण मोहिमेस हातभार लावून कालपरवापर्यंत सुरू ठेवलेल्या संभ्रम पसरविण्याच्या मोहिमांना विरोधकांनी पूर्णविराम दिला, तर विश्वासार्हता जपण्यासाठी ते महत्त्वाचे ठरेल. कारण ही मोहीम म्हणजे केवळ कागदोपत्री दुरुस्तीचाच उपक्रम नाही, तर लोकशाहीच्या शुद्धीकरणाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्वाळ्याने या मोहिमेला कायदेशीर पावित्र्य दिले आहे. एकही वैध मतदार मतदानापासून वंचित राहू नये आणि एकही अवैध मतदार यादीत असू नये, या दोन्ही तत्त्वांचा समतोल राखून हे पावित्र्य जपण्याची जबाबदारी आता सर्वांचीच राहणार आहे.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# आय. टी. आर. भरताना ही चूक करू नका!

### मूल्यांकन वर्ष २०२६-२७ मधील बदल आणि योग्य आय. टी. आर. निवडीचे महत्त्व

आयकर रिटर्न भरण्याचा हंगाम सुरू झाला की बहुतांश करदात्यांसमोर एकच प्रश्न उभा राहतो- ''मला कोणता आय. टी. आर. भरायचा?'' अनेक वेळा लोक इंटरनेटवरील माहिती, मित्रांचा सल्ला किंवा मागील वर्षाचा अनुभव वापरून रिटर्न भरतात. काही वेळा 'सोपे आहे' म्हणून आय. टी. आर. -१ निवडला जातो, तर काही जण फक्त फॉर्म १६ पाहून रिटर्न फाईल करतात. मात्र, योग्य आय. टी. आर. निवडणे ही केवळ एक औपचारिकता नसून संपूर्ण कर अनुपालन प्रक्रियेतील सर्वांत महत्त्वाची पायरी आहे. चुकीचा आय. टी. आर. निवडल्यास भविष्यात नोटीस, परतावा मिळण्यास विलंब, अतिरिक्त कर, दंड आणि काही प्रकरणांमध्ये संपूर्ण रिटर्न अवैध ठरण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे रिटर्न भरण्यापूर्वी ''कोणता आय. टी. आर. माझ्यासाठी योग्य आहे?'' हा प्रश्न विचारणे अत्यंत आवश्यक झाले आहे. मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी आयकर विभागाने आय. टी. आर. -१ मध्ये काही महत्त्वाचे बदल केले आहेत. या बदलांमुळे अनेक करदात्यांना दिलासा मिळणार असला तरी योग्य आय. टी. आर. निवडण्याची जबाबदारी अधिक वाढली आहे. पूर्वी

आय. टी. आर. -१ हा फॉर्म मुख्यतः पगारदार व्यक्ती, पेन्शनधारक आणि मर्यादित उत्पन्न असलेल्या करदात्यांसाठी वापरला जात असे. मात्र आता दोन घराची मालमत्तापर्यंतची माहिती आय. टी. आर. -१ मध्ये देता येणार आहे. त्यामुळे स्वतःचे एक घर आणि दुसरे भाड्याने दिलेले घर असलेल्या व्यक्तींना किंवा दोन निवासी मालमत्ता असलेल्या कुटुंबांना याचा फायदा होणार आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि गृहकर्जाच्या उपलब्धतेमुळे अनेक कुटुंबांकडे दोन मालमत्ता असतात. त्यामुळे हा बदल मोठ्या प्रमाणात मध्यमवर्गीय करदात्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

याचबरोबर, शेअर मार्केट आणि म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करणाऱ्या करदात्यांसाठीही एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. पूर्वी लहान प्रमाणात दीर्घकालीन भांडवली नफा असतानाही अनेक करदात्यांना आय. टी. आर. -२ भरावा लागत होता. आता कलम ११२अ अंतर्गत १.२५ लाखांपर्यंत दीर्घकालीन भांडवली नफा असल्यास आणि काही अटी पूर्ण होत असल्यास आय. टी. आर. -१ वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. एसआयपी, इक्विटी म्युच्युअल फंड आणि शेअर बाजारातील गुंतवणूक वाढत असताना हा बदल मोठ्या प्रमाणात पगारदार गुंतवणूकदारांसाठी




दिलासादायक ठरू शकतो. मात्र, यामध्ये भांडवली तोटा पुढे नेणे नसणे आणि इतर प्रकारचे भांडवली नफा नसणे यासारख्या अटी लक्षात घेणे आवश्यक आहे.

मात्र, आय. टी. आर. -१ मध्ये सवलती वाढल्या म्हणजे प्रत्येकासाठी आय. टी. आर. -१ योग्य ठरेल असे नाही. अनेक वेळा करदाते फक्त सोयीसाठी किंवा कमी माहितीमुळे चुकीचा फॉर्म निवडतात. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीकडे भांडवली नफा, परकीय मालमत्ता, कंपनी संचालक पद, असूचीबद्ध शेअर्स किंवा व्यावसायिक उत्पन्न असेल आणि तरीही त्यांनी आय. टी. आर. -१ भरला, तर पुढे गंभीर अडचणी निर्माण होऊ शकतात. आज आयकर विभाग एआयएस, फॉर्म २६एएस, टीडीएस डेटा, म्युच्युअल फंड व्यवहार, मालमत्ता नोंदणी, व्याज उत्पन्न आणि इतर अनेक माहिती स्रोत एकत्र करून परत सत्यापित करा करतो. त्यामुळे चुकीची माहिती किंवा चुकीचा फॉर्म वापरणे सहज लक्षात येते.

चुकीचा आय. टी. आर. भरल्यास सर्वांत प्रथम सदोष परतावा सूचना येण्याची शक्यता असते. कलम १३९(९) अंतर्गत विभाग सदोष परतावा घोषित करू शकतो आणि ठरावीक कालावधीत दुरुस्ती करण्यास सांगू शकतो. वेळेत सुधारणा केली नाही तर अवैध परत करा होण्याचा धोका निर्माण होतो. याचा अर्थ असा की जणू परतावे भरलाच गेला नाही. त्यानंतर विलंब शुल्क, व्याज आणि नॉन-फाइलिंगचे परिणाम लागू होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये परतावा प्रक्रिया देखील थांबू शकते. अनेक करदाते परतावा का अडकला हे शोधत असतात, परंतु त्यामागे चुकीचा

आय. टी. आर. किंवा माहितीतील जुळत नाही हे कारण असते.

आज ए. आय. एस आणि फॉर्म २६एएस चे महत्त्व प्रचंड वाढले आहे. अजूनही अनेक करदाते फक्त फॉर्म १६ वर आधारित परतावे भरतात, परंतु ही सवय धोकादायक ठरू शकते. बँकेवरील व्याज, म्युच्युअल फंड रिडम्प्शन, लाभांश उत्पन्न, मालमत्ता व्यवहार किंवा इतर व्यवहार ए. आय. एस.मध्ये दिसत असतात. त्यामुळे परतावे भरण्यापूर्वी ए. आय. एस., टी. आय. एस. फॉर्म २६एएस, बँक स्टेटमेंट आणि भांडवली नफा विवरण तपासणे अत्यंत आवश्यक आहे.

योग्य आय. टी. आर. निवडण्यासाठी एक साधा नियम लक्षात ठेवणे आवश्यक आहे- ''उत्पन्नाचा स्रोत आय. टी. आर. ठरवतो, सोय नाही.'' फक्त पगार, व्याज उत्पन्न आणि मर्यादित घराच्या मालमत्तेचे उत्पन्न असल्यास आय. टी. आर. -१ योग्य ठरू शकतो. भांडवली नफा, एकाधिक मालमत्ता किंवा परकीय उत्पन्न असल्यास आय. टी. आर. -२ लागू होऊ शकतो. व्यवसाय किंवा व्यवसाय असल्यास

आय. टी. आर. -३ किंवा अनुमानित योजना असल्यास आय. टी. आर. -४ लागू होऊ शकतो. चुकीचा

आय. टी. आर. भरून नंतर सुधारित परतावा करण्यापेक्षा सुरुवातीपासून योग्य परतावे भरणे अधिक सुरक्षित असते. आज आय. टी. आर. हा केवळ कर अनुपालन दस्तावंज राहिलेला नाही. गृह कर्ज, व्यवसाय निधी, व्हिसा प्रक्रिया, सरकारी निविदा, मालमत्ता व्यवहार आणि बँकिंग उद्देश साठी आय. टी. आर. महत्त्वाचा दस्तऐवज बनला आहे. त्यामुळे चुकीचा आय. टी. आर. भविष्यात आर्थिक विश्वासार्हतेवरही परिणाम करू शकतो. मूल्यांकन वर्ष २०२६-२७ मधील बदलांमुळे काही करदात्यांसाठी प्रक्रिया अधिक सुलभ झाली असली तरी एक गोष्ट स्पष्ट आहे- योग्य आय. टी. आर. निवडणे ही केवळ तांत्रिक बाब नाही, तर आर्थिक सुरक्षिततेची गरज आहे. रिटर्न भरण्यापूर्वी सर्व उत्पन्न स्रोत तपासा, योग्य माहिती पडताळा आणि आवश्यक असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या. कारण एक चुकीचा आय. टी. आर. हा केवळ एक फॉर्म नसून भविष्यातील अनेक अडचणींची सुरुवात ठरू शकतो.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# साराजेवो सफारी

आपण भारतीय (अपवाद वगळता) नीतिमूल्ये मानणारे, देवाधर्माचे करणारे थोडक्यात पापभिरू असतो. सुखाच्या आणि आनंदाच्या आपल्या कल्पना खूप काही जगावेगळ्या नसतात. कुटुंबासोबत फिरायला जायचा विचार आला की, पहिला विचार असतो सफारीचा! सफारी म्हणताच डोळ्यांपुढे येते ती गर्द वनराई, रुबाबदार पण हिंस्त्र श्वापदांची डौलदार चाल, एखादा नवा पदार्थ, मोकळी हवा, भरपूर फोटोज आणि क्षणभर विश्रांती! पण, जगात सर्वत्र असे नाही. ज्या युरोपला शिस्त, स्वच्छता आणि आधुनिकतेसाठी आदर्श मानले जाते तिथे 'साराजेवो सफारी' हा बीभत्स प्रकार अस्तित्वात आला.

गेल्याच आठवड्यात बोस्निया युद्धातील गुन्ह्यांची सुनावणी नव्याने सुरू झाली आणि साराजेवो सफारी पुन्हा चर्चेत आली. साराजेवो हे युरोपातील एक सुंदर शहर! पहिल्या महायुद्धाची ठिणगी जिथे पडली ते साराजेवो! बोस्निया आणि हर्जगाव्हिना या दोन देशांची सामायिक राजधानी असलेल्या साराजेवोला १९९२ ते १९९५ दरम्यानच्या घटनाक्रमाने वॉर टुरिझमचे केंद्र म्हणून ओळख मिळाली. या काळात साराजेवोत मृत्यूने थैमान घातले. एकीकडे भीषण युद्धाला तोंड फुटले असताना, साराजेवोमध्ये मात्र महिला आणि लहान मुलांच्या हत्यांना ऊत आला होता. शहराच्या बाहेर असलेल्या डोंगरांवर बसून, स्नायपर दुर्बिणीने रस्त्यावर दिसलेल्या माणसांना टिपून त्यांची 'शिकार' करायची, असा हा श्रीमंती शौक! या खुल्या हत्यांसाठी हजारो डॉलर्स मोजले जात होते. स्नायपर सफारी सुरू असताना, घराबाहेर निघणे एवढाच त्या बिचाऱ्यांचा गुन्हा होता. सुरुवातीला कोण, कुठून आणि कशाला गोळ्या घालतंय? याचा काही अंदाजच येत नव्हता. विदेशातून आलेले गर्भश्रीमंत पण अमानुष लोक गंमत म्हणून या लोकांना मारत होते. भारतात राजेरजवाडे शिकारीला जात, तसे हे माणसांची शिकार करत होते. पैसे देऊन, स्नायपरने निशाणा लावायचा. शिकार मिळाली तर छानच पण, नाही मिळाली तर आणखी पैसे देऊन खेळ सुरू ठेवायचा.



बोस्नियाच्या सैन्याने ४ वर्षे साराजेवोला घेराव घातला होता आणि याच काळात साराजेवो सफारी सुरू झाली आणि फोफावली. त्यावेळी, युगास्लोव्हाकीयापासून वेगळे होऊन स्वतंत्र राष्ट्र बनण्यासाठी बोस्नियाचे लोक प्रयत्नशील होते. पण, बोस्नियाई सर्ब सैन्य मात्र याविरोधात होते. नागरिकांवर सूड उगविण्याची ही अमानुष पद्धत सर्ब सैन्याधिकाऱ्यांनी अमलात आणली. घराबाहेर निघणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण! शाळा-ऑफिसेस तर कधीच बंद पडलीत. दैनंदिन वस्तूंचा तुटवडा झाला. वेळेवर औषधं न मिळाल्यानेही मृत्यू झाले. शहरातील 'स्नायपर ऐली' नावाच्या रस्त्यावर सर्वाधिक मृतदेह सापडल्याची नोंद झाली.

या नृशंस हत्याकांडावर खरी चर्चा सुरू झाली ती २०२२ मध्ये आलेल्या 'साराजेवो सफारी' या माहितीपटानंतर! स्लोव्हेनियाच्या मिरान झुपनिक याने प्रत्यक्षदर्शींचे अनुभव, मारल्या गेलेल्यांच्या कुटुंबीयांच्या मुलाखती, शहरातील इमारतींमध्ये रुतलेल्या गोळ्या असे सगळे जगासमोर आणले आणि या घटना खोट्या असल्याचे दावे फोल ठरले. पत्रकार दोमगाज मार्गेटीक यांच्या 'पे ॲण्ड शूट' या पुस्तकाने ऑस्ट्रियामध्ये ही चर्चा आणि खुल्या तपासाला सुरुवात झाली. गेल्या वर्षी इटलीच्या मिलानमध्ये या संदर्भातील गुन्हे नोंदविण्यात आले. चार वर्षे चाललेल्या शहराच्या घेरावात ११ हजारांवर लोक मारले गेले. यात वृद्ध, महिला आणि मुलांची संख्या लक्षणीय होती. गंमत म्हणून माणसाची शिकार करणाऱ्यांमध्ये अमेरिकन, ऑस्ट्रियन आणि इटलीची बडी धेंडं हौशीने सहभागी झालीत. शहराची घेराबंदी आणि शहराबाहेरच्या डोंगरांवर बसलेले हौशी शिकारी अशा दुहेरी कात्रीत निष्पाप नागरिक फसले होते. या सफारीच्या माध्यमातून सर्ब सैन्याधिकाऱ्यांनी जबर कमाई केली. एका स्नायपर टुरिस्टकडून महिला-मुलांची शिकार करण्यासाठी ९० हजार डॉलर्स घेतले जात होते. हे 'शिकारी' आज ८०-९० वर्षांचे आहेत आणि त्यांची चौकशी सुरू आहे, यापेक्षा दुर्दैव आणखी काय असेल? दरम्यान, यापैकी एकही घटना कोणत्याही न्यायालयात सिद्ध होऊ शकलेली नाही. पण, लोकांचे अनुभव माणुसकीला काळिमा फासणारे आहेत. आपल्या मुंबईत ६० च्या दशकात रामण राघव या देशातील पहिल्या सीरियल किलरने दहशत निर्माण केली होती. थंड डोक्याने ४१ हत्या करणारा राघव मानसिक रुग्ण होता. तो एक होता पण, साराजेवोमध्ये येऊन माणसांना टिपणारे त्याच्यासारखे कित्येक इतिहासाच्या उदरात गडप झाले. सध्याचे फ्री फायर आणि पब जीसारखे खेळ 'क्रेझीनेस'च्या नावाखाली मनोरुग्णांची पिढी घडवत आहेत का?

९८५०३३९२४०

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# शहरातील 'सर्क्युलर इकॉनॉमी'

आधुनिक महानगरांचे स्वरूप एका विलक्षण विरोधाभासाचे प्रतीक बनले आहे. ही शहरे स्वतःचा विस्तार करताना एकाच वेळी स्वतःची उभारणी आणि स्वतःचे विघटनही करत असतात. एका बाजूला नवीन इमारती, उड्डाणपूल, मेट्रो मार्ग, महामार्ग आणि व्यावसायिक संकुले उभी राहत असतात, तर दुसऱ्या बाजूला जुनी बांधकामे जमीनदोस्त केली जात असतात. या अखंड चक्रातून निर्माण होणारा बांधकाम आणि पाडकाम कचरा म्हणजेच 'कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमॉलिशन वेस्ट' (सी ॲण्ड डी वेस्ट) हा आजच्या शहरीकरणाचा सर्वांत मोठा; पण सर्वांत कमी गांभीर्याने घेतला गेलेला प्रश्न ठरत आहे. भारतात दरवर्षी निर्माण होणाऱ्या या कचऱ्याचे प्रमाण १५० दशलक्ष टनांपासून ५०० दशलक्ष टनांपर्यंत असल्याचे विविध अंदाज सांगतात. या आकडेवारीतील प्रचंड तफावतच एक गंभीर समस्या अधोरेखित करते, ती म्हणजे आपण शहरांचा विकास मोजतो आहोत; पण त्या विकासातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे अचूक व्यवस्थापन अजूनही आपल्या हाताबाहेर आहे. वेगाने होणारे नागरीकरण आणि सातत्याने सुरू असलेली बांधकामे यामुळे दिल्ली दररोज सुमारे बारा हजार पाचशे टन घनकचरा निर्माण करते. यातील जवळपास पन्नास टक्के हिस्सा 'सी ॲण्ड डी' कचऱ्याचा असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे या कचऱ्यामध्ये पुनर्वापराची मोठी क्षमता आहे. दिल्ली महानगरपालिका या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी बक्करवाला, बुराडी, शास्त्री पार्क आणि राणीखेडा येथे चार पुनर्प्रक्रिया प्रकल्प चालवते. त्यांची एकत्रित क्षमता पाच हजार टन प्रतिदिन इतकी आहे. याशिवाय ओखला येथील टेकखंड परिसरात आणखी एक हजार टन क्षमतेचा प्रकल्प उभारला जात आहे.

ही केवळ कचरा प्रक्रिया केंद्रे नाहीत, तर शहरी व्यवस्थापनाच्या नव्या विचारसरणीची प्रतीके आहेत. याउलट, नवी दिल्ली महानगरपालिका अधिक विकेंद्रित पद्धतीने हा प्रश्न हाताळत आहे. येथे दररोज निर्माण होणारा ३५ ते ४० टन 'सी ॲण्ड डी' कचरा स्वतंत्र यंत्रणेद्वारे गोळा करून शास्त्री पार्क पुनर्प्रक्रिया प्रकल्पात वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया केला जातो. या दोन वेगवेगळ्या मॉडेल्समधून एक महत्त्वाचा संदेश मिळतो, तो म्हणजे 'सी ॲण्ड डी' कचरा व्यवस्थापनासाठी एकच सार्वत्रिक उपाय असू शकत नाही. प्रत्येक शहराच्या लोकसंख्येची घनता, प्रशासनाची क्षमता आणि उपलब्ध संसाधने यानुसार वेगवेगळ्या पद्धती विकसित कराव्या लागतील. गुरुग्राम आणि फरिदाबाद यासारख्या शहरांमध्येही या दिशेने प्रयत्न सुरू आहेत; पण त्यांची प्रगती वेगवेगळ्या टप्प्यांवर आहे. गुरुग्राममध्ये दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे दीड हजार टन 'सी ॲण्ड डी' कचऱ्यापैकी ८० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते, तर उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी नवीन प्रकल्प प्रस्तावित आहेत. दुसरीकडे, फरिदाबादमध्ये जमीननिश्चिती आणि नियोजन पूर्ण झाले असले, तरी प्रत्यक्ष प्रक्रिया केंद्र अद्याप कार्यान्वित झालेले नाही. यावरून स्पष्ट होते की धोरणात्मक इच्छाशक्ती असली तरी पायाभूत क्षमता उभारणे ही वेळखाऊ आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे.

भारत सरकारने २०२५ मध्ये जाहीर केलेले 'सी ॲण्ड डी वेस्ट मॅनेजमेंट रुल्स' या संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. या नियमांमध्ये प्रथमच 'एक्सटेंड प्रोड्युसर रिस्पॉन्सिबिलिटी' (ईपीआर) म्हणजेच बांधकाम करणाऱ्यांवरच कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. २०२५-२६ मध्ये २५ टक्के पुनर्वापराचे उद्दिष्ट ठेवून २०२८-२९ पर्यंत ते शंभर टक्क्यांपर्यंत नेण्याचा निर्धार करण्यात आला आहे. एक एप्रिलपासून हे नियम लागू झाले आहेत. या धोरणात्मक बदलामागील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कचरा निर्माण करणारा आणि त्याच्या पुनर्वापराची जबाबदारी स्वीकारणारा यांच्यातील तुटलेला संबंध पुन्हा जोडण्याचा प्रयत्न; मात्र केवळ नियम बनवून प्रश्न सुटत नाहीत. अनेकदा प्रशासनाची भूमिका 'कचरा हटवा' म्हणण्याइतपतच मर्यादित राहते. पंतप्रधान कार्यालय आणि गृहनिर्माण तसेच शहरी व्यवहार मंत्रालयाने मार्च २०२६ मध्ये दिल्लीतील एक लाख मेट्रिक टन 'सी ॲण्ड डी' कचरा हटवण्याचे अभियान राबवले; परंतु प्रक्रिया आणि पुनर्वापर यंत्रणा सक्षम नसेल, तर हा कचरा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवण्यापलीकडे फारसा फरक पडत नाही. म्हणूनच स्थानिक प्रशासनाच्या पातळीवर अधिक कठोर आणि परिणामकारक धोरणांची आवश्यकता आहे. दिल्ली महानगरपालिकेने नोव्हेंबर २०२५ मध्ये स्वतःच्या बांधकाम आणि देखभाल प्रकल्पांमध्ये पुनर्प्रक्रिया साहित्याचा वापर अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे, कारण पुनर्प्रक्रिया उद्योगाला सर्वांत मोठी गरज असते, ती स्थिर बाजारपेठेची.

सरकारी प्रकल्पांनीच पुनर्प्रक्रिया साहित्य स्वीकारल्यास खाजगी गुंतवणूक आणि प्रक्रिया पायाभूत सुविधा वेगाने विकसित होऊ शकतात. याचबरोबर कठोर अंमलबजावणीही आवश्यक आहे. गुरुग्राम महानगरपालिकेने २४ तास देखरेख, दंडात्मक कारवाई आणि निश्चित संकलन केंद्रांची व्यवस्था करून अनधिकृत डम्पिंगवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला आहे. चेन्नईमध्ये तर २०२६ पासून नियम मोडणाऱ्यांवर प्रति टन पाच हजार रुपयांपर्यंत दंड, वाहन जप्ती आणि 'रिअल-टाईम मॉनिटरिंग' यासारखी कठोर पावले उचलण्यात आली आहेत. हे बदल सूचित करतात, की भारतातील शहरी प्रशासन आता केवळ स्वच्छतेच्या पलीकडे जाऊन संसाधन व्यवस्थापनाच्या व्यापक चौकटीत विचार करू लागले आहे. तथापि, सर्वांत मोठे आव्हान मानसिकतेचे आहे. अनेकांना पुनर्प्रक्रिया साहित्य म्हणजे कमी दर्जाचे साहित्य अशीच धारणा आहे. त्यामुळे त्याचा वापर प्रामुख्याने भराव, लॅण्डफिल किंवा कमी मूल्याच्या कामांपुरताच मर्यादित राहतो. भारतामध्ये विकासाची व्याख्या दीर्घकाळ नव्या इमारती, रुंद रस्ते, उड्डाणपूल आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांपुरती मर्यादित राहिली; परंतु आता विकासाच्या या पारंपरिक संकल्पनेत मोठा बदल घडताना दिसत आहे. 'सर्क्युलर इकॉनॉमी' किंवा पुनर्वापराधारित अर्थव्यवस्था ही संकल्पना वेगाने केंद्रस्थानी येत आहे. विशेषतः बांधकाम आणि पाडकामातून निर्माण होणारा कचरा म्हणजेच 'सी ॲण्ड डी वेस्ट' हा केवळ टाकाऊ अवशेष नसून भविष्यातील पायाभूत विकासासाठी एक महत्त्वाचा संसाधनसाठा ठरू शकतो, ही जाणीव आता धोरणकर्त्यांना आणि उद्योगक्षेत्रालाही होऊ लागली आहे. भारतासारख्या झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या देशात ही जाणीव अत्यंत महत्त्वाची आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत शहरांमधील बांधकाम कचरा प्रशासनासाठी डोकेदुखी मानली जात होती. रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या भूखंडांवर, नाल्यांमध्ये किंवा शहरांच्या बाहेरील भागांमध्ये हा कचरा अनियंत्रितपणे टाकला जात असे. त्यामुळे प्रदूषण, धूळ, वाहतूक अडथळे आणि पर्यावरणीय हानी वाढत होती; परंतु आता या कचऱ्याकडे 'वेस्ट' म्हणून नव्हे, तर 'रिसोर्स' म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित होत आहे. यामागे केवळ पर्यावरणीय कारणे नाहीत, तर आर्थिक आणि पायाभूत गरजाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. नैसर्गिक खनिज संसाधने मर्यादित आहेत, बांधकाम साहित्याच्या किमती वाढत आहेत आणि शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर होत आहे. अशा वेळी पुनर्प्रक्रिया केलेल्या बांधकाम कचऱ्याचा वापर हा शाश्वत पर्याय ठरू शकतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### लग्नाची समस्या विक्राळ रूप धरतेय

सध्या लग्नसराई सरत आली असली तरी गुडघ्याला बाशिंग बांधून असणाऱ्या कित्येक तरुण मुलांचे लग्न जुळत नसल्याने कुटुंबापुढे एक नवा पेच उभा राहिल्यासारखा झाला आहे. त्या तुलनेने कमी असलेल्या मुलींच्या कुटुंबीयांच्या अपेक्षा वाढल्याने कित्येक सुशिक्षित तरुणांनी लग्नाच्या प्रतीक्षेत पस्तीशी ओलांडल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र, ही समस्या इतकी विक्राळ रूप धारण करेल की कुणी मुलगा आपल्या आईला जिवंत जाळेल असे वाटले नव्हते. धुळे येथे प्रदीप पाटील नावाच्या ४५ वर्षीय व्यक्तीने लग्न होत नसल्याच्या रागातून स्वतःच्या ६५ वर्षीय आईलाच कारणीभूत ठरवून तिला थीनर टाकून पेटवून दिल्याची घटना नुकतीच घडली. जन्मदात्या आईसाठी ज्या डोळ्यांतून सुखाचे थेंब गळायला हवे होते, त्या डोळ्यांत अशी खुनशी आग पाहून येणारा काळ किती भयंकर असेल, याची चाहूल या निमित्ताने लागलेली आहे.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

### मराठी भाषेबाबत उदासीनता नको

मराठीचा अभिमान हवा. कारण आपण महाराष्ट्रात राहतो. आपली मातृभाषा आहे तिच्यावर आपले प्रेम असावे. पण चित्र अगदी उलट आहे. व्यवहार करताना उदा. भाजीवाला, रिक्षावाला आधी हिंदीत बोलतात. मग आपण त्यांच्याशी मराठीत बोललो तर ते मराठीत बोलतात. बोर्डाच्या निकालात मराठीत नापास होणारे जास्त आहेत. याची कारणे खूप आहेत. महत्त्वाचे कारण आहे भाषेविषयीचे अज्ञान.

शाळेत लक्ष दिले जात नाही. सर्व स्तरांतून विद्यार्थी येतात. प्रत्येक कुटुंबात वेगळी बोलीभाषा बोलली जाते. शुद्ध भाषा शिकायचा प्रयत्नच केला जात नाही. मित्रांमध्ये मराठी सोडून इतर भाषांमध्यं बोलले जाते. संवाद नाही. शब्दसामर्थ्य नाही. बरेच शब्द माहिती नाही. आणखी एक म्हणजे कुटुंबात आपापसात बोलणे कमी झाले आहे. शेवटचे म्हणजे इंग्रजी माध्यम शाळा. पालक इंग्रजी माध्यम शाळाच निवडतात. मग मराठी दुय्यम होते. मराठीच्या तासिकांकडे लक्षच दिले जात नाही. परीक्षेच्या वेळी कशीतरी तयारी केली जाते. मग गुण कसे मिळणार? मराठी भाषेकडे लक्ष दिले पाहिजे. फक्त मराठी भाषादिनी खूप चर्चा करायची आणि नंतर विसरून जायचे. त्यामुळे मराठीविषयी उदासीनता दिसून येते. मराठी टिकवा, त्याचा अभिमान बाळगा.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

### अपघातग्रस्त कुटुंबांना आधार देणे शासनाचे कर्तव्य

जनगणनासारख्या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय कर्तव्याच्या कामासाठी उन्हाच्या तीव्रतेत काम करताना राज्यात एका शिक्षिकेसह इतर चार शिक्षकांच्या विविध कारणांनी मृत्यूच्या घटना या बातम्या जीवाला चटका लावून गेल्या. राष्ट्रउभारणी हातभार, भावी पिढीच्या भविष्यातील तरतुदी अशा अनेक राष्ट्र विकास धोरणांच्या अंमलबजावणीसाठी जनगणना मोहीम देशपातळीवर राबवली जात आहे. अनेक शिक्षक, सरकारी कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे, जबाबदारीने आपले कर्तव्य सध्या बजावीत आहेत. मानसिक, शारीरिक ताण सहन करीत पुरुष आणि महिला कर्मचारी दिवसभर जनगणना कामासाठी आपल्या कुटुंबापासून दूर अंतरावर प्रवास करीत असताना उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे, हृदयविकाराच्या झटक्यामुळे तसेच वाहनांच्या अपघातामुळे या चार शिक्षकांचा जीव जाणे म्हणजे त्या कुटुंबासाठी दुःखाचा डोंगर कोसळल्यासारखेच आहे. असह्य मानसिक, भावनिक धक्का, आर्थिक विवंचना, अस्थिरता, सामाजिक, कौटुंबिक संघर्ष, पुढे मदतीसाठी शासकीय, प्रशासकीय दिरंगाईचा त्रास, अशा अनेक कठीण परिस्थितीचा सामना या कुटुंबाला करावा लागतो. जनगणना या राष्ट्रीय कर्तव्यावर असणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, वाहतूक सुरक्षा पाळावी. शासनाने सुद्धा दुर्दैवी घटना घडलेल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी खऱ्या अर्थाने सामाजिक आणि नैतिक कर्तव्य पार पाडावे जेणेकरून ते कुटुंब आर्थिक आणि सामाजिक पातळीवर स्थिरावू शकेल.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे

### चायनिज पदार्थ आरोग्यासाठी हानिकारकच

भारतीयांना चिनी गोष्टींचे पूर्वीपासूनच आकर्षण आहे. अगदी चिनी वस्तूंपासून पदार्थांपर्यंत सर्वच गोष्टी भारतीयांना आवडतात. त्यातही चायनिज पदार्थांची तर सर्वांना चटक लागलेली आहे. बाहेर जेवायला जायचे म्हटले तर बरेच जण चायनिज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनमध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे. भारतात चायनिज पदार्थांच्या नावाखाली जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ तयार केले जातात. रस्त्याशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गडावरील चायनिज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असतो. त्यातही या गाड्यांवर तरुणाईच अधिक दिसते. हॉटेल आणि रेस्टॉरेंटच्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्या मागचे मुख्य कारण आहे. मात्र हे पदार्थ स्वस्तात देण्यासाठी अनेक तडजोडी कराव्या लागतात. त्यात निकृष्ट भाज्या आणि तेल वापरले जाते. त्यामुळे चायनिज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारकच आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## महत्वाचे...



## लॉन टेनिसमधील उल्लेखनीय कार्याबद्दल राजीव देसाई यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २८ मे-**

लॉन टेनिसमधील उल्लेखनीय कार्याबद्दल व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या कार्यकारिणीवर राजीव देसाई यांची निवड झाल्याबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या हस्ते व एम ओ अचे नवनिर्वाचित अध्यक्ष, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपूर येथे सत्कार करण्यात आला. राजीव देसाई यांनी सोलापूर येथे आजतागायत महिलांच्या १० जागतिक मानांकन आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन केले असून मोठ्या प्रमाणात या खेळाचा प्रसार केला आहे. तसेच सोलापूरचे खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करीत आहेत .

# निलेश गायकवाड अकॅडमीस विजेतेपद

### मास्टर्स अकॅडमीची क्रिकेट स्पर्धा : मॉडेल अकॅडमीवर मात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ मे -**

निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीने मास्टर्स क्रिकेट अकॅडमीच्या १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

पुष्प अकॅडमीच्या मैदानावर हा रोमांचक अंतिम सामना मॉडेल क्रिकेट अकॅडमी विरुद्ध निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीने प्रथम फलंदाजी करताना ४८.४ षटकांत सर्वबाद २४४ धावांचा डोंगर उभारला. यामध्ये यश पवार याने ५९ धावांची आणि संदेश गाडे याने ४० धावांची उत्कृष्ट खेळी केली. मॉडेल क्रिकेट अकॅडमीकडून गोलंदाजी करताना फरहान सय्यदने १० षटकांत ४९ धावा देऊन ३ बळी घेतले, तर संस्कार गवळीने १० षटकांत ५० धावा देत ३ बळी मिळवले.



विजयासाठी २४४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मॉडेल क्रिकेट अकॅडमीचा संघ ५० षटकांत ८ बाद २१० धावांपर्यंतच मजल मारू शकला. त्यांच्याकडून दर्शन हिरकुर याने ५४ धावा आणि साई घुगे याने ३८ धावा केल्या. निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीकडून धारदार गोलंदाजी करताना यश पवार याने १० षटकांत ५५ धावा देत ३ बळी घेतले. उत्कृष्ट सांघिक कामगिरीच्या जोरावर निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमीने हा सामना ३४ धावांनी जिंकून चषकावर आपले नाव कोरले.

पारितोषिक वितरण जेएमडी डेव्हलपर्सचे मालक जगदीप भीम रथी, दत्तात्रय बडगू, चंद्रशेखर उदगिरी, राजेश येमुल, वर्धन दळवी आणि निलेश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या आणि उपविजेत्या खेळाडूंना सन्मानित करण्यात आले. सामन्याचे पंच म्हणून नबीलाल पटेल व आर्सनल शेख यांनी काम पाहिले. गुणलेखक म्हणून वर्धन दळवी यांनी जबाबदारी सांभाळली.

**स्पर्धेतील वैयक्तिक पुरस्कार**
**सामनावीर:** यश पवार
**फलंदाज:** अभिषेक देशमुख
**गोलंदाज:** झैद शेख
**मालिकावीर:** ऋग्वेद पाटील



## विनर्स फाउंडेशनला उपविजेतेपद

**सोलापूर, दि. २८ मे-**

एल. एक्स. टी. पुणे यांच्या वतीने कासारसाई, पुणे येथे झालेल्या २५व्या एल. एक्स. टी. स्पीड स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत येथील विनर्स फाउंडेशन स्केटिंग क्लबच्या खेळाडूंनी उत्तम कामगिरी सर्वसाधारण उपविजेतेपद संपादिले.

या स्पर्धेत त्यांनी १३ पदकांची कमाई केली. या खेळाडूंना प्रशिक्षक सम्यक मोहोळकर, सागर राठोड, सिद्धू सुतार आणि वासूदेव कैरमकोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.त्यांना स्पर्धेचे आयोजक रितू राणे यांच्या हस्ते पदके बहाल करण्यात आली. या सर्व विजेत्या व सहभागी खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहार, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड, दयानंद महाविद्यालयाचे प्रशासक विजयकुमार उबाळे यांनी शुभेच्छा दिल्या.

**खेळाडूंची कामगिरी**

**सुवर्ण :** विराज आरकाल, असीत कांबळे, आरोही गाडे. **रौप्य :** असद शेख, आराध्या बडवणे, सक्षम हुच्चे, देवांश सरवदे, शौर्य कदम, सारंग मठपती. **कांस्य :** मेदिनी जगताप, साद शेख, विनायक हुच्चे, सोहम गाडे. **सहभाग :** याह्या शेख, लास्या शेरला व समर्थ औरंगे.

## 'वॉरियर्स' व 'किंग्स' संघांची बाजी

### एनजी क्रिकेट अकॅडमी इंटर क्लब स्पर्धा

### आदित्य चटके, अभिजीत सरवदे 'सामनावीर'





**सोलापूर, दि. २८ मे-**

निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी आयोजित इंटर क्लब क्रिकेट स्पर्धेत डोणगाव रोडवरील पुष्प जिमखाना मैदानावर शुक्रवारी झालेल्या सामन्यात 'एनजीसीए वॉरियर्स' संघाने, तर दुपारच्या सत्रात 'एनजीसीए किंग्स' संघाने शानदार विजय नोंदवला.

सकाळच्या सामन्यात पँथर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ७ बाद १०६ धावा उभारल्या. यात आराध्या आर. याने सर्वाधिक ४४ धावांची खेळी केली. कबीर कीर्तीकर याने १३ तर श्रीकर चव्हाण याने १० धावांचे योगदान दिले. वॉरियर्सकडून आदित्य चटके आणि मल्हार होनमाने यांनी प्रत्येकी दोन तर आदित्य सुरवसे व दुर्वांक पाटील यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला.

प्रत्युत्तरादाखल 'वॉरियर्स' संघाने १९.१ षटकांत ४ बाद १०७ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केले. वॉरियर्सकडून यशराज टेकाळे याने ३५ धावांची खेळी केली. त्याला नकुल होनमाने (१९), आदित्य चटके (१८) आणि प्रेम निकंबे (९) यांनी चांगली साथ दिली. पँथर्स संघाकडून गोलंदाजीत शांभवी शिंदकर हिने अवघ्या १० धावांत २ बळी घेतले, तर अथर्व पाटील आणि आशिन शेख यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. आदित्य चटके याला 'सामनावीर', आराध्या आर. याला 'उत्कृष्ट फलंदाज' आणि शांभवी शिंदकर हिला 'उत्कृष्ट गोलंदाज' म्हणून गौरविले.

दुपारच्या सत्रात 'ईगल्स' विरुद्ध 'किंग्स' यांच्यात दुसरा सामना रंगला. प्रथम फलंदाजी करताना ईगल्स संघाने २३ षटकांत सर्वबाद १९० धावांचा डोंगर उभा केला. यात ऋग्वेद पाटीलने ७९ धावांची आणि सोहम कुलकर्णीने ५७ धावांची अर्धशतकीय खेळी केली. श्रवण म्हेत्रे याने १३ धावा केल्या. किंग्सकडून श्रवण माळी याने २७ धावांत ३ बळी घेतले. तर विराज पांढरे, यश पवार, अभिजीत सरवदे आणि अर्जुन चटके यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

१९१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना 'किंग्स' संघाने अवघ्या २२.२ षटकांत ६ बाद १९४ धावा करत विजय खेचून आणला. किंग्सकडून अभिजीत सरवदे याने नाबाद ९६ धावांची मॅचविनिंग वादळी खेळी केली. कबीर कीर्तीकरने ३४, प्रवीण बेनाळकर याने नाबाद १५ आणि आदित्य गाडे याने १३ धावा करत त्याला भक्कम साथ दिली. ईगल्सकडून अनुज वाल्मिकीने ४१ धावांत ३ बळी आणि गौरव गादेकरने १६ धावांत २ बळी घेतले.

अभिजीत सरवदे याला 'सामनावीर' व 'उत्कृष्ट फलंदाज' घोषित करण्यात आले, तर अनुज वाल्मिकी याला 'उत्कृष्ट गोलंदाज' म्हणून सन्मानित करण्यात आले.

### 'आपटे चषक' स्पर्धा : अनिश मुळे सामन्याचा मानकरी

**सोलापूर, दि. २८ मे -**

'आपटे चषक' क्रिकेट स्पर्धेत 'साऊथ सोलापूर आपटे ग्रुप ब्ल्यू'ने विहान क्रिकेट अकॅडमीवर ५० धावानी मात करीत विजयी सलामी दिली.

साऊथ सोलापूर आपटे ग्रुपच्या वतीने सोलापूरच्या क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच एका अनोख्या 'संमिश्र वयोगट' (अंडर-१४, १६ आणि १९) क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन दयानंद क्रिकेट मैदानावर सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन संजय वडजे, रणजीपटू प्रवीण देशेट्टी आणि सुनील चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.




सलामीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना साऊथ सोलापूर आपटे ग्रुप ब्ल्यू संघाने निर्धारित षटकांत ९ गड्यांच्या मोबदल्यात २०३ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये तन्मय वाघमोडे याने ५६ धावांची उत्कृष्ट अर्धशतकी खेळी केली, तर जय गुंड याने ३० धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. विहान अॅकॅडमीकडून राजवीरने ३, तर धनराज जाधव आणि प्रवीण आयवळे यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

२०४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना विहान क्रिकेट अॅकॅडमीचा संघ अवघ्या १५३ धावांत गारद झाला. साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू संघाच्या अचूक गोलंदाजीमुळे हा सामना त्यांनी ५० धावांनी खिशात घातला.

आपटे ब्ल्यू संघाकडून अनिश मुळे याने भेदक मारा करत ४ बळी घेतले, तर जय गुंड याने २ बळी मिळवून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. उत्कृष्ट गोलंदाजीचे प्रदर्शन करणाऱ्या अनिश मुळे याला सामन्याचा मानकरी म्हणून गौरवण्यात आले.

# रेल्वे इन्स्टिट्युट व सोलापूर स्पोर्टस्‌चे शानदार विजय



### रेल्वेची ७९वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

### मनीष ध्रुव, समर्थ दोरनाल सामनावीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ मे-**

रेल्वेच्या ७९वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत रेल्वे इन्स्टिट्यूट ब संघाने सिंधी इलेव्हन संघावर ३ गडी राखून मात केली. मनीष ध्रुव सामन्याचा मानकरी ठरला.

रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात सोलापूर स्पोर्टस्‌ने एन.डी. ग्रुपवर ७ गडी राखून दणदणीत विजय मिळविला. समर्थ दोरनाल सामनावीर ठरला. हे पुरस्कार रोहन ढेपे, गौतम बनसोडे, विक्रांत पवार श्रीकांत राठोड व विक्रांत पवार यांच्या उपस्थितीत देण्यात आला.


पंच म्हणून महेश सोनवणे, चिराग शाह, सचिन गायकवाड, दया नवले तर गुणलेखक म्हणून विशाल कुलकर्णी यांनी काम पाहिले. हे पुरस्कार सुदेश मालप व सुनील मालप यांच्याकडून देण्यात येत आहे.

**संक्षिप्त धावफलक : सिंधी इलेव्हन :** १६.४ षटकांत सर्व बाद १२०(सुनील होटवानी ५७, भारत तोलानी १४, विकास राजनी १२, मनिष ध्रुव ३-२३, दर्शन हिरकुर २- २१, विजय गादेकर १-२२ धावा, विक्रम माने १-९) **पराभूत विरुद्ध रेल्वे इन्स्टिट्यूट ब :** १८.४ षटकांत ७ बाद १२१ (श्रीकांत खोत ५८, दिगंबर माने ३६ नाबाद, मनिष ध्रुव ८, विकास राजनी ४- २४, सुनील होटवानी २-२२, सोनू केशवानी १-११).

**एन डी ग्रुप :** २० षटकांत सर्व बाद ११५ (राजेश यमूल २७, प्रजित जाधव २४, चेतन वी १०, समर्थ दोरनल ६-२६ अश्वतच्छंद्र तोरा २-६, मोनीश यमुल, अक्षय बोमा प्रत्येकी एक एक बळी) **पराभूत विरुद्ध सोलापूर स्पोर्टस् :** १५ षटकांत ३ बाद ११६ (विशाल मुंगापाटील ५२ नाबाद, समर्थ दोरनाल १५, अश्वतचंद्र तोरा ९ धावा नाबाद, चेतन वि. १-१०, संतोष वाय १-१०, नागेश कोकरे १-२१).

**उद्याचा सामना**
**सकाळी :** पुष्प जिमखाना विरुद्ध सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट अ
**दुपारी :** जयहिंद कुर्डुवाडी विरुद्ध नाईट रायडर्स इलेव्हन





# सोलापुरात ५ जून रोजी राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षा

### २ जूनपर्यंत नाव नोंदणीचे आवाहन

**सोलापूर, दि. २८ मे-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्यावतीने आणि भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने शुक्रवार, दि. ५ जून रोजी सोलापूर येथे राष्ट्रीय खो-खो पंच परीक्षेचे आयोजन केले आहे. राज्यातील जास्तीत जास्त राज्य पंच परीक्षा उत्तीर्ण पंचांनी राष्ट्रीय परीक्षेला बसावे आणि राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निर्माण करावे.

इच्छुक उमेदवारांनी दि. २ जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रशांत पाटणकर (मो. क्र. ९९६७५६२४६६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी केले आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विविध अभियांत्रिकी कामे**

मंडळ रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने नाम ांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ई-निविदा मागवीत आहेत. निविदांचे तपशील: १. निविदा सूचना क्र.: ०९-२०२६-SrDENC- कामाचे नाव: सोलापूर विभागातील / ADEN/ KWV(BG) उपविभागांतर्गत SSE/P.Way/ JH सेक्शनमध्ये आणि ADEN/SUR(N) च्या अधिकारक्षेत्रातील SSE/P.Way/KWV(S) व SSE/P.Way/SUR(N) मध्ये आरसीसी (RCC) साईड ड्रेनची तरतूद करणे. कामाची अंदाजे किंमत: रु. ५,०४,१६,०१३.१३ बयाणा रक्कम : रु. १०,०८,३००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी : १२ महिने २. निविदा सूचना क्र.: १०-२०२६-SrDENC कामाचे नाव: ADEN/BG/KWV उपविभागांतर्गत रेल्वे वसाहतींमध्ये (Colonies) पोहोच रस्ता (Approach road) तयार करणे. कामाची अंदाजे किंमत: रु. ३,४७,५९,५६२.८१ बयाणा रक्कम : रु. ६,९५,२०-०.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: ०६ महिने देखभाल कालावधी : १२ महिने ३. निविदा सूचना क्र.: ११-२०२६-SrDENC कामाचे नाव: DD(Excl.)-KWV सेक्शन, SEI, BTW आणि MLB स्टेशनवर आरपीएफ (RPF) कर्मचाऱ्यांसाठी सिग्नल गुमटीची (Signal Gumti) दुरुस्ती आणि विस्तार करणे. कामाची अंदाजे किंमत: रु. ७५,१८,५८६.८३ बयाणा रक्कम : रु. १,५०,४००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: ०६ महिने देखभाल कालावधी : १२ म हिने ४. निविदा सूचना क्र.: १२-२०२६-SrDENC कामाचे नाव: ADEN(BG)KWV अंतर्गत जेऊर (JEUR) येथे भूमिगत टाकी (UG tank), पाण्याच्या पाईपलाईन, पंप हाऊस आणि सांडपाणी वहन प्रणालीसह सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (Sewage treatment plant - 15 KLD) उभारणे. कामाची अंदाजे किंमत: रु. ६५,१२,५९४.२६ बयाणा रक्कम : रु. १,३०,३००.०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने देखभाल कालावधी: १२ महिने महत्त्वाच्या तारखा आणि इतर माहिती: www.ireps.gov.in या संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: १८/०६/२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत (३.०० वाजता). www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: १८/०६/२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजता (३.०० वाजता). सूचना: संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की त्यांनी या निविदे संदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक (corrigenda) पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

23 **डीआरएम (कामे)/सोलापूर**

**धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा एक दंडनीय गुन्हा आहे.**

## साऊथ सोलापूर रेड संघाचा ४८ धावांनी शानदार विजय

### 'विजय चषक' क्रिकेट स्पर्धा : चेतन माढेकर सामनावीर

**सोलापूर, दि. २८ मे-**

'विजय चषक' क्रिकेट स्पर्धेत साऊथ सोलापूर रेड संघाने राजमाता सांगोला संघावर ४८ धावांनी मात करत शानदार विजय आपल्या नावावर केला.

येथील इंदिरा गांधी गांधी पार्क स्टेडियमवर शुक्रवारी झालेल्या सामन्यात साऊथ सोलापूर रेड संघाचा सलामीवीर प्रथमेश देगावकर याने मैदानावर उतरताच चौफेर फटकेबाजी करत अवघ्या ३६ चेंडूंत ६४ धावांची वेगवान खेळी केली. त्याला दुसऱ्या बाजूने सिद्धांत कांबळेने ५९ चेंडूंत ५१ धावा करत साथ दिली. त्यानंतर चेतन माढेकरने २९ चेंडूंत २८ धावांचे (४ चौकार आणि १ षटकार) महत्त्वपूर्ण योगदान दिले. या त्रिकुटाच्या जोरावर साऊथ सोलापूर रेड संघाने ३०.५ षटकांत सर्वबाद १९५ धावांचा आव्हानात्मक पल्ला गाठला.



१९६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या राजमाता सांगोला संघाची सुरुवात खराब झाली. मात्र, त्यांचा प्रमुख फलंदाज सत्यजीत गवळी याने एक बाजू लावून धरत १०३ चेंडूंत ६९ धावांची झुंजार आणि संयमी खेळी केली. दुर्दैवाने, त्याला दुसऱ्या बाजूने इतर कोणत्याही फलंदाजाची खंबीर साथ मिळू शकली नाही. साऊथ सोलापूर रेड संघाच्या धारदार गोलंदाजीसमोर सांगोला संघाचा डाव ३५.५ षटकांत ९ बाद १४७ धावांवरच मर्यादित राहिला आणि त्यांना ४८ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला.

साऊथ सोलापूर रेड संघाच्या या विजयात चेतन माढेकर 'विजयाचा शिल्पकार' ठरला. फलंदाजीत २८ धावांचे योगदान दिल्यानंतर, त्याने गोलंदाजीतही ७ षटकांत १ निर्धाव षटक टाकत अवघ्या २५ धावांच्या मोबदल्यात सांगोला संघाचे ३ महत्त्वाचे बळी टिपले. त्याच्या या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

**जाहीर सूचना**

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकत श्री.अंबण्णा तुकाराम पुजारी यांनी पत्नी सौ. सुरेखा अंबण्णा पुजारी यांचे नावे बक्षीसपत्राने हस्तांतर करून ती मिळकत तारण () ठेवण्याचा प्रस्ताव जना स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा सोलापूर, यांचेकडे दिला असून, आमचे अशिल बँकेने सदर कर्ज मंजूर करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सदर मिळकत निर्बंधरहित, निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी मिळकतीच्या सद्य मालकांनी दिलेली आहे.

तरी, सदर मिळकतीवर, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, हक्क, हिस्सा, हितसंबंध, वाद, अगर कर्ज प्रकरणास हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत, खालील नमूद पत्त्यावर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका- अक्कलकोट, पैकी मौजे अंकलगी, येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.१०९८, यासी क्षेत्र ११४० चौ. फू., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. २८/०५/२०२६

**सही/-**
**अॅड. गणेश वसंत कटारे**
**अॅड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला, स्केअर-वन कॉम्प्लेक्स, १३१, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाईल क्र. ९८६०११००११**

**खरेदीपर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसाने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि व सब डि सोलापूर पैकी, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे तांदुळवाडी ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन गट नं. ७४/३ यासी क्षेत्र ०हे-९१आर, आकारणी २रू-५०पैसे पैकी पंडीत संगप्पा भडंगे यांचे नांभावरील क्षेत्र ०हे-३१आर पैकी ०हे-३०आर आकार ०रू-८५पैसे यासी चतु:सिमा पुर्वेस- महादेव भडंगे यांची शेतजमीन, पश्चिमेस- धोंडप्पा भडंगे यांची शेतजमीन, दक्षिणेस- हरणा नदी, उत्तरेस- गट नं.७५, तसेच धोंडप्पा संगप्पा भडंगे यांच्या नांभावरील क्षेत्र ०हे-६० आर पैकी ०हे-३० आर ०रू-८२.५ पैसे यासे असलेली शेतजमीन यासी चतु:सिमा पुर्वेस- पंडीत भडंगे यांची शेतजमीन, पश्चिमेस- धोंडप्पा भडंगे यांचे उर्वरीत क्षेत्र, दक्षिणेस- हरणा नदी, उत्तरेस- गट नं.७५ येणेप्रमाणे चतु:सिमेतील खुली शेतजमीन ही पंडीत संगप्पा भडंगे व धोंडप्पा संगप्पा भडंगे यांच्या मालकीची असून, सदर शेतजमीन ही त्यांनी आमच्या अशिलास कायमखुशखरेदीने देण्याचे ठरविले आहे. सदर वर नमुद शेतजमीन ही निर्वेध व निजोखमीची असलेबाबत विद्यमान मालकांनी आमचे अशिलास तशी हमी व खात्री दिलेली आहे.

तथापि याउपरही वर नमुद शेतजमीनीत अन्य कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा टाच, भाडेपट्टा, साठेखत, खरेदीखत, गहाणखत, पोटगी, लीज अगर इतर अन्य करार, मदार कोर्ट वाद वगैरे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसाचे आत हक्क व हितसंबंध दर्शविणारे कागदोपत्री पुराव्यासह लेखी वैध हरकत खालील नमुद पत्त्यावर कळविण्यात यावी. मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास वरील शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून, आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही हरकती सदर मिळकतीवर व आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २९/०५/२०२६

**सही/-**
**अॅड. गुरूदत्त एन. पाटील**
**बी.एस.एल. एल.एल.बी**
**रा. सी/३, विद्याविहार, पंखा बावडी, सोलापूर**
**मो.नं.९८५०५५६५६४**



## महत्त्वाचे

### विनेशच्या निवड चाचणीबाबतच्या हायकोर्टाच्या आदेशाला आव्हान



**नवी दिल्ली** : भारतीय कुस्ती महासंघाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून, कुस्तीपटू विनेश फोगटला २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या निवड चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी देणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले आहे. न्यायमूर्ती पी.एस. नरसिम्हा आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी महासंघाच्या याचिकेवर सुनावणी होणार आहे. फोगटच्या सहभागाला परवानगी देण्यामागील उच्च न्यायालयाचा युक्तिवाद २२ मे रोजी, उच्च न्यायालयाच्या एका खंडपीठाने आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या आगामी निवड चाचण्यांमध्ये फोगटच्या सहभागाला मंजुरी दिली होती. यावेळी न्यायालयाने असे निरीक्षण नोंदविले की, डब्ल्यूएफआयचे निवड धोरण वंचित करणारे आहे; कारण मातृत्व रजेवरून परतणाऱ्या फोगटसारख्या एका दिग्गज खेळाडूचा विचार करण्यासाठी या धोरणात कोणत्याही प्रकारच्या विवेकाधिकाराची तरतूद नाही.

### ऑस्ट्रेलियावर वर्चस्व गाजवण्यास भारतीय महिला हॉकी संघ उत्सुक

**पर्थ** : सातत्याने प्रगती करत असलेला भारतीय महिला हॉकी संघ येथे सुरू असलेल्या चार सामन्यांच्या हॉकी मालिकेत शुक्रवारी येथे ऑस्ट्रेलियाचा सामना करताना आपली स्थिती अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने मैदानात उतरेल. भारतीय महिलांनी या दौऱ्याची सुरुवात सकारात्मक पद्धतीने केली होती; मालिकेतील पहिल्याच सामन्यात नवनीत कौरने भारताला सुरुवातीलाच आघाडी मिळवून दिली होती, मात्र त्यानंतर ॲबी विल्सनने केलेल्या दोन गोलमुळे ऑस्ट्रेलियाचा २-१ असा विजय निश्चित झाला. परंतु, बुधवारी सामन्याच्या निर्धारित वेळेअखेर दोन्ही संघ १-१ अशा बरोबरीत असताना, भारतीय संघाने जोरदार पुनरागमन करत दुसरा सामना शूटआउटमध्ये ४-२ ने जिंकला. सजोर्ड मारिन यांच्या मार्गदर्शनाखालील या संघाने जबरदस्त लढाऊ वृत्तीचे प्रदर्शन केले. या दौऱ्यात आतापर्यंत भारतीय संघाने खेळाच्या बहुतेक सर्वच पैलूंमध्ये विशेषतः बचावफळी आणि मध्यफळीमध्ये आपली छाप पाडली आहे. भारतीय संघ आपली कर्णधार सलीमा टेट हिच्याकडून प्रेरणेची अपेक्षा करेल. हा दौरा भारतासाठी एक महत्त्वाची सराव मालिका म्हणून काम करेल; या दौऱ्यानंतर १५ ते २१ जून दरम्यान ऑकलंड येथे हॉकी महिला नेशन्स कपचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, १५ ते ३० ऑगस्ट दरम्यान बेल्जियम आणि नेदरलँड्स यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या एफआयएच विश्वचषकाच्या दृष्टीनेही हा सध्याचा दौरा भारतासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या दौऱ्यातील अंतिम सामना शनिवारी खेळवला जाणार आहे.

### महिला विश्वचषकासाठी सामना अधिकाऱ्यांच्या पॅनेलमध्ये चार भारतीय

**दुबई** : आगामी १२ जूनपासून इंग्लंड आणि वेल्समध्ये सुरू होणाऱ्या महिलांच्या टी-२० विश्वचषकाचे संचालन करणाऱ्या आयसीसीच्या १८ सदस्यीय केवळ महिलांचा समावेश असलेल्या सामना अधिकाऱ्यांच्या यादीत सामना पंच जी.एस. लक्ष्मी यांच्यासह चार भारतीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रतिष्ठि स्पर्धेची ही सलग तिसरी आवृत्ती असेल, यात केवळ महिलांचा समावेश असलेले पॅनेल कार्यरत असेल; यामध्ये कॅन्डिस ला बोर्डे, गायत्री वेणुगोपालन, केरिन क्लास्टे आणि शथिरा जाकिर जेसी या अधिकाऱ्यांचा या स्पर्धेत पदार्पण होणार आहे. पंच म्हणून काम करणाऱ्यांच्या यादीत वृंदा राठी आणि जननी एन या इतर दोन भारतीय अधिकाऱ्यांचा समावेश आहे. महिला टी-२० विश्वचषक २०२६ साठीचे सामना अधिकाऱ्यांचे हे पॅनेल क्रिकेटच्या सर्व पैलूंमध्ये प्रतिनिधित्वाची व्याप्ती वाढवण्यास कटिबद्ध आहे.

# अंतिम फेरीसाठी गुजरात, राजस्थानमध्ये चुरस



शुभमन गिल



रियान पराग

**मुल्लानपूर, २८ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) क्वालिफायर २ सामन्यात शुक्रवारी मुल्लानपूर येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स हे संघ आमने-सामने उभे ठाकणार आहेत.

क्वालिफायर १ सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) कडून ९२ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव पत्करावा लागल्यामुळे गुजरात टायटन्सना थेट अंतिम फेरीत प्रवेश मिळविता आला नाही. साखळी फेरीत नऊ विजयांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिल्यामुळे गुजरात संघाला आता अंतिम फेरीत पोहोचण्याची दुसरी संधी मिळाली आहे. त्यांच्या मार्गात आता राजस्थान रॉयल्स हा सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असलेला संघ उभा आहे. राजस्थान रॉयल्सने एलिमिनेटर सामन्यात सनरायझर्स हैदराबादवर ४७ धावांचा निर्विवाद विजय मिळवून या बाद फेरीच्या सामन्यात आपले स्थान निश्चित केले आहे.

आयपीएल २०२६ च्या हंगामातील साखळी फेरीत हे दोन्ही संघ दोनदा आमने-सामने आले होते आणि त्यातील प्रत्येकी एका सामन्यात त्यांनी विजय मिळविला होता. अहमदाबादमध्ये झालेल्या अत्यंत रोमहर्षक सामन्यात राजस्थान रॉयल्सने ६ धावांनी बाजी मारली होती, तर जयपूरमध्ये झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने ७७ धावांच्या मोठ्या फरकाने दणदणीत विजय मिळवत जोरदार पुनरागमन केले होते.

या मैदानावर आतापर्यंत पाच सामने खेळले गेले असून, त्यातील बहुतांश सामने हे अत्यंत मोठ्या धावसंख्येचे ठरले आहेत. राजस्थान आणि गुजरात यांच्यातील एलिमिनेटर सामना याच मैदानावर खेळला गेला होता; त्यावेळी प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने २४३ धावांचा प्रचंड डोंगर उभारला होता. दोन्ही संघांमध्ये फटकेबाजी करणारे दिग्गज फलंदाज असल्यामुळे या सामन्यातही पुन्हा एकदा मोठ्या धावसंख्येची लढत पाहायला मिळेल अशी अपेक्षा आहे.

या क्वालिफायर २ सामन्यातील विजयी संघ रविवारी नरेंद्र मोदी आंतरराष्ट्रीय स्टेडियम, अहमदाबाद येथे होणाऱ्या अंतिम सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळेल. (वृत्तसंस्था)

**क्वालिफायर२ सामना आज**

**गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स**

**स्थळ** : महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर

**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# सूर्यवंशी गोलंदाजाला मुळीच घाबरत नाही : जुरेल





**मुल्लानपूर, २८ मे**

एखाद्या किशोरवयीन खेळाडूने चेंडूचा विचार करण्याऐवजी केवळ गोलंदाजाचाच विचार करीत खेळणे (म्हणजेच गोलंदाजाच्या नावाला घाबरणे) हे तसे स्वाभाविक असते; परंतु वैभव सूर्यवंशीला आपण कोणाचा सामना करीत आहोत, याची अजिबात पर्वा नसते, असे त्याचे राजस्थान रॉयल्समधील सहकारी ध्रुव जुरेलने नमूद केले.

या १५ वर्षीय वैभ व सूर्यवंशीने संपूर्ण आयपीएल हंगामात गोलंदाजांच्या नावलौकिकाची (प्रतिष्ठेची) फारशी पर्वा केली नाही; मग तो जसप्रीत बुमराह असो किंवा अलीकडेच ज्याचा सामना केला तो पॅट कमिन्स. सूर्यवंशीच्या आक्रमक फटकेबाजीचा तडाखा बसलेल्या दिग्गज गोलंदाजांच्या यादीत मोहम्मद सिराज, जोश हेझलवुड आणि कॅगिसो रबाडा यांचाही समावेश आहे.

बुधवारी, सूर्यवंशीने आपल्या षटकारांच्या वर्षावाने अनेकदा विश्वचषक जिंकणाऱ्या व क्रिकेट जगतातील सर्वात चतुरस्त्र गोलंदाजांपैकी एक असलेल्या कमिन्सला पूर्णपणे हतबल करून सोडले.

कमिन्सने लेग-स्टम्पवर पूर्ण लांबीचा चेंडू टाकून सूर्यवंशीच्या मुक्तहस्त फटकेबाजीला रोखण्याचा प्रयत्न केला; परंतु सूर्यवंशीने तत्काळ आपल्या खेळात बदल करत तो चेंडू त्या ऑस्ट्रेलियन गोलंदाजाच्या डोक्यावरून सीमापार पाठवला. त्यानंतर आलेला आखुड टप्प्याचा चेंडू त्याने थर्ड मॅनच्या दिशेने जोरदारपणे टोलवला, तर त्यापुढचा हळू गतीचा चेंडू त्याने सरळ बॅटने सीमापार धाडला. तिसऱ्याच षटकांत कमिन्सच्या सर्व युक्त्या संपल्या होत्या.

सूर्यवंशीने अखेरीस २९ चेंडूंत ९७ धावांची सामना-विजयी खेळी साकारली; ख्रिस गेलचा आयपीएलमधील सर्वात जलद शतकाचा विक्रम मोडण्यापासून तो केवळ एका फटक्याच्या अंतरावर होता.

वैभव सूर्यवंशीला अगदी जवळून पाहणाऱ्या जुरेलने या चमत्कारिक खेळाडूबाबत आपले निरीक्षण नोंदवले. (वृत्तसंस्था)

## भविष्यात शतके नक्कीच करेन : वैभव सूर्यवंशी

आयपीएलमधील सर्वात जलद शतकाच्या विक्रमाबद्दल कल्पना नव्हती. सामना संपल्यानंतर मला विक्रमाबद्दल कळले., माझे संपूर्ण लक्ष षट्कार ठोकण्यावर व जास्तीत जास्त धावा गोळा करण्यावर केंद्रित होते, , मात्र भविष्यात मी नक्कीच शतक करेन, असे राजस्थान रॉयल्सचा स्टार फलंदाज वैभव सूर्यवंशी म्हणाला.

बुधवारी येथे झालेल्या एलिमिनेटर सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध आपल्या संघाला विजय मिळवून देण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली. सूर्यवंशीचा जलद शतकाचा विक्रम अवघ्या तीन धावांनी हुकला. त्याने अवघ्या २९ चेंडूंत ९७ धावांची धडाकेबाज खेळी केली. यामध्ये १२ षट्कार व ५ चौकार ठोकले. त्याचा स्ट्राईक रेट ३३४.४८ इतका प्रचंड होता. त्याच्या या खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने हैदराबादचा ४७ धावांनी पराभव केलाव क्वालिफायर २ मध्ये गुजरात टायटन्सशी दोन हात करण्याची संधी मिळविली.

आयपीएलमधील सर्वात जलद शतकाचा विक्रम त्याने अगदी थोडक्यात हुकवला असला, तरी एका हंगामात सर्वाधिक षट्कार मारण्याचा ख्रिस गेलचा विक्रम त्याने मोडीत काढला. आयपीएल २०२६ च्या या हंगामात त्याने एकूण ६५ षट्कार ठोकले आहेत.

सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स याने आपल्या संघाच्या पराभवाचे खापर, चुकीच्या वेळी एकापाठोपाठ एक बळी गमावण्यावर फोडले.

## सूर्यवंशीचा बॅट स्विंग अप्रतिम : सचिन तेंडुलकर

### क्रिकेट विश्वाने केली मुक्तकंठाने प्रशंसा



आयपीएलच्या एलिमिनेटर सामन्यात सनरायझर्स हैदराबादविरुद्ध अवघ्या २९ चेंडूंमध्ये ९७ धावांची धडाकेबाज खेळी करणाऱ्या किशोरवयीन वैभव सूर्यवंशीची क्रिकेट विश्वाने भरभरून प्रशंसा केली.

महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने १५ वर्षी डावखुरा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या 'अप्रतिम बॅट स्विंग'ची विशेष प्रशंसा केली. सूर्यवंशीने आयपीएलच्या एका हंगामात सर्वाधिक षट्कार (५९) मारण्याचा ख्रिस गेलचा विक्रम मोडला. आता सूर्यवंशीच्या नावावर या हंगामात एकूण ६५ षट्कार जमा झाले आहेत. वैभव सूर्यवंशीचा बॅट स्विंग अत्यंत उत्कृष्ट राहिला आहे. पायांच्या दिशेने येणाऱ्या चेंडूंसाठी जागा निर्माण करण्याकरिता तो आपला पुढचा पाय सुंदरपणे बाजूला करतो. या मोकळेपणामुळेच त्याला आपल्या शैलीनुसार खेळणे शक्य होते. ती खेळी म्हणजे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नव्हती, असे सचिन तेंडुलकरने म्हटले.

'बॉस बेबीने युनिव्हर्सल बॉसचा विक्रम मोडला. सूर्यवंशीची खेळी अविश्वसनीय आहे, असे अनेक विश्वचषक विजेत्या युवराज सिंगने म्हटले. सूर्यवंशीसारखे क्रिकेटपटू हेच सिद्ध करतात की भारतीय क्रिकेट सुरक्षित हातात आहे, असे माजी अष्टपैलू खेळाडू सुरेश रैनाने म्हटले.

सूर्यवंशीच्या फटक्यांची गुणवत्ता 'दुर्मिळ' आहे, असे वेस्ट इंडीजचा माजी वेगवान गोलंदाज इयान बिशपने म्हटले. आपण एक चमत्कार पाहत आहोत, आपण एक भविष्यातील स्टार पाहत आहोत, असे भारताचा माजी खेळाडू मोहम्मद कैफ म्हणाला. सूर्यवंशीच्या या अद्भूत कामगिरीने भारावून गेलो, असे इंग्लंडचा महान फलंदाज केविन पीटरसन म्हणाला. वैभव सूर्यवंशीचे हात अत्यंत चपळ आहेत आणि सध्या तो पूर्णपणे निर्भीड होऊन खेळत आहे. त्याच्या शरीरात भीतीचा लवलेशही नाही, असे दक्षिण आफ्रिकन खेळाडू कॅगिसो रबाडा म्हणाला.सूर्यवंशी जगातील सर्वोत्तम टी-२० सलामीवीर आहे. भारताने त्याची नक्कीच निवड केली पाहिजे, असे इंग्लंडचा माजी कर्णधार मायकल वॉन याने म्हटले.

# दिव्या देशमुखचा बिबिसारावर विजय

### नॉर्वे बुद्धिबळ ● प्रज्ञानंदचा मॅग्नस कार्लसेनला धक्का ● गुकेशचा आणखी एक पराभव



बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध खेळताना नागपूरची दिव्या देशमुख

**ओस्लो, २८ मे**

आर. प्रज्ञानंदने येथे नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत अव्वल विश्वमानांकित नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसेनला एका रोमांचक लढतीत पराभूत करून, आपण त्याच्याशी बरोबरी करू शकतो हे सिद्ध केले व तीन पूर्ण गुण मिळविले.

याउलट, विद्यमान विश्वविजेता डी. गुकेशची खडतर वाटचाल सुरूच राहिली. एका चुरशीच्या क्लासिकल सामन्यानंतर आर्मागेडॉन गेममध्ये अलीरेझा फिरौजाकडून पराभूत झाल्यामुळे त्याला आणखी एका धक्क्याला सामोरे जावे लागले.

महिला गटातील स्पर्धा अत्यंत चुरशीची राहिली असून गुणतालिकेवर खेळाडूंचे गुण एकमेकांच्या अगदी जवळ आहेत. अद्याप कोणताही स्पष्ट आघाडीचा खेळाडू समोर आलेला नाही.

दिव्या देशमुखने टायब्रेक्समध्ये पुन्हा एकदा आपला कणखरपणा सिद्ध केला. स्पर्धेतील आपला तिसरा आर्मागेडन विजय तिने यावेळी स्पर्धेची आघाडीची खेळाडू असलेल्या बिबिसारा असाउबायेवाविरुद्ध मिळविला आणि ४.५ गुणांची कमाई केली.

सध्या दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या या तरुण भारतीय खेळाडूने, ५.५ गुणांसह स्पर्धेत आघाडीवर असलेल्या कझाकिस्तानच्या खेळाडूशी (बिबिसाराशी) असलेली गुणांची तफावत आणखी कमी केली आहे.

कोनेरू हम्पीची कठीण वाटचाल थांबण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाही व दोन वेळच्या विश्व जलद बुद्धिबळ विजेतीला गतविजेती ॲना मुझीचुककडून पराभव पत्करावा लागला.

हम्पी आता गुणतालिकेत तळाशी, म्हणजेच सहाव्या क्रमांकावर असून तिच्या खात्यात केवळ दोन गुण जमा आहेत.

बुखारेस्ट येथील सुपरबेट चेस क्लासिक रोमानियामध्ये प्रभावी कामगिरीच्या मालिकेनंतर नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या पूर्वसंध्येला ओस्लोमध्ये दाखल झालेल्या प्रज्ञानंदकडून हा विजय आणखी एक मोठे विधान होते.

या विजयामुळे या भारतीय खेळाडूचे ४.५ गुण झाले आणि तो नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या गुणतालिकेत एकमेव दुसऱ्या स्थानावर पोहोचला. तो आता केवळ फिरौजाच्या मागे आहे, जो ७.५ गुणांसह स्पर्धेत आघाडीवर आहे. (वृत्तसंस्था)

# भारतीय खेळाडूंची विजयी मालिका कायम

**सिंगापूर ओपन बॅडमिंटन**









**सिंगापूर, २८ मे**

भारताचे आघाडीचे खेळाडू पी.व्ही. सिंधू, लक्ष्य सेन, पुरुष दुहेरीतील जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी, तसेच मिश्र दुहेरीतील जोडी ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांनी गुरुवारी सिंगापूर ओपन स्पर्धेत आपली विजयी घोडदौड कायम राखीत उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

सिंधूने जपानच्या रिको गुंजीचा सलग दोन गेम्समध्ये सहज पराभव केला, तर सात्त्विक-चिराग जोडीने ली झे-हुई व यांग पो-ह्सुआन यांचा २१-१५, ११-२१, २१-१८ असा पराभव केला. ध्रुव व तनिषाने जपानच्या जोडीचे आव्हान परतवून लावत युता वातानाबे व माया तागुची यांचा ८-२१, २१-१७, २१-१६ अशा गुणांनी पराभव केला.

अनुभवी सिंधूने अवघ्या ३७ मिनिटांतच सलग दोन गेम्समध्ये सहज विजय नोंदवला. उपांत्यपूर्व फेरीत तिचा सामना आता अव्वल मानांकित खेळाडू दक्षिण कोरियाच्या आन से-यंग हिच्याशी होईल.

पुरुष एकेरीमध्ये लक्ष्य सेनने पुढील फेरीत प्रवेश केला, कारण त्याचा प्रतिस्पर्धी थायलंडचा कुनलावुत विटिडसर्न याने सामन्यात केवळ दोन गुण झाल्यानंतरच दुखापतीमुळे माघार घेतली. लक्ष्यचा पुढील सामना आता जपानच्या कोकी वातानाबे याच्याशी होईल. पुरुष एकेरीच्या अन्य एका सामन्यात एच.एस. प्रणॉयला सिंगापूरच्या लोह कीन यू याच्याकडून १८-२१, २१-१६, १५-२१ अशा गुणांनी पराभव पत्करावा लागला.

पुरुष दुहेरीमध्ये चौथ्या मानांकित सात्त्विक व चिराग जोडीने पहिला गेम जिंकून दमदार सुरुवात केली; मात्र चिनी तैपेईच्या जोडीने दुसऱ्या गेममध्ये वर्चस्व गाजवल्यामुळे हा सामना निर्णायक तिसऱ्या गेमपर्यंत गेला. भारतीय जोडीने जोरदार मुसंडी मारत निर्णायक गेम २१-१८ अशा गुणांनी जिंकून सामना आपल्या नावी केला. त्यांचा पुढील सामना आता मलेशियाच्या कांग खाई झिंग आणि ॲरॉन ताई या जोडीशी होईल, याच जोडीकडून त्यांना या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या ऑल इंग्लंड ओपन स्पर्धेदरम्यान पराभव पत्करावा लागला होता. (वृत्तसंस्था)

### व्हीनस विल्यम्स, हेली बॅप्टिस्टची माघार

**पॅरिस** : व्हीनस विल्यम्स आता हेली बॅप्टिस्टसोबत फ्रेंच ओपनमध्ये महिला दुहेरी खेळणार नाही. त्यांनी गुरुवारी स्पर्धेतून माघार घेतली आणि आयोजकांकडून कोणतेही कारण देण्यात आले नाही, परंतु बुधवारी वांग शियूविरुद्धच्या दुसऱ्या फेरीतील एकेरीच्या सामन्यात पहिल्या सेटच्या अखेरीस डाव्या पायावर विचित्रपणे पडल्यामुळे बॅप्टिस्टला सामना सोडून द्यावा लागला होता. या अमेरिकन खेळाडूंच्या जागी युडिस चोंग आणि व्हेरोनिका रेजवेक यांना ड्रॉमध्ये स्थान देण्यात आले आहे.

# भारतीय संघांचे सकारात्मक सुरुवातीकडे लक्ष

### आशिया चषक १८ वर्षांखालील हॉकी

**काकामिगाहारा, २८ मे**

येथे शुक्रवारपासून आशिया चषक १८ वर्षांखालील मुले-मुलींच्या हॉकी स्पर्धेला प्रारभ होणार आहे. सरदार सिंग आणि राणी रामपाल यांसारख्या वरिष्ठ दिग्गजांच्या मार्गदर्शनाखाली, भारताचे १८ वर्षांखालील मुले आणि मुलींचे संघ आपल्या अलीकडील तीव्र सरावाचा पुरेपूर फायदा उठवण्याचे ध्येय बाळगून असतील.

मुलांच्या संघाला माजी पुरुष कर्णधार सरदार सिंग आणि रजनीश मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभत आहे, तर मुलींच्या संघाची धुरा माजी महिला कर्णधार राणी रामपाल हिच्या हाती आहे. आक्रमक खेळाडू केतन कुशवाह याच्या नेतृत्वाखालील भारताचा १८ वर्षांखालील मुलांचा संघ प्रशिक्षक सरदार सिंग आणि रजनीश मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या महिनाभराच्या राष्ट्रीय सराव शिबिरानंतर या स्पर्धेत सहभागी होत आहे. मुलांच्या स्पर्धेत भारताला गट अ मध्ये यजमान जपान, कोरिया, चायनीज तैपेई आणि कझाकस्तान या संघांसोबत स्थान देण्यात आले आहे. भारतीय संघ आपल्या मोहिमेची सुरुवात २९ मे रोजी कझाकस्तानविरुद्ध करेल; त्यानंतर ते जपान (३१ मे), कोरिया (१ जून) आणि चीन तैपेई (३ जून) या संघांचा सामना करतील.

गट ब ( ) मध्ये मलेशिया, पाकिस्तान, बांगलादेश आणि चीन या संघांचा समावेश आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ ५ जून रोजी होणाऱ्या उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील, तर अंतिम सामना ६ जून रोजी खेळला जाईल. मुलींच्या संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध चार सामन्यांची मालिकाही खेळली. गट अ मध्ये स्थान मिळालेला हा संघ ३० मे रोजी मलेशियाविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल; त्यानंतर ३१ मे रोजी कोरिया आणि २ जून रोजी सिंगापूरविरुद्ध त्यांचे सामने होतील. अंतिम सामना ६ जून रोजी खेळवला जाईल. (वृत्तसंस्था)

# मांडविया राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या तयारीचा आढावा घेणार



**नवी दिल्ली, २८ मे**

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया हे शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या ईशान्येकडील मेघालय राज्याच्या तीन दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. तसेच, शिलाँग येथे एका एकात्मिक बहुउद्देशीय इनडोअर क्रीडा संकुलाचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

पुढील वर्षी मार्चमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठीचा यजमान राज्य करार मेघालय सरकारसोबत स्वाक्षरित केला जाईल. या प्रसंगी वरिष्ठ मान्यवर आणि भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित असतील. मांडविया हे युवक व्यवहार आणि क्रीडा पायाभूत सुविधांच्या विकासाशी संबंधित विविध कार्यक्रमांमध्येही सहभागी होतील, तसेच राज्यातील केंद्रपुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतील. या दौऱ्यादरम्यान, मंत्री महोदय युवक व्यवहार विभागाने आयोजित केलेल्या चिंतन शिबिराला उपस्थित राहतील. यावेळी मेघालयचे क्रीडा आणि युवक व्यवहार मंत्री शाकलियार वारजरी आणि इतर वरिष्ठ अधिकारीही उपस्थित असतील. शनिवारी, मुख्यमंत्री कॉनराड के. संगमा यांच्या समवेत मांडविया हे शिलाँग येथील एकात्मिक बहुउद्देशीय इनडोअर क्रीडा संकुलाचे उद्घाटन करतील. १३२.९ कोटी रुपयांच्या प्रकल्प खर्चातून उभारले जात असलेले हे एकात्मिक बहुउद्देशीय इनडोअर क्रीडा संकुल हे एक आधुनिक आणि बहुकार्यक्षम क्रीडा सुविधा म्हणून विकसित करण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

# डोनाला नमवून ओसाका तिसऱ्या फेरीत

### फ्रेंच ओपन टेनिस

**पॅरिस, २८ मे**

जगातील माजी अव्वल क्रमांकाची खेळाडू नाओमी ओसाकाने गुरुवारी फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत पुन्हा एकदा दिमाखदार प्रवेश केला. मात्र, दुसऱ्या फेरीत क्रोएशियाच्या डोना वेकिचवर ७-६(१), ६-४ असा विजय मिळवून स्पर्धेबाहेर पडण्याचे संकट टाळण्यासाठी तिला खूप संघर्ष करावा लागला.

जपानच्या ओसाकाने डोनाविरुद्धच्या सामन्यासाठी पांढऱ्या रंगाचा पोशाख परिधान केला होता.

**सिनरचा दुसऱ्या फेरीत सेरुंडोलोकडून पराभव**

जॅनिक सिनरचे पहिले फ्रेंच ओपन विजेतेपद आणि करिअर ग्रॅण्ड स्लॅम (चारही ग्रँड स्लॅम स्पर्धा जिंकण्याचे स्वप्न) मिळविण्याचे स्वप्न धुळीस मिळाले. गुरुवारीच्या कडक उन्हात, जुआन मॅन्युएल सेरुंडोलोविरुद्धच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यादरम्यान २४ वर्षीय इटालियन खेळाडू सिनरला शारीरिक व्याधींचा सामना करावा लागला आणि त्याला ३-६, २-६, ७-५, ६-१, ६-१ अशा फरकाने पराभवाला सामोरे जावे लागले.



मॉंटे कार्लो, माद्रिद आणि रोम येथील क्ले कोर्टवरील (मातीच्या कोर्टवरील) स्पर्धांची विजेतेपदे पटकावल्यामुळे सिनर या विजेतेपदाचा प्रबळ दावेदार म्हणून पॅरिसमध्ये दाखल झाला होता. त्यातच, त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी व गतविजेता कार्लोस अल्काराझ दुखापतीमुळे स्पर्धेबाहेर झाला होता, तर नोवाक जोकोविच अजूनही आपला सर्वोत्तम फॉर्म शोधण्याच्या प्रयत्नात आहे.

**व्हॅलेजोला नमवून कौआमेने नदालचा २३ वर्षांचा विक्रम गाठला**



पॅराग्वेच्या ॲडॉल्फो डॅनियल व्हॅलेजोविरुद्धच्या एका रोमहर्षक मॅच टाय-ब्रेक विजयासह, फ्रान्सचा मोईस कौआमे हा २००३ मधील राफेल नदालनंतर ग्रॅण्ड स्लॅम स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत पोहोचणारा सर्वात तरुण पुरुष खेळाडू ठरला आहे. कौआमे १७ वर्षांचा असताना, त्याने पहिल्याच फेरीत अमेरिकन ओपनचा माजी विजेता मारिन सिलिचचा पराभव केला; या विजयासह तो गेल्या १७ वर्षांतील ग्रॅण्ड स्लॅम सामन्यात विजय मिळवणारा सर्वात तरुण खेळाडू बनला. रोलँड गॅरोस येथील पॅरिसियन प्रेक्षकांच्या जोरदार पाठिंब्यासमोर कौआमेने व्हॅलेजोचा ६-३, ७-५, ६-३, ६-२, ६-६ (१०-८) असा पराभव केला. (वृत्तसंस्था)

## महत्वाचे...

### ग्रामीण भागात ८ तास थ्री फेज वीजपुरवठा करा : खा. शिंदे

**सोलापूर, दि. २८ मे -**



जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी, पशुपालक आणि नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी ग्रामीण भागात ६ तासांऐवजी ८ तास थ्री फेज वीजपुरवठा कायम ठेवण्यात यावा, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात सध्या महावितरणकडून केवळ ६ तास थ्री फेज वीजपुरवठा केला जात आहे. शेतकरी व पशुपालकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. जनावरांच्या दुधाची धार काढणारी यंत्रणा, पाणीपुरवठ्यासाठी मोटारी तसेच जनावरांच्या चाऱ्यासाठी लागणारी कडबाकुट्टी मशीन चालविण्यासाठी अखंडित वीजपुरवठा अत्यावश्यक आहे. अपुऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामीण भागातील दैनंदिन शेती आणि पशुपालन व्यवसायावर विपरीत परिणाम होत असल्याचेही खासदार शिंदे यांनी म्हटले आहे.



### माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त पी.बी. ग्रुपच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. २८ मे -**

प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर येथील प्रबुद्ध भारत विहार येथे माता रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त पी.बी. ग्रुप च्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रथम सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन माता रमाई यांच्या प्रतिमेस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अक्षय मस्के, गौतम शिंदे, भीमा मस्के, मिलिंद तळभंडारे, देविदास मुनगल, आदित्य साबळे व पी.बी. ग्रुपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### मंगल गव्हाणे

**बार्शी, दि. २८ मे-**



येथील सौ. मंगल भगवान गव्हाणे, वय ७०, रा. पाटील प्लॉट, बार्शी यांचे गुरुवार दि. २८ रोजी दुपारी तीव्र हृदय विकारायच्या धाक्याने निधन. त्या बार्शीतील धलोकमतचे जेष्ठ पत्रकार भ. के. गव्हाणे यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्यात पती, एक मुलगा, चार मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. शुक्रवार दि. २९ रोजी सकाळी साडेसात वाजता (७-३०) मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### मरेम्मा म्हेत्रे

**सोलापूर, दि. २८ मे-**



मोची समाजाचे शहर व जिल्हा माजी अध्यक्ष, महानगरपालिका परिवहन समितीचे माजी सभापती तथा सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष बसवराज म्हेत्रे यांच्या मातोश्री मरेम्मा सायबण्णा म्हेत्रे (वय ८५) यांचे गुरुवार, दि. २८ मे रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार, दि. २९ मे रोजी सकाळी ११ वाजता कोनापुरे चाळ येथील त्यांच्या राहत्या निवासस्थानातून निघणार असून, त्यानंतर मोदी स्मशानभूमी येथे अंतिमसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### रहमान सय्यद

**सोलापूर, दि. २८ मे-**



अमन पीव्हीसी पाईप आणि अमन हॉटेलचे मालक हाजी अ. रहमान गफूर सय्यद (वय ६७, रा.भाग्योदय सोसायटी) यांचे अल्पशा आधाराने बुधवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, २ मुली, ८भाऊ, एक बहीण आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरागअली तकिया कब्रस्तान येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी उपमहापौर हारून सय्यद यांचे ते थोरले बंधू होत.

# धाराशिव व मुंबई उपनगरची विजयी सलामी

### राज्य निमंत्रित महिला कबड्डी व खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मे -**

राज्य निमंत्रित स्पर्धेत सलामीच्या खो खोच्या सामन्यात धाराशिवच्या छत्रपती व्यायाम प्रसारक मंडळाने व कबड्डीमध्ये मुंबई उपनगरच्या स्वराज्य क्रीडा मंडळाने विजयी सलामी दिली.

नार्थकोट प्रशालेच्या मैदानावर हिंदू रक्षिनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळ यांच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र विधानसभेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार ज्योती वाघमारे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर आदी उपस्थित होते.

या स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात अश्विनी शिंदे (३ गुण व ३ मिनिटे), तन्वी भोसले (३. ५० मि. व २ गुण ) यांच्या अष्टपैलू खेळामुळे धाराशिवने सोलापूरच्या अध्यक्षीय संघाचा १५-७ असा एक डाव राखून दणदणीत विजय मिळविला.



सोलापूरकडून अर्चना व्हनमाने (१. ४० मि.) व सादिया मुल्ला (१. ३० मि.) यांची लढत अपुरी ठरली.कबड्डीच्या सलामीच्या सामन्यात मुंबई उपनगरने पुण्याच्या डॉ. पतंगराव कदम संघावर ४०-२२ अशी १८ गुणांनी मात केली. मुंबई उपनगर कडून येसिका पुजारी, प्रतीक्षा तांडेल व सानिया इंगळे यांनी तर पुण्याकडून सानिका गाडे व आर्या लवाडे यांची खेळी प्रेक्षणीय ठरली.

### सांगोल्यात सामूहिक नमाज पठण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२८ मे -**



गुरुवार दि.२८ मे रोजी बकरी ईद निमित्त सांगोला शहरातील ईदगाह मैदान येथे तसेच तालुक्यातील सर्व मशिदीमध्ये सामूहिक नमाज पठण करण्यात आले. यावेळी हाजी शब्बीरभाई खतीब यांनी खुतबा पठण केले व उपस्थित असलेल्या मुस्लिम बांधवांना बकरी ईद अर्थात ईद-उल आजहा या सणाचे महत्त्व समजावून सांगितले. या सामूहिक नमाज पठन प्रसंगी परंपरेप्रमाणे मुल्ला कुटुंबीयातील जेष्ठ सदस्य हाजी इब्राहिम मुल्ला यांनी अजान पठण केली व शहर काझी, आलमशा काझी यांनी इमामात करत नमाज पठण केली.

नमाज होताच हाजी शब्बीर खतीब यांनी अल्लाह चरणी आपल्या भारत देशातील सामाजिक सलोखा टिकून रहावा, देशाची संपूर्ण जगभरात प्रगती व्हावी त्यासह नैसर्गिक आपत्ती होऊ नये, शेतकरी व सर्वच नागरिक आनंदी राहावेत आरोग्यदायी राहावेत यासाठी दुवा केली. नमाज पठण झाल्यानंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देऊन बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## महापालिका आरोग्य विभागातील ५ महिला डॉक्टरांच्या अंतर्गत बदल्या

### रुग्णसेवेतील दिरंगाई टाळण्यासाठी प्रशासनाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मे**

शहरातील महापालिका प्रसूतीगृहांमधील वाढता रुग्णभार आणि काही ठिकाणी जाणवणारी तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने आरोग्य विभागात मोठा प्रशासकीय फेरबदल केला आहे. महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी ३ स्त्रीरोगतज्ज्ञ आणि २ वैद्यकीय अधिकाऱ्यांसह एकूण ५ महिला डॉक्टरांच्या अंतर्गत बदल्या केल्या.

महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये तातडीच्या वैद्यकीय सेवा देण्यासाठी आरोग्य विभागाकडून भर दिला जात आहे. त्यासाठी गरजेप्रमाणे महिला डॉक्टरांच्या बदल्या केल्या आहेत. या आदेशातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे 'ऑन इमर्जन्सी कॉल' ही नवी कार्यपद्धती आहे. प्रसूतीसारख्या तातडीच्या सेवेत एक मिनिटही महत्त्वाचा असतो. त्यामुळे डॉ. मृणाल खंदारे व डॉ. दिपाली गावडे या दोन स्त्रीरोगतज्ज्ञांकडे आता दोन- दोन प्रसूतीगृहांची जबाबदारी दिली आहे. डॉ. मृणाल खंदारे साबळे प्रसुतीगृहासह राम वाडी प्रसूतीगृह, तर डॉ. दिपाली गावडे या चाकोते प्रसुती गृहासह जिजामाता प्रसूतीगृहाची जबाबदारी 'ऑन इमर्जन्सी कॉल' तत्त्वावर सांभाळणार आहेत. एकाचवेळी दोन ठिकाणची जबाबदारी दिल्याने मनुष्यबळाचा जास्तीत जास्त वापर करून रुग्णसेवेला गती देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. तसेच स्त्री रोगतज्ञ डॉ. रेणुका लहांडे यांची रामवाडी प्रसुती गृहातून पु. रा. अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहात, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नाली नागणे यांची दाराशा प्रसुतीगृहातून पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृहात आणि वैद्यकीय अधिकारी पूजा वाघमारे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी प्रसुतीगृहातून दाराशाच्या प्रसूतीगृहाकडे बदली करण्यात आली आहे.

#### कोणत्याही मातेला उपचारा-अभावी त्रास होऊ नये

शहरातील सर्व प्रसूतीगृहांमध्ये २४ तास सेवा सुरू राहावी आणि कोणत्याही मातेला उपचाराअभावी त्रास होऊ नये या एकमेव उद्देशाने हे बदल केले आहेत, अशी प्रतिक्रिया आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. सर्व संबंधित डॉक्टरांना पुढील आदेश होईपर्यंत नवीन ठिकाणी तात्काळ रुजू होण्याचे निर्देश दिले आहेत. निर्णयामुळे विशेषतः रामवाडी, जिजाम ता व दाराशा प्रसूतीगृहातील सेवा अधिक बळकट होणार असल्याचे महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी सांगितले.

## गोकुळ शुगरच्या थकीत ऊसबिलासाठी प्रशासनाची मध्यस्थी

### प्रांताधिकारी सुमित शिंदे व तहसीलदार किरण जमदाडे यांनी शेतकऱ्यांशी साधला संवाद; लवकर तोडगा काढण्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ मे-**

गोकुळ शुगर कारखान्याकडे थकीत असलेल्या १३० कोटींच्या देयकांसाठी आंदोलन करत असलेल्या शेतकऱ्यांशी प्रशासनाने पुढाकार घेत चर्चा केली.

प्रांताधिकारी सुमित शिंदे आणि दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी आंदोलनस्थळी भेट देत शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी शेतकऱ्यांनी थकीत ऊसबिलाची रक्कम तातडीने मिळावी, अशी ठाम मागणी प्रशासनाकडे मांडली. अनेक दिवसांपासून पैसे रखडल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची



व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, शासकीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या भावना समजून घेत संबंधित कारखाना व्यवस्थापनाशी चर्चा करून सकारात्मक मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे आठवडाभराम ध्ये शेतकऱ्यांचे पैसे परत मिळवून देऊ अशी ग्वाही प्रांताधिकारी सुमित शिंदे आणि दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी आंदोलनकर्ते शेतकऱ्यांना दिली.

शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनस्तरावरही पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले. यावर आंदोलनकर्ते शेतकऱ्यांनीही आपल्या मागण्यांवर ठाम राहत प्रशासनाने लवकरात लवकर ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. या चर्चेमुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि शेतकरी यांच्यात संवादाची प्रक्रिया सुरू झाल्याचे चित्र दिसून आले.

## कार्यकारिणी बरखास्त झाली तर आत्मचिंतन करा

### टेंभुर्णीतील शिवसेना शिंदे गटाचा मेळावा; संघटन बांधणीवर भर देण्याचे आवाहन

### मंत्री उदय सामंत यांच्याकडून पदाधिकाऱ्यांची कानटोचणी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २८ मे -**

पक्षाचे काम न करता गटबाजी करणाऱ्यांना हाकलून दिले पाहिजे. कार्यकारिणी बरखास्त करण्याची वेळ आली असेल तर संबंधितांनी आत्मचिंतन करावे, अशा शब्दांत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी शिवसेना पदाधिकाऱ्यांचे कान टोचले.

टेंभुर्णी येथे आयोजित शिवसेना शिंदे गटाच्या मेळाव्यात ते बोलत होते. मेळाव्यास शिवसेनेचे राष्ट्रीय सरचिटणीस राहुल शेवाळे, खासदार ज्योती वाघमारे, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माढा लोकसभा संपर्क प्रमुख चंद्रहार पाटील, माजी आमदार जयवंत जगताप, आरती बसवंती, संभूराजे जगताप यांच्यासह तालुक्यातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी गावपातळीवर सक्रीय राहणे गरजेचे आहे. आनंद दिघे यांच्यासारखे आक्रमक आणि जनसामान्यांशी नाळ जोडणारे नेतृत्व निर्माण झाले पाहिजे.

नव्या कार्यकर्त्यांना संधी देऊन पक्ष अधिक बळकट करणे ही काळाची गरज आहे. बाळासाहेब ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर चालणाऱ्या शिवसेनेला जिल्ह्यात पुन्हा वैभव प्राप्त करून देण्यासाठी एकजुटीने काम करावे. गावोगावी शाखा सक्रीय करून संघटन वाढीसाठी पदाधिकाऱ्यांनी जबाबदारीने काम करण्याचे आवाहनही मंत्री सामंत यांनी केले.

माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संयोजक संजय कोकाटे यांनी संघटन वाढीसाठी कार्यकर्त्यांनी ध्येय डोळ्यासमोर ठेवून काम करण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक महेश चिवटे यांनी केले. सूत्रसंचालन राजू पाटील यांनी तर नामदेव हांडे यांनी आभार मानले.

## खरेदीपर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे वागदरी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर येथील रहिवाशी लोकांना आमचे अशिल हजूर न्यू अँड रिन्यूएबल एनर्जी प्रा.लि.मुंबई, तर्फे अधिकृत प्रतिनिधी श्री सदानंद लक्ष्मणराव पाटील, रा.बानेर, पुणे. यांच्यावतीने या जाहीर नोटीसीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे-

मौजे वागदरी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर येथील शेतजमीन गट नंबर खालील प्रमाणे

| अ. क्र. | गट नं | हे.आर पो.ख.सहीत एकूण क्षेत्र | आकार रु.पै. | यापैकी विक्री क्षेत्र हे.आर | खातेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १.<br>२. | ३६४/१/अ<br>३६४/१/ब | ७.५३.५०<br>७.५४ | १०.५१<br>१०.५४ | ७.५३.५०<br>७.५४१ | १. महानंदा हणमंतराय बिराजदार<br>२. प्रभाकर हणमंतराय बिराजदार<br>अ.पा.क महानंदा हणमंतराय बिराजदार<br>३.परमेश्वर हणमंतराय बिराजदार |
| ३. | ३६४/२/अ | ६.६३ | ९.४० | ३.४३ | विठ्ठल शरणप्पा बिराजदार |
| ४. | ३६४/२/क | ०.८० | १.१० | ०.८० | १.विठ्ठल शरणप्पा बिराजदार<br>२.महानंदा हणमंतराय बिराजदार<br>३.प्रभाकर हणमंतराय बिराजदार<br>अ.पा.क महानंदा हणमंतराय बिराजदार<br>४.परमेश्वर हणमंतराय बिराजदार |
| ५. | ३६०/१ | ८.५७ | ११.२० | ८.५७ | १.काशिनाथ शिवबसप्पा झळकी<br>२.परमेश्वर शिवबसप्पा झळकी<br>३.शोभा रेवाप्पा यमाजी<br>४.सिद्धराज विजयकुमार झळकी |
| ६. | ३६०/३ | २.९६ | ३.९५ | २.९६ | सिध्दराज विजयकुमार झळकी |
| ७. | ३६०/४ | २.९५ | ३.९५ | २.९५ | परमेश्वर शिवबसप्पा झळकी |
| | एकूण क्षेत्र | | | ३३.७८५० | |

त्यातील असणाऱ्या तदंगभूत वस्तुसह व सर्व हक्कासह, या मिळकती वर नमूद खातेदारांची स्वसंपादित/वडिलोपार्जित/वाटपाने आलेल्या सामाईक / स्वतंत्र मालकी वहिवाटीच्या मिळकती असून सदर मिळकती आमचे अशिलांना करार नाम्याने विकण्याचे/भाडेपट्ट्याने देण्याचे निश्चित केले आहेत. सदरील मिळकतीच्या विद्यमान मालकांनी सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा व सदरील मिळकत आमचे अशिलांना विकण्याचा/भाड्याने देण्याचा हक्क व अधिकार विद्यमान मालकाना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे.

त्याचाच एक भाग म्हणून वर नमूद खातेदारांनी आमच्या अशिलांना विकण्याचे / भाड्याने देण्याचे निश्चित करून करारनामा लिहून देवून इसारापोटी काही रक्कम आमच्या अशिलांकडून स्विकारलेले आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर विद्यमान मालक खरेदीचा/ भाडेपट्ट्याचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

सबब या जाहीर नोटीसाने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदरील मिळकतीवर कोणाचा खरेदी, विक्री, साठेखत, तारण, लिज,लीन, दान, पोटगी, कोर्टजप्ती, बक्षीस, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आवश्यक त्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आमचे खालील पत्त्यावर आमच्याशी संपर्क साधून त्या बाबत खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरील मिळकतीवर वरील नमूद विद्यमान मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही, अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा/ भाडेपट्ट्याचा पुढील व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही, कसलीही तक्रार याबाबत चालणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व / भाडेपट्टापुर्व जाहीर नोटीस दिली.

ता. २५/०५/२०२६

सही/-
अशिला

सही/-
अशिला तर्फे ॲडव्होकेट
(ॲड ए.के. पीरजादे, ॲड. ए.एस. पाटील)
रा.जुना राजवाडा जवळ, टिळक गल्ली,
अक्कलकोट जि.सोलापूर
मोबा :-९८८१३६२६५६/ ९९२१२०९९२९

## भविष्यात धनगर समाजातील तरुण नेतृत्वाला संधी : शिंदे

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त मूर्ती वाटप व सत्कार सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी, दि.२९ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समिती, माढा तालुका यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१ वा जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. मूर्ती वाटप कार्यक्रम तसेच नव-निर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक किशोर बापू सलगर यांनी केले. यावेळी कार्यक्रम ाचे अध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार रामराव वडकुते यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात धनगर समाजाच्या राजकीय सहभागावर भाष्य केले. धनगर समाज हा शब्द पाळणारा समाज असून समाजातील तरुणांनाही आता राजकारणात सक्रिय होण्याची इच्छा असल्याचे त्यांनी सांगितले.



दीड कोटी लोकसंख्या असलेला हा समाज सत्तेत सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.

खासदार वडकुते यांनी आयोजक किशोर सलगर यांच्या कार्याचे विशेष कौतुक करत, अशा प्रकारचा उपक्रम महाराष्ट्रात प्रथमच होत असून तो सम ाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. आगामी काळात किशोर सलगर यांना निश्चितच राजकीय बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच रामभाऊ टकले यांच्या सहकार्याचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना या उपक्रमाचे कौतुक केले. शिंदे कुटुंबीय आणि भारतीय जनता पक्ष हा कायमच धनगर समाजासह सर्व मायक्रो ओबीसी समाजाच्या पाठीशी ठाम पणे उभा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिथे जिथे संधी उपलब्ध होईल, त्या ठिकाणी समाजातील होतकरू व तरुण नेतृत्वाला संधी दिली जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.यावेळी जिल्हा परिषद माजी सभापती शिवाजीराजे कांबळे, सोलापूर महानगरपालिकेचे सभागृह नेते नरेंद्र काळे, नियोजन समिती सदस्य तथा भाजप माढा पश्चिम मंडल अध्यक्ष योगेश बोबडे आणि डॉ. शशिकांत तरंगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य प्रतिभा खरात, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती अमृता वाघे यांचे प्रतिनिधी नागनाथ वाघे, पंचायत समिती उपसभापती प्रतिनिधी हनुमंत गिड्डे, पंचायत समिती सदस्य प्रतिनिधी परमेश्वर खरात, दिलीप भोसले, मधुकर देशमुख, माणिक श्रीरामे, सचिन देशमुख, दादासाहेब देशमुख, अशोक मिस्किन, तानाजी गाडे, नागेश खटके, जितेंद्र गायकवाड, निवृत्ती तांबवे, संभाजी पाटील, पत्रकार सचिन होदाडे, सतीश काळे तसेच गावचे विद्यमान व माजी सरपंच, पदाधिकारी आणि शेकडो समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक किशोर सलगर यांच्यासह रामचंद्र आबा टकले, राजाभाऊ थोरात, तानाजी सलगर, कांतीलाल टेळे, अण्णासाहेब ठेंगल, धनाजी जवळगे, बळीराम टकले, केशव देवकते, लक्ष्मण पाटील, माणिक झिंजे, तात्यासाहेब कारंडे व अमोल देवकते यांनी सहकार्य केले.

#### टेंभुर्णी औद्योगिक वसाहतीतील फायर ब्रिगेड यंत्रणेला मंजुरी

मंत्री उदय सामंत यांनी यावेळी टेंभुर्णी औद्योगिक वसाहतीतील फायर ब्रिगेड यंत्रणेला मंजुरी दिल्याची घोषणाही त्यांनी केली. त्यामुळे स्थानिक उद्योग क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## महत्वाचे...



### महापौर कोंड्याल यांनी केले स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २८ मे-**
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अशोक चौक परिसरातील श्री मार्कंडेय उद्यान येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुतळ्यास महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, नगरसेवकद्वय प्रथमेश कोठे, ज्ञानेश्वर म्याकल, सतीश सिरसिल्ला, अक्षय अजिखाने, सत्यनारायण गुर्रम, मेघनाथ येमूल, श्रीनिवास दायमा, विजय चिप्पा, नगरसेविकाद्वय दीपिका यलदंडी, राजश्री दोडमनी यांच्यासह चन्नवीर चिट्टे, बजरंग कुलकर्णी, यशवंत पाथरुट, विजय कुलथे, अंबादास बिंगी, नागेश सरगम, शंकर चौगुले, विश्वनाथ प्याटी, नागनाथ सोमा, विजय पुकाळे आदी उपस्थित होते.



### आयुर्वेद कॉलेज रोड, बुधवार पेठ परिसरात कचऱ्याचे ढीग

**सोलापूर, दि. २८ मे-**
बुधवार पेठसह परिसरात वाढलेल्या कचऱ्याच्या समस्येमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले. महापालिकेने तातडीने कचरा उचलण्याचे योग्य नियोजन करावे अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी दिला आहे. आयुर्वेद कॉलेज रोड, जय मल्हार चौक, मातंग वस्ती, मिलींद नगर, सम्राट चौक, बुधवार पेठ आदी परिसरात महापालिकेच्या कचरा उचलणाऱ्या मक्तेदाराच्या दुर्लक्षामुळे कचऱ्याचे ढिगारे साचल्याचे चित्र दिसत आहे. आयुर्वेद कॉलेज रोडवरील उकिरड्यात अनेक दिवसांपासून मृत कुत्रा पडून असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. या प्रकारामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# 'टेंभुर्णी'त मध्यरात्री घडला थरार; चार आरोपी जेरबंद

**▶▶ २ कोटी ७० लाखांचा मुद्देमाल हस्तगत**
**▶▶ सुरत, चेन्नईपर्यंत पोहोचले तपासाचे धागेदोरे**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२८ मे-**
टेंभुर्णी-करमाळा रोडवरील बंद पडलेल्या टोलनाक्याजवळ धाडसी दरोडा पडला. या दरोड्यात तब्बल ३ कोटी रुपयांचा ऐवज चोरीला गेला होता. टेंभुर्णी पोलिस आणि स्थानिक गुन्हे शाखेख्या पथकांकडून याचा तपास सुरु असताना मध्यरात्री थरार घडला. यात चार आरोपींना जेरबंद करण्यात आले. त्यांच्याकडून सोन्याचे दागिने, मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण २ कोटी ७० लाख ११ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

याबाबतचे वृत्त असे की, कर्नाटक राज्यातील विजयपूर जिल्ह्यातील चडचण येथील साडी व्यापारी बाहुबली एन. मुत्तीन यांच्या दुकानातील मॅनेजर धुंडाप्पा रामान्ना खलाटे (वय-३५, रा.गोटयाळ, ता.चडचण) यांना दुकानमालकांनी सुरत येथे माल खरेदीसाठी ३ कोटी रुपयांची रोख रक्कम दोन पोत्यांमध्ये देऊन पाठविले होते. धुंडाप्पा खलाटे हे नागनाथ सुर्वे व सुनील सुर्वे यांच्यासमवेत एम.एच.४५ ए.एफ.१५१६ या क्रमांकाच्या आयशर टेम्पोंमधून ही रक्कम नेत होते.




दि.११ मे २०२६ रोजी पहाटे २.१५ वाजण्याच्या सुमारास टेंभुर्णी-करमाळा रोडवरील बंद पडलेल्या टोलनाक्याजवळील वळणावर अचानक गजरी रंगाची विनानंबर स्विफ्ट कार टेम्पोसमोर आडवी लावण्यात आली. कारमधून उतरलेल्या चार जणांनी चाकूचा धाक दाखवत टेम्पो थांबविला. टेम्पोमधील सर्वांना मारहाण करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. टेम्पोच्या टपावर ताडपत्रीत बांधून ठेवलेली पैशांची दोन्ही पोती खाली उतरवून स्विफ्ट कारमध्ये टाकून धूम ठोकली.

याप्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात ३४६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६), १२६(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांच्या हाती तपासाची सुत्रे देण्यात आली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे संजय जगताप यांनी दोन स्वतंत्र तपास पथके तयार केली.

तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही तपास व गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी प्रथम अजित नामदेव सुर्वे (रा.मोडनिंब) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिली. यानंतर पोलिसांनी सिध्देश्वर नामदेव माने याला सुरत तर शुभम शहाजी पाटील याला मोडनिंब परिसरातून ताब्यात घेतले. या गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्विफ्ट कार विकी राजाभाऊ गिड्डे याची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सिध्देश्वर माने याने चोरीतील काही रक्कम आपला दाजी सुरज देविदास उन्हाळे (रा.पोखरापूर, ता.मोहोळ) यांना दिल्याची माहिती समोर आली. त्यातून सोन्याची खरेदी करण्यात आल्याने त्यालाही पोलिसांनी अटक केली. या कारवाईत पोलिसांनी २ कोटी ६२ लाखांची रोख रक्कम, ५ लाख ४९ हजार ४४० रुपयांचे सोने, २ लाख ६१ हजार ९९० रुपयांचे तीन ॲपल मोबाईल असा एकूण २ कोटी ७० लाख ११ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपींना २८ मे २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, करमाळा विभागाच्या सहाय्यक पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस अधीक्षक राहुल आत्राम, संजय जगताप, ज्ञानदेव वाघ, विजय गोसावी, अमित बाबर, अजित मोरे, ख्वाजाभाई मुजावर, नारायण गोलेकर, प्रकाश काटकर आदींनी ही कामगिरी बजाविली.

# सिमेंट रस्त्यांच्या विळख्यातून झाडांची मुक्तता करा : पक्षीमित्र गाडगीळ

**आळ्यात सदाफुली लावून शहर सुंदर बनवा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मे-**
आपल्या शहरात ठिकठिकाणी सिमेंटचे रस्ते आणि पेविंग ब्लॉक्स बसवण्याचं काम जोरात सुरू आहे. पण हे काम करताना कंत्राटदार जुन्या आणि मोठ्या झाडांच्या बुंध्यालाच थेट सिमेंट लावून रस्ता पक्का करत आहेत. शास्त्रीय भाषेत याला 'ट्री चोकिंग' म्हणतात, म्हणजेच सोप्या भाषेत सांगायचं तर आपण झाडांचा गळा आवळत आहोत. यामुळे सिमेंट रस्त्यांच्या विळख्यातून झाडांची मुक्तता करा आणि आळ्यात सदाफुली लावून शहर सुंदर बनवावे अशी मागणी पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ यांनी केली आहे.

झाडांची मुळं केवळ त्याला आधार देत नाहीत, तर जमिनीतून पाणी, हवा आणि ऑक्सिजन शोषून घेतात. बुंध्याभोवती सिमेंटचा घट्ट वेढा पडल्यामुळे मुळांपर्यंत पाणी आणि हवा पोहोचणं पार बंद झालं आहे. यामुळे झाडांची नैसर्गिक वाढ खुंटली असून ती आतून सुकू लागली आहेत. वरून जरी झाड चांगलं दिसलं, तरी मुळं कमकुवत झाल्यामुळे उद्या किरकोळ वादळ-पाऊस आला तरी ही झाडं उन्मळून पडू शकतात, ज्यामुळे मोठी दुर्घटना होऊ शकते. शिवाय, यामुळे शहरातली भूजल पातळीही खालावत चालली आहे.

राष्ट्रीय हरित लवादाच्या (NGT) नियमांनुसार, रस्त्याचं काम करताना प्रत्येक झाडाच्या बुंध्याभोवती किमान ३ ते ४ फूट जागा पूर्णपणे मोकळी ठेवायलाच हवी. महानगरपालिकेने रस्ते बनवतानाच कंत्राटदारांना हा नियम पाळण्याची सक्ती केली पाहिजे. जिथे आधीच सिमेंट झालंय, तिथलं सिमेंट मशीनने काळजीपूर्वक तोडून तिथली माती मोकळी करायला हवी आणि त्यात थोडं खत टाकायला हवं. आता ही मोकळी केलेली जागा नुसतीच उघडी न ठेवता, तिथे आपण सदाफुलीसारखी काटक आणि सुंदर झाडं लावू शकतो, असेही त्यांनी सांगितले.

### महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २८ मे-**
स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कौन्सिल हॉल येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस उपायुक्त सोनाली यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, भास्कर सामलेटी, जयप्रकाश अमनगी, अशोक खडके, सिध्दू तिमीगार, चेतन गदगे, प्रेम कांबळे आदी उपस्थित होते.



# मनपा अधिकारी खरंच गेंड्याच्या कातडीचे आहेत का?




महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० साली तर सोलापूर महापालिकेची स्थापना १९६४ साली झाली. देश स्वातंत्र्य होण्यापूर्वी सोलापूरने काही दिवस स्वातंत्र्य उपभोगल्याचे मोठे उदाहरण देशासमोर आहे. देश स्वातंत्र्यापूर्वी संवेदनशील असणारी सोलापूरची जनता स्वातंत्र्यानंतर मात्र कमालीची सहनशील झाल्याचे वारंवार दिसून येते. नुकतेच एका विकासकामाच्या पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटी, अनियमिततेवरुन महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी दस्तुरखुद्द महापालिका पदाधिकाऱ्यांसमोरच महापालिकेच्या अधिकाऱ्यांची 'कानउघाडणी' करत झाप झाप झापले. महापालिकेच्या प्रशासनाचा कारभार दोन वर्षांपासून चालवताना आलेल्या अनुभवाच्या उद्रेकातून महापालिका आयुक्तांनी महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांसंदर्भात महत्वाचे निरिक्षण नोंदवताना सांगितले की, महापालिकेचे अधिकारी गेंड्याच्या कातडीचे झाले आहेत. याचा अर्थ काय तर महापालिकेचे अधिकारी कोणाचे ऐकत नाहीत, वारंवार दिलेल्या आदेशाची पायमल्ली होते, सोलापूरच्या विकासावर याचा मोठा परिणाम जाणवतो; हेच सर्वकाही आयुक्तांच्या रोषातून स्पष्ट होते आहे. एकूणच महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कामगिरीवर कटाक्ष टाकला तरी सामान्यांना देखील हेच जाणवते की, महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी गेंड्याच्या कातडीचेच झालेले आहेत. सोलापुरातील काही समस्या वर्षानुवर्षे 'जैसे थे' आहेत. महापालिकेवर काँग्रेसची अनेक वर्षे सत्ता होती. गेल्या काही वर्षापासून 'भाजपा'ची सत्ता आहे. दरम्यानच्या काळात तीन वर्षे महापालिकेवर प्रशासकही होते. राजकीय सत्ता असो अथवा प्रशासकीय राजवट; कोणीही या निर्ढावलेल्या गेंड्याच्या कातडीच्या प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना वठणीवर आणू शकले नसल्याचेच आयुक्तांच्या रोषातून सिध्द होते. दस्तुरखुद्द महापलिकेचे आयुक्तच त्रागा व्यक्त करतात तर मग सामान्यांनी काय करायचे? असा प्रश्न पडणे साहजिकच आहे.

सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारे १२३ टीएमसीचे महाकाय उजनी धरण सोलापूरच्या उशाशी असतानाही केवळ प्रशासनाच्या हतबलते मुळे सोलापूरकरांना वर्षानुवर्षे आठवड्याला पाणीपुरवठा सहन करावा लागतो, ही शोकांतिका आहे. पाणीपुरवठ्याच्या त्रुटी शोधण्यासाठी अनेकदा सर्व्हे झाले. शहरात ६१ हजार बोगस नळ कनेक्शन असल्याचेही एका सर्व्हेक्षणातून समोर आले आहे. परंतु त्याचे पुढे काय झाले? हे श्री सिध्दरामेश्वरालाच माहिती. महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागातच बोगस बांधकाम परवाना देणारी प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची टोळी सापडली. याप्रकरणी पोलिसात गुन्हाही दाखल आहे. भूमी मालमत्ता विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी डॉ.आंबेडकर चौकातील वुलन मार्केटची जागाच आयुक्तांच्या परस्पर विकल्याचा गंभीर प्रकार उघड झाला. याप्रकरणीही गुन्हा दाखल झाला आहे. सोलापूरची विमानसेवा सुरु झाली पण शहरवासियांना अनेक वर्षांपासून सिटी बससेवेसाठी वाट पहावी लागते आहे. केंद्र सरकारकडून मिळालेल्या १०० नवीन बसेसची चेसी क्रॅक असतानाही प्रशासनाने त्या स्वीकारल्या होत्या. परिवहन विभागातील कर्मचारीच डिझेल चोरीच्या प्रकरणात आढळल्याचा प्रकारही समोर आला होता.

सोलापूर महापालिकेचे बजेट हजार कोटींच्यावर असते. पण प्रत्यक्षात बजेटची अंमलबजावणी-उद्दिष्टपूर्ती होत नाहीच. पण शासनाकडून मिळणाऱ्या जीएसटी अनुदानातून अधिकारी, कर्मचाऱ्यांचे पगार मात्र वेळेवर होतात. वास्तविक पाहता जीएसटी अनुदानातून पगार करणे बंद केले पाहिजे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दरमहाच्या वेतना इतकीतरी कर वसुली करणे अथवा महापालिकेचे उत्पन्न आणण्याची गरज आहे. परंतु याबाबत सर्वांचेच मौन आहे. शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे आहेत, अतिक्रमणं प्रचंड वाढली आहेत. पार्क चौपाटी येथे तर फूटपाथवरच भेळ गाड्या थांबतात आणि लोक रस्त्यावरुन चालतात ही दुर्दैवी बाब आहे. दररोज सायंकाळी पाचनंतर चार हुतात्मा पुतळे अतिक्रमणाच्या विळख्यात असतात. शहरात दिवसाढवळ्या शेकडो झाडांची कत्तल होत असतानाही मनपा प्रशासन कठोर भूमिका घेत नसल्याची शोकांतिका आहे. सोलापूरचे तापमान ४४ अंशावर पोहचले असून सोलापूरकरांच्या अंगाची लाहीलाही होत असतानाही वृक्षारोपण तर होतच नाही. जुन्या झाडांची कत्तल मात्र राजरोसपणे होत आहे.



राजकारणात माहीर असलेले पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महापालिका प्रशासनावरही वचक ठेवणे गरजेचे आहे. शहरात भारतीय जनता पार्टीचे तीन अनुभवी आमदार तैनात आहेत. १०२ पैकी ८७ नगरसेवकांचे पाशवी बहुमत असणाऱ्या 'भाजपा'च्या महापौर व पदाधिकाऱ्यांनीही 'डोळस कारभार' करण्याची गरज आहे. सोलापूरकराच्या संवेदनशीलेची सत्वपरीक्षा न पाहता लोकप्रतिनिधी आणि महापालिका आयुक्तांनी निर्ढावलेल्या गेंड्याच्या कातडीच्या प्रशासनावर अंकुश ठेवावा. अन्यथा हे निरंकुश प्रशासन सर्वांसाठीच भस्मासूर ठरल्यास आश्चर्य वाटायला नको.

# महारोजगार मेळावा : ६५० पेक्षा अधिक उमेदवारांची नोंदणी; ४० कंपन्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मे-**
रोटरी क्लब ऑफ सोलापूर, इक्विटास डेव्हलपमेंट इनिशियेटिव्ह ट्रस्ट व महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या महारोजगार मेळाव्यात ६५० पेक्षा अधिक उमेदवारांनी नोंदणी केली. यात प्रिसिजन कॅम्पशाफ्ट, लक्ष्मी हायड्रोलिक प्रायव्हेट लिमिटेड, यशस्वी अकॅडमी स्किल, आहेरकर बजाज ऑटोमोबाईल्स, भागवत असोसिएटस्, पी.पी. पटेल मेटल पावडर प्रायव्हेट लिमिटेड, गुरुदत्त एंटरप्राइजेस, मोंढे उद्योग समूह यांसह एकूण ४० कंपन्यांनी सहभाग नोंदविला होता.

इयत्ता दहावी पास/नापास, आयटीआय उत्तीर्ण, डिप्लोमा, पदवीधर उमेदवारांसाठी विविध प्रकारच्या रोजगार संधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सर्व्हिस सेक्टर, बँकिंग सेक्टर, उत्पादन क्षेत्र, विमा कंपन्या, हॉस्पिटल्स, केमिकल उद्योग अशा विविध आस्थापनांमधील नोकऱ्यांचा समावेश आहे. महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या अध्यक्षा धनश्री केळकर यांनी रोटरी करिअर कनेक्ट या प्रकल्पाची घोषणा केली.



सोलापूरमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध असून बेरोजगारांनी याचा लाभ घ्यावा आणि सोलापूरच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी मनोज बिडकर यांनी केले. याप्रसंगी नीलेश फोफलिया, शिवाजी उपरे, सलाम शेख, शांता येळंबकर, निशांत डागा, आकाश बाहेती, संतोष कणेकर, ब्रिजकुमार गोयदानी, झुबीन अमारिया आदी उपस्थित होते.

# चित्रपटांपेक्षा माणसांची 'होप' बनण्यातच खरे समाधान : सोनू सूद

**▶▶ मोहोळ तालुक्यातील मसलेचौधरी गाव घेतले दत्तक**

**▶▶ 'उन्नती' उपक्रमातून शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधांवर भर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ मे-**
चित्रपटांचे यश, पुरस्कार आणि बॉक्स ऑफिसचे आकडे महत्त्वाचे असले तरी एखाद्या सामान्य माणसाची आशा बनण्यात जे समाधान मिळते, ते कोणत्याही यशापेक्षा मोठे असते, अशी भावना अभिनेता व समाजसेवक सोनू सूद यांनी व्यक्त केली.

सोलापूरातील पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी 'सोनू सूद चॅरिटी फाउंडेशन', 'उन्नती' उपक्रम, सामाजिक कार्य, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य आणि राजकारणातील प्रवेशाबाबत मनमोकळेपणाने भूमिका मांडली.कोविड काळात मजुरांना घरी पोहोचवण्यापासून सुरू झालेला प्रवास आज शिक्षण, वैद्यकीय मदत, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण विकासापर्यंत पोहोचल्याचे सांगताना सोनू सूद म्हणाले, ही लढाई एकट्याने जिंकता येत नाही. पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य लोकांच्या सहकार्यामुळेच हजारो लोकांपर्यंत मदत पोहोचवणे शक्य झाले.



### सध्या तरी राजकारणात जाण्याचा विचार नाही

राजकारणात प्रवेशाबाबत विचारलेल्या प्रश्नावर सोनू सूद यांनी सध्या तरी कोणताही राजकीय विचार नसल्याचे स्पष्ट केले. राज्यसभेसह अनेक मोठ्या ऑफर्स आल्या मात्र सध्या समाजकार्यातून लोकांशी जोडलेले राहणे मला अधिक महत्त्वाचे वाटते, असे ते म्हणाले.सरकारसोबत सामाजिक प्रकल्पांमध्ये सहकार्य करण्यास आपण तयार असल्याचे सांगताना सोनू सूद म्हणाले, सरकारी यंत्रणांसोबत समन्वय साधून अनेक ठिकाणी शाळा आणि सुविधा उभारण्याचे काम केले आहे. सहकार्याने मोठे बदल घडवता येऊ शकतात.

यावेळी त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील 'उन्नती' प्रकल्पाची माहिती दिली. मोहोळ तालुक्यातील मसलेचौधरी गाव दत्तक घेतल्याचे सांगत, त्या गावात रस्ते, ड्रेनेज, वीज, शौचालये, आरोग्य आणि शिक्षण सुविधा उभारण्यावर भर दिला जाणार असल्याचे स्पष्ट केले. ग्रामीण शाळांमधील मूलभूत सुविधांचा प्रश्न गंभीर असल्याचे नमूद करताना ते म्हणाले, अनेक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह नसते. अशा छोट्या पण महत्त्वाच्या समस्यांवर काम करण्याची गरज आहे. सोलापूर आणि परिसरातील गरजू शाळांची माहिती दिल्यास मदतीचा प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले.

### मोकाट कुत्र्यांसाठी शेल्टर होमची गरज

मोकाट कुत्र्यांच्या प्रश्नाविषयी बोलताना म्हणाले, महापालिका, शासन यावर अवलंबून राहता कामा नये. यासाठी शेल्टर होमची गरज आहे. नागरिकांनीही सहभाग घेतला पाहिजे.

शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या मुलांच्या शिक्षणासाठीही फाउंडेशन कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. एका मुलाला शिक्षण दिल्यास त्याच्या पुढील पिढ्यांचे भविष्य बदलू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.आपण सर्वांनी मिळून काम केले, तर पुढील दहा वर्षांत हजारो लोकांचे आयुष्य बदलू शकतो, असा आशावाद व्यक्त केला. या पत्रकार परिषदेस चित्रकार विपुल मिरजकर, रूपल पांडे , मानसी, राहुल बऱ्हाणपूरकर आदी उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २० मे, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ३ जून, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.



## विविध वृत्त...

### नीट परीक्षेचे शुल्क विद्यार्थ्यांना परत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : नॅशनल टेस्ट एजन्सीने (एनटीए) ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट परीक्षेचे शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्याचा निर्णय घेतला असून, २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या नीट परीक्षेचे शुल्क आकारले जाणार नाही. परीक्षा शुल्क परतावा पोर्टल सुरू करून ते पैसे विद्यार्थ्यांना त्यांच्या खात्यावर परत केले जात आहे. ३ मे २०२६ रोजी झालेली नीट परीक्षा पेपर फुटीच्या आरोपांमुळे रद्द करण्यात आल्याने सर्व पात्र उमेदवारांना शंभर टक्के फी परत दिली जात आहे. तसेच २१ जून २०२६ रोजी होणारी नवीन फेर परीक्षा पूर्णपणे विनामूल्या असेल, असे एनटीएने कळविले आहे.

परीक्षा शुल्क परत मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत देखील एनटीने सांगितली होती. कारण बऱ्याच विद्यार्थ्यांनी सायबर कॅफे किंवा ई मित्रवरून पेमेंट केले होते. तसेच एनटीए बँक खात्यात पैसे पाठवत नाही. त्यामुळे उमेदवारांना स्वतःचे किंवा पालकांचे बँक खाते तपशील देणे आवश्यक केले होते. बँक खातेदाराचे नाव, खाते क्रमांक, बँकेचे नाव, आयएफएससी कोड अशी माहिती एनटीएने उमेदवारांकडून मागवून घेतली होती.

### लॉर्ड श्रीकृष्ण स्कूलमध्ये लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती साजरी केली.

सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, सुशील गोसावी, अजित कोक रे, कमल मुंडे, अरुणा राठोड, सुप्रिया बारगजे, भीमराव लच्वेवार यांच्या हस्ते लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पिट लाईनचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार : खा. शिवाजी काळगे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या विविध विकासकामांना आता गती मिळाली असून, बहुप्रतिक्षित पिट लाईनचे काम येत्या डिसेंबर महिन्यापर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती खासदार शिवाजी काळगे यांनी दिली आहे.

लोकसभेचे खासदार डॉ. शिवाजीराव काळगे आणि विभागीय रेल्वे सल्लागार समिती सदस्य संजय निलेगावकर यांनी गुरुवारी लातूर रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या पिट लाईनसह विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विभागीय रेल्वे अभियंता अलुरे, स्टेशन मॅनेजर संजीवकुमार अर्धापूर, रेल्वे अधिकारी, कर्मचारी तसेच संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

पिट लाईनच्या कामाचा आढावा घेताना खासदार काळगे यांनी कामात कोणतीही दिरंगाई होऊ नये, अशा स्पष्ट सूचना अधिकार्यांना दिल्या. रेल्वे अधिकार्यांनी हे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल, असे सांगितले.

दरम्यान, प्लॅटफॉर्म क्रमांक २ ची लांबी आणि रुंदी वाढविण्याचे काम तसेच नव्याने उभारण्यात येणार्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ च्या प्रस्तावित कामाचीही पाहणी करण्यात आली. लातूर रेल्वे स्थानकाचा वाढता प्रवासी भार लक्षात घेता या कामांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. नवीन फूट ओव्हर ब्रिज आणि लिफ्टची सुविधाबैठकीदरम्यान रेल्वे अधिकार्यांनी स्थानकावर नवीन दादरा उभारण्यात येणार असल्याची माहिती दिली. या पुलासोबतच प्रवाशांच्या सोयीसाठी लिफ्टची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

सध्या लातूर रेल्वे स्थानकावर प्रवेशासाठी केवळ एकच गेट असल्याने मुंबई गाडी आल्यानंतर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. ही समस्या लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने दुसरे प्रवेशद्वार मंजूर केले आहे. मात्र त्यासंदर्भातील काही तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाशी समन्वय साधण्याच्या सूचना खासदार काळगे यांनी दिल्या.

मुरुड स्टेशनला क्रॉसिंग सुविधा देण्याची चर्चायावेळी मुरुड रेल्वे स्थानकाचा दर्जा वाढवून तेथे क्रॉसिंग सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. तसेच लातूर रेल्वे स्थानकावर महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महिला जीआरपी पोलिसांची आवश्यकता असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यासंदर्भात पोलीस अधीक्षकांशी चर्चा करण्यात येणार असल्याचे खासदारांनी सांगितले.

गुड्स शेडवर कव्हरचे कामही मंजूरलातूर रेल्वे स्थानकावरील गुड्स शेड प्लॅटफॉर्मवर कव्हर उभारण्याचे काम मंजूर झाले असून, ते लवकरच सुरू होणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

लातूर रेल्वे स्थानकाच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी संयुक्तपणे पुढाकार घेतल्याने आगामी काळात प्रवाशांना अधिक आधुनिक आणि सुसज्ज सुविधा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त विविध कार्यक्रम





तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा भाजपाचे नेते श्री. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त २९ मे २०२६ रोजी इंदोरीकर महाराज यांचे किर्तन होणार असून ३० मे जन्मदिनी अभिष्टचिंतन सोहळा व इतर सामाजिक उपक्रमाचे आयोजन भाजपा कार्यकर्त्यांसह मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांचा ३० मे जन्मिदिवस दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि विविध कामाच्या माध्यमातून साजरा केला जातो. याहीवर्षी मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांच्या आणि मित्र परिवाराच्या वतीने सर्वत्र विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनाच्या पूर्व संधेला २९ मे २०२६ शुक्रवार रोजी समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती देशमुख इंदोरीकर महाराज यांचे औसा तालुक्यातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे सायं. ७ वाजता किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

३० मे जन्मदिनी लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध गावातील ग्रामदेवतांना सकाळच्या वेळी महापूजा, अभिषेक करून आ. रमेशअप्पा कराड यांच्यासाठी दीर्घ आयुष्याकरिता कार्यकर्त्यांच्या वतीने प्रार्थना केली जाणार आहे. त्याच बरोबर विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मित्र परिवाराच्या वतीने देण्यात आली आहे.

## संघर्षपिटक या आत्मचरित्राचे रविवारी आ. संजय बनसोडे यांच्या हस्ते प्रकाशन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : ज्येष्ठ पँथर,सामाजिक कार्यकर्ते श्रीहरी नरहरी कांबळे यांच्या संयमी जीवन अनुभवानी समृध्द अशा संघर्षपिटक या आत्मकथनाचे प्रकाशन रविवार,दि.३१ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ.भालचंद्र रक्तपेढी सभागृह,लातूर येथे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते होणार आहे.

ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.सुरेश वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली होणार्या या प्रकाशन समारंभाला बाभळगावच्या कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुष्यंत कठारे,मसापचे जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.जयद्रथ जाधव, मुंबईच्या साठ्ये महाविद्यालयातील प्रा.डॉ.गौतम टेंकाळे, महाराष्ट्र-गोवा बार असोचे उपाध्यक्ष ॲड.बळवंत जाधव, माजी महिला व बाल कल्याण उपायुक्त ॲड.वैभव सूर्यवंशी हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तरी या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला सामाजिक,राजकीय,साहित्य क्षेत्रातील श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीचे प्रसेनजित कांबळे,सचिन हिंगे, संजय सुरवसे, प्रा.युवराज अंधोरीकर, प्रवीण सोमठाणेकर, प्रा.विनोद टेंकाळे, सुयोग सूर्यवंशी, जी.जी.कांबळे, मोहन कांबळे, दयानंद सिरसाटे, अमोल शिंदे, सिताराम कांबळे, अतुल काळे, संदीप साळवे, दयानंद कांबळे, राहलू काळे, किशोर वाघमारे, समाधान हिंगे, दत्तात्रय गायकवाड,साहील कांबळे, बाळू गादे, सिध्दांत मस्के, प्रतिक कांबळे, इंद्रप्रस्थ कांबळे, यशपाल कांबळे, तुषार आल्टे, सतिष सुरवसे, प्रदीप कांबळे इत्यादिंनी केले आहे.

## विद्यार्थी समुपदेशन शिक्षकांची जबाबदारी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : श्रीमती सुशीलादेवी देशमुख कॉलेज आणि 'अक्ष' सेंटरतर्फे आयोजित १३५ तासांच्या 'शिक्षक समुपदेशक प्रशिक्षण' शिबिराचा सांगता समारंभनुकताच पार पडला. याप्रसंगी माध्यमिक शिक्षण अधिकारी संजय क्षीरसागर म्हणाले, 'बदलत्या काळात विद्यार्थ्यांची मानसिकता ओळखून त्यांचे योग्य समुपदेशन करणे ही शिक्षकांची मोठी जबाबदारी आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य होते, तर विस्तार अधिकारी मधुकर ढमाले व डॉ. पांडुरंग शितोळे यांनी शिक्षकांच्या मानसिक स्वास्थ्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. प्रा.उर्मिला भांदरगे यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## पुरवठा मंत्र्यांसोबत स्वस्त धान्य दुकानदारांची बैठक



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दि.२६ मे रोजी मंगळवारी मुंबई येथे मंत्रालयात राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकारातून ही बैठक आयोजित करण्यात आली. यापूर्वी दि. २२ जून २०२५ रोजी संघटनेच्या वतीने औसा येथे आमदार अभिमन्यू पवार यांना निवेदन देण्यात आले होते. त्या वेळी संघटनेच्या प्रश्र्नांबाबत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठामंत्री तसेच प्रधान सचिव यांच्यासोबत बैठक आयोजित करण्याचे आश्र्वासन आमदार पवार यांनी दिले होते. त्यानुसार मंत्रालयात ही बैठक पार पडली. बैठकीत राज्यातील तसेच लातूर जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदारांच्या विविध अडचणी, नवीन रास्त भाव दुकानांची आवश्यकता, वाढत्या लोकसंख्येनुसार दुकान निर्मिती,

मार्जिन रक्कम निधी, धान्य वितरण प्रक्रिया आणि ई-केवायसी मोहिम याबाबत चर्चा करण्यात आली.

अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दुकानदारांच्या विविध प्रश्र्नावर लवकरच तोडगा काढण्याचे आश्र्वासन दिले. तसेच राज्यातील शहरांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन रास्त भाव दुकानांची गरज किती आहे, याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना देण्यात आले. बैठकीत सध्या सुरू असलेल्या ई-केवायसी प्रक्रियेमुळे रेशनकार्डधारकांची अचूक आकडेवारी समोर येत असून

कालबाह्य व रद्द रेशनकार्ड वगळून पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात आली. दुकानदारांच्या मागणीनुसार धान्य वितरणासाठी मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारला पत्र पाठविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत तसेच एप्रिल व मे महिन्याच्या धान्याची तातडीने उचल करून पात्र लाभार्थ्यांना धान्य वितरण सुरळीत करण्याचे निर्देशही देण्यात आले. पुढील दोन महिन्यांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतही बैठक आयोजित करण्यात येईल, असे आश्र्वासन यावेळी देण्यात आले.

या बैठकीस आमदार अभिमन्यू पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डी. एन. पाटील, जेनरल सेक्रेटरी कॉ. चंद्रकांत यादव, लातूर जिल्हाध्यक्ष सुधाकर पाटील, जिल्हा उपाध्यक्ष संतोष धुमाळ, जिल्हा सचिव इंद्रजित यादगिरे, उदगीर तालुकाध्यक्ष रंजीत पाटील, कासार शिरशी तालुकाध्यक्ष माधव कांबळे, निलंगा तालुका सहसचिव संतोष चव्हाण यांच्यासह संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

## आ. अमित देशमुख यांनी गवारे कुटुंबीयांचे केले सांत्वन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. उदय गवारे यांच्या मातोश्री श्रीमती सुलोचना गोविंदराव गवारे यांचे निधन झाले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी लातूर शहरातील ॲड. उदय गोविंदराव गवारे यांच्या निवासस्थानी जाऊन सुलोचना गोविंदराव गवारे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली आणि भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर त्यांचे पुत्र ॲड. उदय गवारे व गवारे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला.

यावेळी लातूर शहरचे माजी महापौर दीपक सूळ, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, आदिमाया उदय गवारे, ॲड. अभिलाषा उदय गवारे, डॉ. अनमोल उदय गवारे, मारुती बिरादार, डॉ. श्रीरंग बिरादार, गिरीश ब्याळे, अभिषेक पतंगे, युनूस मोमीन, व्यंक टेश पुरी, महादेव उबाळे, अभिजीत अंकलकोटे, किशोर जाधव, ॲड. सुनील गायकवाड आदींसह गवारे कुटुंबीय उपस्थित होते.

## दहावी बोर्ड परीक्षेचे गुणपत्रक कधी मिळणार?

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल गेल्या ८ मे २०२६ रोजी ऑनलाईन लागला. परंतु, अजून दहावी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक मिळालेले नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन गुणपत्रकावर अकरावी व इतर शैक्षणिक अभ्यासक्रमास अर्ज भरले. महाविद्यालयांची पसंती देखील कळवली. ओरिजनल गुणपत्रक न मिळाल्याने त्यांचे प्रवेश निश्र्चित होतील की नाही, अशी शंका आहे.

लातूरच्या विभागीय परीक्षा मंडळाने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना लवकरात लवकर गुणपत्रक देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गेल्या सोमवारी (दि. २५) मूळ गुणपत्रक उच्च माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालयांद्वारे देण्यात आली. त्यांचे प्रवेश आता निश्र्चित होत आहेत.

आता दहावी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रक द्यावीत. निकाल लागून जवळपास वीस दिवस झाले. लातूरचे विभागीय परीक्षा मंडळ लवकरच मूळ गुणपत्रक विद्यार्थ्यांचा विद्यालयाकडे पाठवले जातील, असे सांगत आहे; पण त्याची तारीख अजून स्पष्ट केलेली नाही. सध्या दहावी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी गुणपत्रकाची वाट पाहात आहेत. यावर्षी मे महिन्यातच प्रवेश प्रक्रिया पार पडत आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अडचण नसली तरी मूळ गुणपत्रक हातात असले म्हणजे सर्व सुरक्षित असते, असे उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

## लातूर जिल्हा बँकेकडून लोकनेते विलासराव देशमुख यांना अभिवादन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : राज्याचे माजी मुख्यमंत्री लोकनेते शेतकऱ्यांचे आधारवड विलासराव देशमुख यांच्या ८१ व्या जयंती निमित्ताने लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयात लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या आठवणीचा उजाळा देण्यात आला.

यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड. प्रमोद जाधव, संचालक पृथ्वीराज सिरसाठ, एन. आर. पाटील, राजकुमार पाटील, अशोक गोविंदपुरकर, मारोती पांडे, संचालिका सौ. स्वयप्रभा पाटील, संचालिका श्रीमती लक्ष्मीबाई भोसले, उदगीर बाजार समितीचे उपसभापती प्रीती भोसले, कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव, मीडिया समन्वयक हरीराम कुलकर्णी, जिल्हा सहकारी बोर्ड उपाध्यक्ष राजेन्द्र पटवारी, ज्योती पवार, अहमदपूर बाजार समितीचे उपसभापती संजय पवार, बाबुराव जाधव, शहाजी पाटील यांच्यासह मान्यवर, शेतकरी बँक अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### खरोळा येथे घरफोडीत २ लाख ३० हजारांची रोकड लंपास

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. २८ मे : तालुक्यातील खरोळा येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून कपाटात ठेवलेली तब्बल २ लाख ३० हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रेणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी कृष्णा गोविंद मदने (वय २९, व्यापारी, रा. खरोळा ता. रेणापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंद करण्यात आला. दि. २६ मे २०२६ रोजी रात्री ९.३० ते दि. २७ मे रोजी पहाटे ३.१० वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून कपाटातील रोख रक्कम २ लाख ३० हजार रुपये चोरून नेले. या प्रकरणी गुरनं २३२/२०२६ अन्वये कलम ३३१ (४), ३०५(१) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची नोंद दि. २७ मे रोजी दुपारी ३.१५ वाजता करण्यात आली.

या घटनेचा अधिक तपास बीट जमादार आडे हे करीत आहेत. परिसरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होत आहे

### अहमदपूर पोटनिवडणूक मविआ लढविणार : काडवादे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ मे : येथील प्रभाग क्रमांक २ मधून निवडून आलेल्या महिलेचे निधन झाले असून ही जागा रिक्त झाली आहे. गेल्या सहा महिन्यांपूर्वी झालेल्या या प्रभागातील निवडणुकीसाठी पक्षाने तुतारी या चिन्हावर निवडणूक लढवली होती मात्र आता होऊ घातलेली पोटनिवडणूक ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून व्हावी या अनुषंगाने महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची बैठक नुकतीच झाली. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा उमेदवार उभा राहणार असल्याचे जिल्हा सरचिटणीस (श.प.) पक्षाचे केदार काडवादे यांनी सांगितले.

या बैठकीत राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सांब महाजन, राष्ट्रवादी श.प. चे प्रदेश सरचिटणीस सोमेश्वर कदम, शिवसेनेचे (उबाठा) जिल्हाध्यक्ष बालाजी रेड्डी, काँग्रेसचे माजी उपनगराध्यक्ष कलीमोद्दीन अहमद, राष्ट्रवादी श.प. चे जिल्हा सरचिटणीस केदार काडवादे, काँग्रेसचे सिराज जागिरदार, काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास महाजन व महाविकास आघाडी पक्षाचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी सर्वांचे एकमत होऊन आघाडीचा उमेदवार देण्याचे ठरले आहे. सद्या तिन्ही पक्षाकडे आपापल्या पक्षाचे उमेदवार निवडणूक लढण्यासाठी तयार असून कोणास उमेदवारी देण्यात येईल हे चित्र काही दिवसात स्पष्ट होणार आहे पण ही निवडणूक बिनविरोध होणार नसल्याचे सांगण्यात येत आहे.

### महाराष्ट्र उदयगिरीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

उदगीर दि, २८ मे : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव प्रशांत पेन्सलवार यांनी सावरकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, दिनविशेष समितीचे प्रमुख डॉ. एम. एस. खांडेकर तसेच शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सारथी संकुलाच्या विस्तारासाठी अतिरिक्त जागेची मागणी

## आ. अभिमन्यू पवार यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

तभा वृत्तसेवा

औसा दि. २८ मे : मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात येत असलेल्या लातूर येथील सारथी संकुलाच्या भविष्यातील विस्तारासाठी अतिरिक्त १.६० हेक्टर जागा उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मंत्रालयात मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

लातूर तालुक्यातील वरवंटी येथील सर्वे नं. १११ मधील प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची)यांच्या मालकीच्या ६.०७ हेक्टर क्षेत्रापैकी १.६० हेक्टर जमीन सारथी संस्थेस यापूर्वीच देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी शासनाने तब्बल १७२.८६ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली असून विभागीय सारथी संकुलाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले आहे. सध्या या ठिकाणी १३ मजली दोन भव्य इमारती उभारण्यात येत असून लातूरमधील सारथी संकुल मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक, संशोधन आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून विकसित होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

आमदार अभिमन्यू पवार यांनी निवेदनात नमूद केले आहे की, सारथी



संकुलालगत मागील बाजूस आणखी १.६० हेक्टर जागा उपलब्ध आहे. या जागेस स्वतंत्र रस्ता उपलब्ध नसल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून सध्या त्या जागेचा कोणताही उपयोग होत नाही. तसेच भविष्यात संस्थेच्या कोणत्याही बांधकामासाठी विद्यमान परिसरातील सुमारे २.८७ हेक्टर जागा पुरेशी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.या अतिरिक्त जागेचा उपयोग भविष्यातील वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन वाहनतळ, खुली अभ्यासिका, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, प्रशिक्षण व कौशल्य विकास उपक्रम, वाचनालय, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खुली जागा, क्रीडा व मैदानी सुविधा तसेच भविष्यातील इमारत विस्तारासाठी करण्यात येऊ शकतो.असे आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

मागील महिन्यात आमदार अभिमन्यू पवार यांनी मराठा समाजातील प्रतिनिधींसह निर्माणाधीन सारथी प्रकल्पाची पाहणी केली होती. यावेळी प्रकल्पालगतची जागा सारथी संस्थेला वर्ग केल्यास भविष्यातील विस्तारासाठी मोठी मदत होईल, अशी मागणी समाज प्रतिनिधींनी केली होती. त्यानंतर या मागणीचा पाठपुरावा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अधिकृत निवेदन सादर करण्यात आले.मराठा समाजातील ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा, आधुनिक शैक्षणिक वातावरण आणि स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध व्हावे, हा या मागणीमागील मुख्य उद्देश आहे, असे आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

# ग्रामीण पाणी पुरवठ्यासाठी सोलार योजना राबवावी

## आ. अभिमन्यू पवारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

तभा वृत्तसेवा

औसा दि, २८ मे : राज्यातील ग्रामीण भागातील शासकीय पाणी पुरवठा योजनांसाठी शेती पंपाच्या धर्तीवर स्वतंत्र सौर पंप योजना सुरू करण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मंत्रालयात मुख्यमंत्री यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करत अधिकृत निवेदनही सादर केले.

राज्यात राष्ट्रीय पेयजल योजना, जलजीवन मिशन योजना तसेच इतर योजनांद्वारे बहुतांश गावांमध्ये कायमस्वरूपी शासकीय पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. अनेक गावांमध्ये सार्वजनिक विंधन विहिरी आणि पाणीपुरवठा नादुरुस्त होणे, जळणे किंवा कमी दाबाने वीजपुरवठा होणे अशा समस्या उद्भवत आहेत. परिणामी पाणीपुरवठा योजनांचे विद्युत पंप सुरळीत चालत नसल्याने अनेक गावांमध्ये पाणी असूनही नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

याशिवाय पाणी पुरवठा योजनांची वीज देयके थकीत राहिल्यामुळे महावितरणकडून अनेकदा वीजपुरवठा खंडित केला जातो.



**मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद**

शेतकऱ्यांसाठी महावितरण मार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मागेल त्याला सौर पंप' योजनेच्या धर्तीवर गावांच्या शासकीय पाणीपुरवठा योजनांसाठीही स्वतंत्र सौर पंप योजना राबविण्याची मागणी केली आहे.या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागास आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्याची माहिती आ. पवार यांनी दिली.

**गावकऱ्यांना शवाश्वत पाणी मिळणार**

ग्रामीण भागातील नागरिकांना, विशेषतः महिलांना, पिण्याच्या पाण्यासाठी होणारा त्रास कमी करून गावांना शाश्वत आणि अखंडित पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे हा या मागणीमागील मुख्य उद्देश आहे. या मागणीमुळे राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा व्यवस्थेला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून सौर उर्जेच्या माध्यमातून शाश्वत आणि सक्षम पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

विहिरींच्या माध्यमातून ग्रामस्थांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र या योजनांसाठी लागणाऱ्या विद्युत पुरवठ्यासंदर्भात अनेक गंभीर अडचणी निर्माण होत असल्याचे आ. पवार यांनी मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिले.सध्या बहुतांश गावांमध्ये पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र रोहित्र उपलब्ध नसल्याने शेतीपंपाच्या रोहित्रावरच पाणीपुरवठा योजनांचा भार टाकला जातो. त्यामुळे रोहित्रावर अतिरिक्त ताण येऊन वारंवार त्यामुळे गावातील नागरिकांना व विशेषतः महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी विहिरींवर किंवा दूरच्या स्त्रोतांवर अवलंबून राहावे लागते. ग्रामीण भागातील अशी गंभीर समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी पाणी पुरवठा योजनांसाठी स्वतंत्र सौर पंप योजना सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे आ. पवार यांनी स्पष्ट केले.

या योजनेअंतर्गत सौर उर्जेवर आधारित स्वतंत्र पंप प्रणाली कार्यान्वित केल्यास दिवसभर अखंडित वीज उपलब्ध राहून पाणीपुरवठा योजना सुरळीत सुरू ठेवता येतील. तसेच विजेवरील ताण कमी होऊन वीज बिलाचा आर्थिक भारही कमी होण्यास मदत होईल. ग्रामीण भागातील नागरिकांना नियमित आणि शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध करण्यासाठी सोलार पंप योजना अत्यंत उपयुक्त ठरेल असे मत मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेदरम्यान आ. पवार यांनी व्यक्त केले.

### स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती, ना.बाबासाहेब पाटील यांचे हस्ते ध्वजारोहण



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २८ मे : भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे शिल्पकार , कट्टर हिंदुत्व विचार श्रेणीचे विनायक दामोदर सावरकर यांची जयंती आज अहमदपूर मध्ये उत्साहात साजरी करण्यात आली.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी २७ वर्षे शिक्षा भोगलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आज अहमदपूर येथील सावरकर स्मारकात भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण राज्याचे सहकार मंत्री ना श्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी स्वातंत्र्यवीरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले.

याप्रसंगी बोलताना नामदार बाबासाहेबजी पाटील म्हणाले आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सावरकर यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे विचार कायम प्रेरणादायी असून आजच्या तरुणांनी त्यांच्या विचार आत्मसात करून देशाप्रती कर्तव्य बजावले पाहिजे अहमदपूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे उद्घाटन मंत्री महोदयांचे हस्ते करण्यात आले.

पुढे बोलताना ते म्हणाले महापुरुषाचे जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन या समितीच्या वतीने करण्यात आले आहे ते अत्यंत कौतुकास्पद आहे रक्तदान ही काळाची गरज असून आपल्या रक्तदानामुळे एखाद्या व्यक्ती चा जीव वाचू शकतो हे अत्यंत महत्त्वाचा आहे. अहमदपूर शहरातील विविध सामाजिक संघटनांनी रक्तदान शिबिरासाठी कायम पुढाकार घेतला पाहिजे .

स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाच्या सुशोभीकरण्यासाठी २० लाखाचा निधी सहकार मंत्री यांनी घोषित केला असून सध्या अर्धाकृती असलेला पुतळा भविष्यात पूर्णकृती करण्यासाठी पुढाकार घेऊ अशी ग्वाही त्यांनी दिली

### NEET पेपर फुटी प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

### दोषींवर कठोर कारवाईची मागणी




तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २८ मे : राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा (छएएढ) पेपर फुटी प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, देवणी तालुक्याच्या वतीने मा. तहसीलदार देवणी यांना निवेदन देण्यात आले.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने तालुक्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सेलच्या अध्यक्षांना सकाळी १० वाजता तहसील कार्यालय, देवणी येथे उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या गंभीर प्रकरणाचा निषेध व्यक्त केला.

यावेळी तालुकाध्यक्ष महेश जाधव, नगरसेवक अनिल इंगोले सर, नगरसेवक अमित सूर्यवंशी, माधव रोट्टे, उबेद उंठवाले, सोहेल शेख, धोंडीराम सोळुंखे, नीलकंठ बिरादार, सोनू बोरे आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत खेळ करणाऱ्यांवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली.

# उप जिल्हा रुग्णालयात चोवीस तास एक्सरे, सोनोग्राफी व सुसज्ज रुग्णवाहिका कार्यान्वित करा

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २८ मे : उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथे शेकडो रुग्ण दररोज इलाज घेतात परंतु येथे रुग्णांना सोनोग्राफी सेवा दररोज दिली जात नाही. एक्स रे ही रात्रीच्या वेळेस काढला जात नाही तर तो फक्त दिवसा काढला जातो. चोवीस तास अत्यावश्यक सेवा पुरवण्याची हमी देणाऱ्या उपजिल्हा शासकीय रुग्णालयासाठी हास्यास्पद घटना आहे. या जनभावनेची नोंद घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांचा नेतृत्वाखाली निलंगा येथील वैद्यकीय अधिक्षकांची भेट घेत यावर चर्चा करून समस्या निवारणासाठी उपाय सुचवले गेले आणि शेवटी विविध मागण्यांचे लेखी निवेदनही देण्यात आले .तसेच गंभीर रुग्ण पुढे लातूरला जाण्यासाठी जेव्हा रुग्णालयाकडून रेफर केला जातो तेव्हा विशिष्ट नंबर वर फोन लावूनही रुग्णवाहिका तासंतास उपलब्ध



होत नसल्याचे पुरावासह निर्दशनास आणून देण्यात आले व रुग्णालयाकडेही सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने रुग्ण दगावण्याची शक्यता निर्माण होत असल्याने या गंभीर समस्येवर उपाय करणे गरजेचे असल्याने या संबंधित १०८ रुग्णवाहिकेच्या यंत्रणांनाही डॉ भिकाने यांनी फोनवर समज दिली. तसेच उपजिल्हारुग्णालयात ही कायमस्वरूपी आणखीन एक सुसज्ज रुग्णवाहिका सतत उपलब्ध ठेवावी असे वैद्यकीय अधिक्षकांना सांगत निवेदनात ही मागणी केली.

चौकटयेणाऱ्या काळात जर निलंगा उपजिल्हारुग्णालय येथे १०८ नंबरवर फोन करूनही जर रुग्णवाहिका वेळेवर आली नाही वा रुग्णालय प्रशासनानेही रुग्णवाहिका पुरवली नाही आणि यात रुग्ण दगावला तर रुग्णाच्या मृत्युला आम्ही रुग्णालयास जिम्मेदार धरु व तीव्र आंदोलन करू असा इशारा मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी दिला आहे

आजघडीला निलंगा तालुक्यातील नागरिकांना रात्रीचा एक्स-रे व चोवीस तास सोनोग्राफी सुविधेसाठी खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत असून त्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. विशेषतः गोरगरीब व ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याने याचे निराकरण येणाऱ्या काही दिवसात करावे अन्यथा आम्हाला लक्षवेधी आंदोलन करावे लागेल असा इशाराही निवेदनात दिला आहे.

यावेळी निलंगा तालुका अध्यक्ष सचिन बिराजदार,निलंगा शहर अध्यक्ष अबू बकर सय्यद, मनसे शेतकरी सेना तालुका अध्यक्ष सदाशिव हाडोळे,तालुका उपाध्यक्ष विकास सूर्यवंशी, संतोष जाधव, बालाजी पवार,तालुका सचिव गणेश उसनाळे, प्रमोद हाडोळेसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा मोठा निर्णय

# संलग्नित २९ महाविद्यालयांमधील पदव्युत्तर प्रवेशांना स्थगिती!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ मे -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कडक पाऊल उचलले आहे. विद्यापीठांतर्गत येणाऱ्या ज्या पदव्युत्तर पारंपारिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण ऑनलाईन (Academic Administrative Audit - ' AAA Online') तपासणीमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण म्हणजेच 'F' ग्रेड मिळालेली आहे, अशा तब्बल २९ महाविद्यालयांमधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचे (स्थगित करण्याचे) आदेश विद्यापीठाने जारी केले असल्याचे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने २७ मे, २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट इशारा दिला आहे की, त्रुटी आढळलेल्या व प्रतिबंधित केलेल्या यादीतील महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पारंपारिक पदव्युत्तर अभ्यासक्रमास (झ्रऋ झ्रौसीराश) कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देऊ नये. जर एखाद्या महाविद्यालयाने या आदेशाचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांना प्रवेश दिला, तर विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या सर्व शैक्षणिक नुकसानीस (उदा. पात्रता रद्द होणे, परीक्षा अर्ज न स्वीकारणे, हॉलतिकीट न मिळणे किंवा निकाल राखीव राहणे) सर्वस्वी ते महाविद्यालय प्रशासन जबाबदार असेल.

हा निर्णय केवळ पारंपारिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनाच लागू राहील. फार्मसी, विधी (Law), शिक्षणशास्त्र (B.Ed./M.Ed.), आणि शारीरिक शिक्षणशास्त्र यांसारख्या व्यावसायिक (झ्रोषर्शीाीळेपरश्र) महाविद्यालयांना या निर्णय व कारवाईतून वगळण्यात आले आहे.

विद्यापीठाने जाहीर केलेल्या 'AAA Score' च्या एकूण ७२ महाविद्यालयांच्या यादीमध्ये केवळ पाच महाविद्यालयांना 'O' ग्रेड आणि आकरा महाविद्यालयांना 'A' ग्रेड मिळवता आला आहे. तर 'B' ग्रेड १३ महाविद्यालये, 'C' ग्रेड ४ महाविद्यालये, 'D' ग्रेड ५ महाविद्यालये, 'E' ग्रेड ५ महाविद्यालये आणि सर्वात जास्त म्हणजेच



एकोणतीस महाविद्यालये 'ऋ' ग्रेड श्रेणीत फेकली गेल्याने त्यांच्यावर ही नामुष्की ओढावली आहे.

विद्यापीठाने प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचे (स्थगित करण्याचे) आदेशामध्ये नांदेड जिल्ह्यातील सर्वाधिक आठरा महाविद्यालये, लातूर जिल्ह्यातील सात आणि परभणी जिल्ह्यातील चार महाविद्यालयांचा समावेश आहे. यामध्ये 'F' ग्रेड प्राप्त अनेक नामांकित महाविद्यालयांचा समावेश आहे.

विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या परिषद व अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन यांच्या अध्यक्षतेखाली हा कडक निर्णय घेतला आला. अधिकृत यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ॲफिलेशन (Affiliation) या शीर्षकाखाली उपलब्ध करण्यात आली असल्याचे शैक्षणिक (संलग्नीकरण) विभागाचे उपकुलसचिव यांनी कळविले आहे.

**'F' ग्रेड श्रेणीत महाविद्यालयांची यादी:**

वसंतराव नाईक महाविद्यालय (वसरणी, नांदेड), श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय (लोहा), पानसरे महाविद्यालय (अर्जापूर), शरदचंद्र आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (नायगाव), जवाहरलाल नेहरू कॉलेज ऑफ सोशल वर्क अँड रिसर्च सेंटर (सिडको, नांदेड), वै. धुंडा महाराज देगलूरकर कॉलेज (देगलूर), कै. भीमराव चव्हाण आर्ट्स अँड सायन्स कॉलेज (चव्हाणवाडी, बऱ्हाळी), श्री रेणुकादेवी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय (माहूर), राजीव गांधी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड मॅनेजमेंट (नांदेड), राजीव गांधी महाविद्यालय (मुखेड), एमजीएम कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड मीडिया सायन्स (नांदेड), छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालय (किनवट), विश्वभारती महाविद्यालय (सिडको, नांदेड), विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (नांदेड), छत्रपती संभाजी महाराज महाविद्यालय (माहूर), सिंधू कॉलेज ऑफ आयटी अँड सायन्स (देगलूर), इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी (विष्णुपुरी, नांदेड), श्री गुरु गोविंदसिंग कॉलेज (बी.जे.) (नांदेड).

संत संभाजी शिंदे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड इन्फो. सायन्स (परभणी), डीएसएम इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (परभणी), यशवंत कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (परभणी), रविंद्रनाथ टागोर चित्रकला महाविद्यालय (परभणी). स्वामी विवेकानंद महाविद्यालय (शिरूर ताजबंद), श्री कुमारस्वामी महाविद्यालय (औसा), कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय (हाडोळी), सरस्वती संगीत कला महाविद्यालय (लातूर), श्यामगिरी महाविद्यालय, (दापका), मातृभूमी महाविद्यालय (उदगीर), ब्रिलियंट महाविद्यालय (रात्रीचे) (लातूर).

## आ. चिखलीकरांनी घेतली खा.श्रीकांत शिंदे यांची भेट



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ मे -**

शिवसेनेचे खासदार डॉ.श्रीकांत एकनाथराव शिंदे हे नांदेड दौऱ्यावर आले असता त्यांची माजी खासदार तथा विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नांदेड विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने शिष्टमंडळासह भेट घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार अविनाशराव घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रविण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर कार्याध्यक्ष माधव पावडे आदींच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली.

यावेळी माजी खासदार आनंद परांजपे, विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील, नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर, नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव बोंढारकर, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे आदींची उपस्थिती होती.

## शासकीय पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेवर मराठवाड्यातून संदीप उदगीरकर

**नांदेड** -रांजणोली ता.भिवंडी जि.ठाणे येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य शासकीय पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या राज्यस्तरीय महाअधिवेशनात नांदेडचे जिल्हाध्यक्ष संदीप उदगीरकर यांची



मराठवाड्यातून राज्य कार्यकारिणीवर संचालक म्हणून निवड झाली आहे. रांजणोली ता.भिवंडी जि.ठाणे येथे महाराष्ट्र राज्य शासकीय पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच पार पडले. या अधिवेशनात राज्य कार्यकारिणी निवडण्यात आली असून, त्यात अध्यक्ष पदाची माळ नाशिकच्या बाळासाहेब जाधव यांच्या गळ्यात पडली असून, त्यांची एकमताने निवड झाली. तर संचालक म्हणून नांदेडचे जिल्हाध्यक्ष संदीप उदगीरकर यांची मराठवाड्यातून निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. या बैठकीत झालेल्या ठरावाची माहिती देताना संदीप उदगीरकर यांनी सामनाशी बोलताना सांगितले जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित देयके तातडीने अदा करण्यात यावी, तसे न झाल्यास कामबंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्यासोबत केंद्र व राज्य सरकारकडून मिळणारा निधी केंद्राच्या स्पर्श प्रणालीस सुरु होण्यास विलंब होत असल्यामुळे प्रलंबित देयकांचा निधी जुन्या प्रणालीव्दारे देण्यात यावा, निधीअभावी कंत्राटदाराची बँकांची देणी संपल्यामुळे शासन स्तरावरुन बँकांना मागणीचा तगादा न लावण्याच्या सूचना त्यांनी द्याव्यात, त्याचप्रमाणे निधी नसल्यामुळे जीएसटी परतावा भरण्यास उशिर होत असल्यामुळे कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई न करण्याबाबत शासनस्तरावरुन जीएसटी विभागास सूचना देण्यात याव्यात, आदी ठराव या बैठकीत मंजूर करण्यात आल्याचे उदगीरकर यांनी सांगितले. यापुढेही शासकीय पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या कुठल्याही सदस्यावर अन्याय झाल्यास त्याला संघटीतपणे न्याय देण्याचा आपण प्रयत्न करणार असल्याचे संदीप उदगीरकर यांनी सांगितले.

## उपोषणाचा इशारा देत रुई येथील उपसरपंचांचा भ्रष्टाचार विरोधात एल्गार

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २८ मे -**

तालुक्यातील मौजे रुई (खु.) येथील ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौ. स्वाती विक्रम चक्कावार यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पंचायत समिती नायगाव (खै.) येथील गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर तक्रारीमध्ये नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत रुई (खु.) अंतर्गत जानेवारी २०२३ मध्ये १५ व्या वित्त आयोगांतर्गत अंदाजे ३ लाख ७५ हजार रुपयांचा निधी जमा झाला होता. त्यानंतर सन २०२३-२४ ते २०२४-२५ या कालावधीत सुमारे ८ ते १० लाख रुपयांचा अतिरिक्त निधी ग्रामपंचायतीला प्राप्त झाला. मात्र, या निधीतून आराखड्यानुसार कोणतीही विकासकामे प्रत्यक्षात करण्यात आली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तात्कालीन ग्रामसेविका एस. के. शिंदे तसेच सध्या कार्यरत असलेल्या सरपंचांनी केवळ कागदोपत्री कामे दाखवून निधीचा अपहार केल्याचा गंभीर आरोप तक्रार अर्जात करण्यात आला आहे. संबंधित कामांची माहिती व खर्चाचा तपशील विचारला असता उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची पंचायत समितीमार्फत सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेविकेचे निलंबन करण्यात यावे तसेच सरपंचांवर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी उपसरपंच सौ. चक्कावार यांनी केली आहे.

दरम्यान, जर या प्रकरणात योग्य ती दखल घेऊन चौकशी करण्यात आली नाही, तर दिनांक १ जुलै २०२६ पासून पंचायत समिती कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

या तक्रारीची प्रत जिल्हाधिकारी नांदेड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनाही पाठविण्यात आली आहे.

## लोकशाहीच्या सुरक्षेसाठी मतदार मॅपिंग आवश्यक; भिलवंडे यांची जनतेला साद

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २८ मे -**

लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी प्रत्येक मतदाराची नोंद अचूक व अद्ययावत असणे अत्यंत आवश्यक असून, नायगाव विधानसभा मतदारसंघातील सर्व पात्र नागरिकांनी ३० मे २०२६ पूर्वी आपले मतदार मॅपिंग तातडीने पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या मतदार मॅपिंग मोहिमेला आता अंतिम टप्पा गाठला असून, मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करून अधिक पारदर्शक आणि सक्षम व्यवस्था निर्माण करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण मानली जात आहे. भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणत्याही पात्र मतदाराला अडचणींचा सामना करावा लागू नये, तसेच एकही नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, हा या मोहिमेमागील मुख्य उद्देश असल्याचे भिलवंडे यांनी स्पष्ट केले.

सध्या नायगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये मतदार मॅपिंगचे काम अद्याप अपूर्ण असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी



प्रक्रियेबाबत जागरूकतेचा अभाव, मोबाईल क्रमांक लिंक नसणे, ओटीपी पडताळणीतील अडथळे, तांत्रिक अडचणी तसेच आवश्यक कागदपत्रांविषयी अपुरी माहिती यामुळे नागरिकांची प्रक्रिया रखडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिकांनी वेळ न दवडता स्वतःच्या मोबाईलद्वारे किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने त्वरित मॅपिंग पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदार मॅपिंग प्रक्रियेदरम्यान मोबाईल क्रमांक लिंक करणे, ओटीपी पडताळणी, कुटुंबातील सदस्यांची माहिती अद्ययावत करणे, पत्ता व वैयक्तिक तपशील तपासणे या बाबींची पूर्तता करावी लागत आहे. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना या प्रक्रियेची सविस्तर माहिती नसल्यामुळे बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांनी गावोगावी जाऊन नागरिकांना मार्गदर्शन करावे व आवश्यक सहकार्य द्यावे, अशी अपेक्षाही भिलवंडे यांनी व्यक्त केली.

नागरिकांनी कोणत्याही अफवा किंवा चुकीच्या माहितीकडे दुर्लक्ष करून केवळ अधिकृत प्रक्रियेवर विश्वास ठेवावा, असे सांगत त्यांनी मतदार नोंदी अचूक राहण्यासाठी प्रत्येकाने जागरूक राहणे गरजेचे असल्याचे नमूद केले. ३० मे २०२६ ही अंतिम मुदत असल्याने शेवटच्या क्षणाची वाट न पाहता सर्वांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करावी, असे त्यांनी आवाहन केले.

लोकशाहीत प्रत्येक मतदार हा राष्ट्रनिर्मितीचा महत्त्वाचा घटक आहे. मतदानाचा अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येकाने स्वतःसह आपल्या कुटुंबातील सदस्यांचे मतदार मॅपिंग वेळेत पूर्ण करणे ही काळाची गरज आहे, असेही श्रावण पाटील भिलवंडे यांनी सांगितले.

## आमदुरा येथे ब्रह्मचेतन्य बहुउद्देशीय बाल संस्कार शिबिर व कीर्तन महोत्सव

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील आमदुरा येथे ब्रह्मचेतन्य बहुउद्देशीय बाल संस्कार शिबिर व कीर्तन महोत्सव भव्य धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कैलास आण्णा गोडसे (अध्यक्ष,



श्री नरसिंह स्वामी प्रतिष्ठान तथा श्री साईबाबा शेतकरी गट मुदखेड) यांनी उपस्थित राहून युवा कीर्तनकार श्री ह.भ.प. गणेश महाराज पवार आमदुरेकर व त्यांच्या सहकाऱ्यांचा शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात आला. तसेच कैलास आण्णा गोडसे व उपस्थित सहकारी नगरसेवक व कार्यकर्ते यांचा सत्कार संभाजी पाटील पवार व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने करण्यात आला. या संस्कारमय उपक्रमामुळे युवकांमध्ये अध्यात्म, संस्कृती व समाजप्रबोधनाची प्रेरणा निर्माण होत असून सर्व आयोजकांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी तालुका युवक अध्यक्ष मुदखेड प्रशांत पाटील मुंगल, नगरसेवक अविनाश चौदंते,नगरसेवक प्रतिनिधी संजय बोकेफोड, युवक कार्यकर्ते महेश पवार, यासह आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

## इस्लापूर परिसरात खरीपपूर्व मशागतीला वेग; सोयाबीन बियाणे, खत दरवाढीमुळे शेतकरी चिंतेत

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २८ मे -**

पावसाळ्याची चाहूल लागताच इस्लापूर परिसरातील शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या तयारीला जोरदार सुरुवात केली आहे. पहाटेपासूनच शेतात ट्रॅक्टरचा आवाज घुमू लागला असून कुठे नांगरणी, कुठे वखरणी तर कुठे मशागतीची कामे वेगाने सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. भरघोस उत्पादनाच्या आशेने शेतकरी काळ्या आईची सेवा करत असला तरी दुसरीकडे वाढत्या खर्चामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला आहे.

यंदाच्या हंगामात सोयाबीन बियाण्यांच्या दरात मोठी वाढ झाली असून खतांच्या किमतीदेखील गगनाला भिडल्या आहेत. डीएपी, युरिया, यांसारख्या खतांच्या वाढलेल्या दरामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले



आहे. त्यातच कीटकनाशके, औषधे, डिझेल, ट्रॅक्टर भाडे व मजुरीचे दर वाढल्याने शेती करणे दिवसेंदिवस कठीण बनत चालले आहे.

अनेक शेतकरी कर्ज काढून किंवा उसनवारी करून शेतीची तयारी करत आहेत. पाऊस चांगला झाला तरच खर्च निघेल, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. मागील काही वर्षांपासून सततचे बदलते हवामान, अवकाळी पाऊस आणि शेतीमालाला मिळणारा कमी बाजारभाव यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच वाढत्या खर्चाने शेतकऱ्यांची झोप उडाली आहे. इस्लापूर परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा शेती खर्च दुपटीने वाढल्याचे सांगितले. बियाणे, खत आणि औषधांवर हजारो रुपये खर्च होत आहेत. शेतीतून उत्पन्न मिळेल की नाही याची खात्री नाही, तरीही शेती सोडून पर्याय नाही, अशी व्यथा अनेक शेतकरी मांडताना दिसून येत आहेत.

दरम्यान, बाजारात काही ठिकाणी खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण होत असल्याची चर्चा असून शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध व्हावे, दर नियंत्रणात ठेवावेत आणि शासनाने अनुदान वाढवून शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. खरीप हंगाम हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी गांभीर्याने घेऊन त्वरित उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

## भोकर तालूक्यातील रस्त्याची शेकडो प्रकरणे प्रलंबित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ मे -**

पांदण रस्त्यावरील झालेले अतिक्रमण शेतीकडे जाण्यासाठी अडविण्यात आलेले रस्ते मोकळे करुन देण्यासाठी मोठ्या संख्येने शेतकरी तहसीलदार यांचेकडे निवेदने अर्ज करुन बराचसा कालावधी लोटला असून पावसाळा तोंडावर आला तरीही रस्त्याचा प्रश्न जसाच्या तसाच असून तालूक्यातील असंख्य प्रकरणे धूळखात पडल्याचे चित्र दिसत आहे.

पावसाळ्यापूर्वी रस्त्यावरील झालेले अतिक्रमण हटविल्यास शेतकर्‍यांना शेतीला जाणे सोयीचे होईल काही ठिकाणी अंतर्गत वादातून शेतीचा रस्ता अडविण्यात आल्याचीही प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती असून तहसील प्रशासनाने शेतकर्‍यांच्या जिव्हाळ्याचा असलेला हा रस्त्याचा प्रश्न सोडविण्यासाठी हवी ती यंत्रणा राबवून पावसाळ्यापूर्वी रस्ते मोकळे करुन शेतकर्‍यांना दिलासा देण्यात यावा अशी मागणी होत आहे. माळरानात असलेल्या शेतामध्ये पेरणीकरिता बि-बियाणे खते नेताना शेतकर्‍यांना मोठी कसरत करावी लागते पांदण रस्त्यावर झालेले अतिक्रमण काहि ठिकाणी अंतर्गत वादातून रस्त्याने जाण्यासाठी होत असलेला विरोध अशी असंख्य प्रकरणे प्रलंबित आहेत संबधित विभागाने या प्रकरणाचा निपटारा पावसाळ्यापूर्वी केला तर शेतकर्‍यासाठी सोयीचे होईल अन्यथा रस्त्याचा विषय जैसे थे राहिल तहसीलदार यांनी प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढून शेतकर्‍यांना न्यास मिळवून द्यावा अशी मागणी तालूक्यातील शेतकरी करित आहेत.

## आदमपूर येथे बकरी ईद उत्साहात साजरी

**आदमपूर** - मौजे आदमपूर,(ता.बिलोली) येथे 'ईद उल अज्हा' अर्थात 'बकरी ईद' दि.२८ मे रोजी सकाळी १० वाजता मोठ्या हर्षोल्लासात माळावरील ईदगाह मैदानावर नमाज आणि गळाभेट घेत उत्साहात सामुहिक साजरी करण्यात आली. यंदा समाधानकारक पाऊस बरसावा,जातीय,धार्मिक शांतता नांदावी,समाजत एकोपा वाढावा, शेतकऱ्यांवरील संकट निवारण व्हावे, तळागाळातील कष्टकरी लोकांच्या उन्नतीसाठी ही भूमी पावसाने सुजलाम सुफलाम होण्यासाठी, प्रत्येक मानवाच्या दुःख मुक्तिसाठी ही सामुहिक दुवाँ पठण करण्यात आली. त्यानंतर हिंदू-मुस्लिम समाजातील मित्र परिवारासह शिरखुर्म्याच्या आस्वादाचे आयोजन प्रत्येक मुस्लिम बांधव करीत होते. सदरील ईदगाह मैदानावर जामा-मस्जिद अध्यक्ष अहेमदसाब पठाण,उपाध्यक्ष आमिरसाब शेख, सामाजिक,राजकीय कार्यकर्ते,महेबुब शेख, शेख सलीम मुसा, माजी बँकर फक्रूशा मदार, बँक सहाय्यक महमदरफी मदार, दै.तरूण भारत पत्रकार जाफर आदमपूरकर,पप्पू शेख(चेअरमन), शेख फरीदसाब, मस्जिद हाफिज सय्यद आदम मुतन्याळकर,कालेजी पिंजारी,खलील शेख,गौस शेख,हैदरसाब शेख,घुडूसाब शेख,अब्बास शेख,कालेजी पिंजारी,सलीम पिंजारी, आरिफ शेख,नवाज शेख,महमदरफी शेख,मोहम्मद शेख,अलीम पिंजारी,खदीर शेख,खयुम शेख,नयुम शेख,जमाल शेख,सद्दाम शेख,इस्माईल शेख,जलील शेख,फरीदसाब शेख,उस्मान पिंजारी,वलीसाब शेख, हुजूर पिंजारी,ऐनुल्ला शेख,सलीम शेख,अरबाज शेख,समीर शेख,रशीद शेख,कासिम बोरामनी,राजेसाब पिंजारी,शमशोद्दीन पिंजारी,शब्बीर मदार,अनवर शेख, आसिफ शेख,सैलानी शेख,फेरोज शेख,बाबू शेख, हाफिज शेख,बबलू शेख,साबेर,सह ईदगाह स्थळी आदमपूर बीट जमादार लक्ष्मण सूर्यवंशी,पोलीस पाटील योगेश पेंटे,सिद्धार्थ कांबळे व मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते.

## प्रत्येक बूथ, शिवसेना मजबूत ! या निर्धाराने काम करा : खा. डॉ. श्रीकांत शिंदे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ मे -**

निवडणूक आयोगाच्या मतदार यादी पुनरीक्षण मोहीमेसाठी शिवसेना पक्षाने राज्यात जवळपास सव्वा लाखांहून अधिक बूथ लेव्हल एजंट (बीएलए) नियुक्त केले आहेत. बीएलए नियुक्ती केवळ मतदार यादी पुनरीक्षण मोहीमेपुरता नसून तो १२ महिने सक्रिय राहील. तो मतदार यादीवर काम करेल. 'प्रत्येक बूथवर शिवसेना मजबूत' या निर्धाराने कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी 'बीएलए'ला सहकार्य करावे, असे आवाहन शिवसेना ससंदीय पक्षाचे नेते संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केले. शिवसंवाद दौऱ्याच्या निमित्ताने मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातल्या विधानसभा मतदार संघाचा खासदार डॉ. शिंदे यांनी गुरुवारी आढावा घेतला. या बैठकीला आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद पाटील बोंढारकर, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, माजी खासदार आनंद परांजपे, जिल्हा प्रमुख, तालुका



प्रमुख आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते.

खासदार डॉ. शिंदे यांनी नांदेड जिल्ह्यात तीन बैठका घेतल्या. यात जिल्ह्यातील नांदेड दक्षिण, नांदेड उत्तर, लोहा कंधार, नायगाव, मुखेड, देगलूर, किनवट, हदगाव, भोकर या विधानसभा मतदार संघांचा आढावा घेतला. यावेळी खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, मतदान पुनरीक्षण मोहीमेबाबत शिवसेना पक्षाचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गंभीर आहेत. त्यांच्या आदेशाने राज्यात पक्षाकडून सव्वा लाखांहून अधिक 'बीएलए'च्या नियुक्त्या केल्या आहेत. या संपूर्ण मोहीमेवर लक्ष ठेवण्यासाठी पक्षाकडून संपर्क प्रमुख, जिल्हा प्रमुखांच्या नेमणुका केल्या आहेत. 'बीएलए' मतदार याद्या तपासणार आहे. आपल्या मतदारांची नावं यादीत आहे की नाहीत याबाबत 'बीएलए' माहिती देण्याची जबाबदारी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची आहे. त्यामुळे एसआयआर मोहीमेत कार्यकर्त्यांनी 'बीएलए'ला सहकार्य करावे. हे झाले तर प्रत्येक बूथवर शिवसेना मजबूत झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास खासदार डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकीसाठी प्रत्येक मंत्र्याला दोन जिल्ह्यांची जबाबदारी दिली आहे. मंत्री प्रकाश आबिटकर यांना नांदेड जिल्ह्याची जबाबदारी दिली आहे. तळागाळातील प्रत्येक कार्यकर्त्यापर्यंत पक्ष पोहोचला पाहिजे, यासाठी शिंदे साहेबांनी नियुक्त्या केल्याचे खासदार डॉ. शिंदे म्हणाले. खासदार डॉ. शिंदे म्हणाले की जिल्हा प्रमुख आणि तालुका प्रमुखांनी जिथे पक्ष संघटना कमकुवत असेल तिथे लक्ष देऊन संघटना मजबूत करण्याला प्राधान्य द्यावे. तेथील कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून त्या संपर्क प्रमुखांच्या निदर्शनात आणून द्याव्यात. पक्षाचे नेते शिंदे साहेब स्वत: १८ तास काम करतात. पक्ष नेतृत्वाचे सामान्य कार्यकर्त्यांवर लक्ष आहे. जो काम करेल त्याला पद मिळेल, या विचाराने पक्षाचे काम सुरु आहे, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

**खासदार डॉ. शिंदे यांची उबाठावर टीका**

नांदेड जिल्ह्यातील नायगाव येथील आढावा बैठकीत खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शिवसैनिकांना ताकद देण्याचे काम करत आहेत. यापूर्वी मराठवाड्यात शिवसेना नेतृत्वाने कधीही रस्त्यावर उतरुन काम केलं नाही, अशी टीका खासदार डॉ. शिंदे यांनी उबाठावर केली. आज ४५ डीग्री तापमानात देखील शिवसंवादच्या निमित्ताने कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी मराठवाड्याच्या दौऱ्यावर आलो. आम्ही झिरो लेव्हलवर काम करणारे कार्यकर्ते आहोत, असे खासदार डॉ. शिंदे म्हणाले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## केमिस्ट-ड्रगिस्ट बांधवांसाठी मार्गदर्शन शिबिर; पूरग्रस्तांना आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२८ मे -**

परंडा तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने तालुकास्तरीय केमिस्ट व ड्रगिस्ट बांधवांसाठी मार्गदर्शन व चर्चासत्र कार्यक्रम मंगळवारी विश्रामगृह येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष धनाजी आनंदे होते.

यावेळी अतिवृष्टी व पूरग्रस्त केमिस्ट बांधवांना आर्थिक मदत म्हणून भगवंत मेडिकल, सिरसाव यांना २ लाख, शिवराज मेडिकल, चिंचपूर (खु.) यांना ८५ हजार आणि एम.एस. मेडिकल, ढगपिंपरी यांना १ लाख १३ हजार रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले.

धनाजी आनंदे यांनी औषध व्यवसाय हा केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगत व्यवसायात पारदर्शकता व ग्राहकांचा विश्वास जपण्याचे आवाहन केले.

तसेच संघटनात्मक एकजूट कायम ठेवून सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचेही आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास मन्नान बासले, फैझल दहलूज, असिफ सय्यद, विकास जगदाळे, लक्ष्मण मुंढे, गजानन साळुंके, गणेश टकले, अन्वर शेख यांच्यासह तालुक्यातील अनेक केमिस्ट व ड्रगिस्ट बांधव उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### धाराशिवात जयोस्तु प्रतिष्ठानतर्फे सावरकर जयंती उत्साहात

**धाराशिव, दि.२८ मे -**

जयोस्तु प्रतिष्ठानच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४२ वी जयंती श्री अनंतदास महाराज स्मारक मंदिर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. नगरसेविका दिपाली पाटील यांच्या हस्ते सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जयोस्तु प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन रवी मुंडे व धनंजय पाटील यांनी दिले. तसेच सावरकर चौकात सावरकरांचा पुतळा उभारून चौकाचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन हुलसुरकर यांनी केले, तर सुदर्शन कुलकर्णी यांनी आभार मानले. यावेळी अनंत व्यास, रवी मुंडे, धनंजय पाटील, शरद वडगावकर, शिवराज आचार्य, अक्षय कुलकर्णी, इंद्रजीत कुलकर्णी आदी उपस्थित होते.



### तुळजापुरात बकरी ईद साजरी

**तुळजापूर, दि.२८ मे -**

शहरासह परिसरात मुस्लिम बांधवांचा प्रमुख धार्मिक सण ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईद गुरुवारी उत्साह, भक्तिभाव आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच मुस्लिम बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळाले. घाटशिळ येथील ईदगाह मैदानावर सकाळी सुमारे ८.३० वाजता हजारो मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा केली. नमाजनंतर देशात शांतता, बंधुता, प्रगती आणि सुख-समृद्धीसाठी विशेष दुवा करण्यात आली. यावेळी मौलाना मोहम्मद गुलाम व मौलाना समीर यांनी ईद-उल-अजहाचे धार्मिक महत्त्व स्पष्ट करत समाजात सौहार्द आणि एकात्मता टिकविण्याचे आवाहन केले. नमाजनंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईद मुबारकच्या शुभेच्छा दिल्या. बकरी ईदनिमित्त अनेक कुटुंबांनी पारंपरिक पद्धतीने कुर्बानी देऊन धार्मिक परंपरा जपली.



### मंगरुळ येथे बकरी ईद उत्साहात

**मंगरूळ, दि.२८ मे -**

इस्लाम धर्मातील प्रमुख सण ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईद गुरुवारी तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथे उत्साहपूर्ण आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळी ८ वाजता मुस्लिम बांधवांनी ईदगाहमध्ये एकत्र येऊन विशेष नमाज अदा केली. नमाजनंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत ईद मुबारकच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी गावातील विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील हिंदू तसेच इतर धर्मीय बांधवांनी मुस्लिम समाजाची भेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. त्यामुळे गावात बंधुत्व, ऐक्य आणि सामाजिक सलोख्याचे वातावरण निर्माण झाले.

### जामखेड-भुम प्रवासात महिलेच्या पर्समधून ३.८० लाखांचे दागिने चोरी

**भूम, दि.२८ मे -**

जामखेड ते भुम प्रवासादरम्यान एका महिलेच्या पर्समधून तब्बल ३ लाख ८० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरीस गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी भुम पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी माधुरी सुरज हिवरे (वय २८, रा. थिटे वस्ती, खराडी, पुणे, ता. जि. पुणे, ह.मु. वंजारवाडी, ता. भुम, जि. धाराशिव) या ९ मे रोजी जामखेड ते भुम असा प्रवास करत होत्या. पहाटे १ ते २.३० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या पर्समधील ६ तोळे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच चांदीचे दागिने असा एकूण ३ लाख ८० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत माधुरी हिवरे यांनी २७ मे रोजी भुम पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# ३२ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाचे आज शुभारंभ

### धाराशिवमध्ये साहित्यिकांचा उत्साह शिगेला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मे -**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित ३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाचा आज (दि.२९) छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह, धाराशिव येथे भव्य शुभारंभ होत असून संपूर्ण धाराशिव शहर साहित्यिक वातावरणाने भारावून गेले आहे. देशभरातील सुमारे ९०० साहित्यिक, कवी, पत्रकार, लेखक आणि साहित्यप्रेमी या दोन दिवसीय संमेलनासाठी धाराशिवमध्ये दाखल झाले आहेत.

लोकनेते स्वर्गीय अजितदादा पवार साहित्यनगरीत होत असलेल्या या संमेलनाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते होणार असून त्यांच्या आगमनाबाबत धाराशिवकरांमध्ये विशेष उत्सुकता पाहायला मिळत आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. नंदकुमार राऊत हे संमेलनाध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. उबाठा गटाचे आमदार कैलास पाटील हे स्वागताध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते उद्घाटन...**



आज सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून भव्य ग्रंथदिंडी काढण्यात येणार असून साहित्य परिषदेचे राष्ट्रीय विश्वस्त गुरू भांगे यांच्या हस्ते तिचे उद्घाटन होईल. त्यानंतर सकाळी ११ वाजता मुख्य उद्घाटन सोहळा पार पडणार आहे.

साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा संमेलनाचे निमंत्रक डॉ. शरद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली संमेलनाची संपूर्ण तयारी पूर्ण झाली असून धाराशिवमध्ये दोन दिवस साहित्याचा उत्सव रंगणार आहे.

## तुळजापुरात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२८ मे -**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त तुळजापूर शहरातील सावरकर चौक येथे सावरकर विचार मंचाच्या वतीने उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष विनोद गंगणे व विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्यवीर सावरकर अमर रहे अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी सावरकरांचे राष्ट्रासाठीचे योगदान प्रेरणादायी असल्याचे सांगितले, तर अमोल कुतवळ यांनी सावरकरांच्या त्याग, धैर्य व राष्ट्रनिष्ठेचा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

सावरकर विचार मंचाचे अध्यक्ष बाळासाहेब शामराज यांनी प्रास्ताविकातून सावरकर विचारांचा प्रसार अधिक व्यापक करण्याची गरज व्यक्त केली.

यावेळी नगरसेवक सागर कदम, नरेश अमृतराव, भाजप नेते उमेश गवते, महेश गरड, सचिन अमृतराव, महेश कुलकर्णी, शांताराम पेंदे, डॉ. सतीश महामुनी, पद्माकर मोकाशे, प्रफुल्लकुमार शेटे, पत्रकार अंबादास पोफळे, अजय साळुंखे, अनंत बुरांडे आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते.

## देवसिंगा नळ येथे दीड दिवसात आदर्श विवाह; शालेय साहित्य वाटपातून सामाजिक बांधिलकी



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२८ मे -**

तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा नळ येथे प्रतिष्ठित नागरिकांच्या पुढाकारातून अत्यंत साधेपणाने आणि सामाजिक बांधिलकी जपत एक आदर्श विवाह सोहळा पार पडला.

ग्रामसेवक इब्राहिम शेख यांचे पुत्र अरमान आणि गुलाम शेख यांच्या कन्येचा साखरपुडा, हळद, विवाह व इतर धार्मिक विधी अवघ्या दीड दिवसांत पूर्ण करण्यात आले.या आगळ्यावेगळ्या उपक्रमात विवाहाच्या निमित्ताने देवसिंगा नळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी वही, पुस्तके, पेन व इतर शैक्षणिक साहित्य मान्यवरांच्या हस्ते शाळा व्यवस्थापन समितीकडे सुपूर्द करण्यात आले. आ. राणाजगजितसिंह पाटील व जि.प. अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या सामाजिक बांधिलकीच्या आवाहनाला प्रतिसाद देत हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी जि.प. सदस्य सुनील बनसोडे, महपु जमादार, शाहेबाज काझी, वसंत वडगावे, चित्तरंजन सरडे, दयानंद काळुंके, विजय शिंगाडे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल युवा पत्रकार चांदसाहेब शेख यांचे सुपुत्र जुबेर उर्फ पैलवान याचा शाल, श्रीफळ व फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

या उपक्रमासाठी सरपंच युवराज पाटील, पोलिस पाटील बाबुराव बिराजदार, सिराज शेख, अझर शेख, भगवंत पाटील, राजेंद्र घोडके व तुळशीराम घोडके यांनी विशेष परिश्रम घेतले.

### २.५८ लाखांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मे -**

शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने २७ मे रोजी जिल्ह्यातील वाहनधारकांवर कारवायांमधून पोलीस प्रशासनाने २ लाख ५८ हजार ९५० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल केले.

## नळदुर्गमध्ये सावरकर-अहिल्यादेवी जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर; ३० जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ मे -**

नळदुर्ग शहर ब्राम्हण समाज संघटनेच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त २८ मे रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी नगरसेवक दत्तात्रय दासकर, तानाजी जाधव, शशिकांत पुदाले, पत्रकार विलास येडगे व ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष मुकुंद नाईक उपस्थित होते.

हार-तुऱ्यावर होणारा खर्च टाळून उपस्थितांना स्वातंत्र्यवीर सावरकरांची प्रतिमा भेट देण्यात आली. तसेच ३५०० किलोमीटर नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल सेवानिवृत्त शिक्षक किशोर नारायणराव जोशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुकुंद नाईक यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार विनायक अहंकारी यांनी मानले.

### गोवंशीय अवैध वाहतूक; १०.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मे -**

गोवंशीय जनावरांची निर्दयतेने व बेकायदेशीररीत्या वाहतूक करणाऱ्या वाहनावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत पाच जर्सी गायींसह बोलेरो पिकअप असा एकूण १० लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दत्ता बाबा शिंदे (रा. रामकुंड, ता. भुम) हा २७ मे रोजी पहाटे येडशी ते धाराशिव मार्गावरील वरुडा रोड ओव्हरब्रिज येथे महिंद्रा कंपनीच्या बोलेरो पिकअप (क्र. एमएच ३२५ एजे ०१९४) मधून पाच जर्सी गायींची वाहतूक करत होता. या जनावरांची चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता त्यांना निर्दयतेने कोंबून कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने छापा टाकून वाहन अडविले. यामध्ये पाच जर्सी गायी किंमत २ लाख १५ हजार रुपये व बोलेरो पिकअप वाहनासह एकूण १० लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जकेकूरवाडी तालुक्यात अव्वल

**सुशासन, लोकसहभाग आणि विकासकामांच्या जोरावर मानाचा प्रथम क्रमांक**



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२८ मे -**

ग्रामीण विकास, लोकसहभाग आणि सुशासनाचा आदर्श ठरलेल्या जकेकूरवाडी गावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळवला आहे.

शासनाच्या विशेष पथकाने विविध विकासात्मक निकषांच्या आधारे केलेल्या पाहणीत गावाने उत्कृष्ट कामगिरी नोंदवत अव्वल स्थान पटकावले. त्यामुळे जकेकूरवाडीची विकासाची वाटचाल आता इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुक्यातील १६ गावांची पाहणी करण्यात आली होती. यामध्ये ६ मे रोजी जकेकूरवाडी गावाची सखोल तपासणी करण्यात आली. गावातील प्रशासन व्यवस्था, विकासकामे, स्वच्छता, जलव्यवस्थापन, लोकसहभाग, सामाजिक सलोखा तसेच विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची बारकाईने पाहणी करण्यात आली.

सुशासनयुक्त गाव या निकषामध्ये पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन, ई-प्रशासनाचा प्रभावी वापर तसेच नागरिकांना त्वरित सेवा उपलब्ध करून देण्यात गावाने विशेष कामगिरी केली. सक्षम पंचायत या विभागात ग्राम पंचायतीचे आर्थिक नियोजन, कर वसुली, निधी व्यवस्थापन आणि लोकवर्गणीतील सहभागामुळे गावाला चांगले गुण मिळाले.

जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव या विभागात शुद्ध पाणीपुरवठा, सौर ऊर्जेचा वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, वृक्षलागवड आणि प्लास्टिकमुक्त उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी दिसून आली. मनरेगा व इतर शासकीय योजनांचे प्रभावी अभिसरण करून गावाच्या विकासासाठी करण्यात आलेले प्रयत्नही विशेष ठरले.

महिला व बालकल्याण योजनांची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामसभांचे नियमित आयोजन, गावपातळीवरील समित्यांचे सक्षमीकरण आणि ग्रामीण रोजगार निर्मितीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांचेही पथकाने कौतुक केले.

लोकसहभाग आणि श्रमदानातून उभी राहिलेली विकासाची चळवळ हीच गावाच्या यशाची खरी ताकद असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या माध्यमातून गावातील वाद-विवाद सामंजस्याने सोडविणे, सामाजिक सलोखा आणि एकोप्याचे वातावरण टिकवून ठेवणे या बाबींची विशेष दखल घेण्यात आली. गावातील शांतता, विकासाची सामूहिक भावना आणि ग्रामस्थांची एकजूट यामुळेच जकेकूरवाडीने तालुक्यात मानाचे स्थान पटकावले आहे.

या यशामध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्राम पंचायत सदस्य, तंटामुक्त समितीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थांचे सामूहिक योगदान महत्त्वाचे ठरले. जकेकूरवाडीच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून ग्रामस्थांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## साडेपाच महिन्यांत ३५०० किमी पायी प्रवास; नळदुर्गच्या किशोर जोशी यांनी पूर्ण केली 'नर्मदा परिक्रमा'

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२८ मे -**

जिद्द, चिकाटी आणि दृढ संकल्पाच्या बळावर नळदुर्ग येथील सेवानिवृत्त शिक्षक किशोर नारायणराव जोशी यांनी अतिशय कठीण आणि आव्हानात्मक मानली जाणारी 'नर्मदा परिक्रमा' यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. साडेपाच महिन्यांत तब्बल ३ हजार ५०० किलोमीटरचा पायी प्रवास करून त्यांनी हा आध्यात्मिक संकल्प पूर्ण केला. परिक्रमा पूर्ण करून नळदुर्ग शहरात परतल्यानंतर शहरवासीयांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

किशोर जोशी यांनी १३ डिसेंबर २०२५ रोजी ओंकारेश्वर येथून नर्मदा परिक्रमेची सुरुवात केली होती. सुरुवातीला दररोज १० ते १५ किलोमीटर चालत त्यांनी प्रवास सुरू ठेवला. पुढे त्यांनी आपल्या चालण्याचा वेग वाढवत दररोज २२ ते २३ किलोमीटर अंतर पार केले. दीड महिन्यात त्यांनी भरूच गाठले. ज्या ठिकाणी नर्मदेचे विस्तीर्ण पात्र अरबी समुद्रात विलीन होते, त्या ठिकाणचा अनुभव त्यांनी अविस्मरणीय असल्याचे सांगितले.



यानंतर मोरटक्का, भरूच, महेश्वर, बुधनी, जबलपूर, अमरकंटक, नर्मदापूरम मार्गे पुन्हा ओंकारेश्वर येथे पोहोचत १९ मे २०२६ रोजी त्यांनी नर्मदा परिक्रमा पूर्ण केली. या संपूर्ण प्रवासात त्यांनी जंगल, उन्हाचा तडाखा, वारा, उपासमार आणि कठीण पायवाटा यांचा सामना केला.

या प्रवासातील सर्वात कठीण टप्पा म्हणजे शूलपाणी जंगलातील सुमारे २०० किलोमीटरचा प्रवास होता. महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि गुजरात या तीन राज्यांमध्ये पसरलेल्या या घनदाट जंगलातून पायी मार्गक्रमण करणे हे अत्यंत आव्हानात्मक होते. मात्र न डगमगता किशोर जोशी यांनी हा प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला.

हिंदू धर्मात नर्मदा परिक्रमा हे अत्यंत पुण्यकर्म मानले जाते. परिक्रमेच्या काळात नर्मदा तटावरील अनेक लोकांनी परीक्रमावासीयांना अन्न, निवारा आणि मदतीचा हात दिला. परीक्रमावासियांचा संकल्प पूर्ण व्हावा म्हणून अनेक हात सतत झटत असतात, अशी भावना किशोर जोशी यांनी व्यक्त केली.

नर्मदा परिक्रमा पूर्ण करून नळदुर्गमध्ये आगमन झाल्यानंतर नळदुर्ग शहर ब्राम्हण समाज संघटनेच्या वतीने किशोर जोशी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या या कार्याबद्दल शहरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## बकरी ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२८ मे -**

बकरी ईदनिमित्त ईदगाह मैदान येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना ईद हा प्रेम, त्याग, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा पवित्र सण असल्याचे सांगत सर्वांच्या सुख, शांती, उत्तम आरोग्य आणि समृद्धीसाठी सदिच्छा व्यक्त करण्यात आल्या.याप्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, नगरसेवक सर्फराज कुरेशी, पंकज भोसले, सुनील आंबेकर, शहर कार्याध्यक्ष नरसिंह मेटकरी, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष मिलिंद पेठे, धनंजय राऊत यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बकरी ईदचा पावन सण समाजात एकात्मता, सलोखा आणि बंधुभाव अधिक दृढ करो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.